डुमडुमत डमरू ये
खण्खणत शूळ ये
शंख फुंकीत ये
येई रुद्रा !
येई रुद्रा ! !
येई रुद्रा ! ! !

# माणूस



जानेवारी - १९६३

मूल्य एक रुपया

वर्ष : दुसरें अंक आठवा

•

जानेवारी १९६३



: संपादक :

**श्री. ग. माजगांवकर**

## स्वरुप–दर्शन

| | | |
|---|---|---|
| **सामाजिक अंतरंग** | : | भारत आणि चीन : रा. कृ. पाटील. |
| | | मी पाहिलेला लाल हुकुमशहा : रा. म. शास्त्री |
| **कथा** | : | स्मरजित कुमार बंद्योपाध्याय : किशोर गोमकाळे : भीमराव कुलकर्णी. |
| **कविता** | : | सुरेश भट–ह. मा. खरात, ज्ञानेश्वर शंभरकर, सुधांशु, विश्वनाथ जोशी, प्रेस. |
| **अभिप्राय** | : | ' रथचक्र ' कादंबरी–अशोक शहाणे. |
| **विविध विषय-विभाग** | : | ना. स. करंदीकर, पु. ना ओक, रंगा मराठे. |

— मुखपृष्ठ : दत्ता महाबळेश्वरकर. —

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**' माणूस, ' मराठी मासिक**

४१९ नारायण पेठ, पुणें २.

● ● ●

**वार्षिक वर्गणी : आठ रुपये**

**किरकोळ अंक : एक रुपया**

**सूचना**

(१) कथासाहित्य किंवा लेख पाठवितांना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसें टपालहंशील पाठवावें.

(२) कविता पाठवितांना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसें टपाल हंशील पाठवावें.

(३) नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसें टपाल हंशील पाठविल्यास निर्णय कळविण्यांत येईल व असें साहित्य निकालांत काढलें जाईल.

(४) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

(५) या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें ' माणूस ' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.




संपादकीय

# वनवासाचें दिव्य

भारतावरील चीनचें आक्रमण हा सीमावाद नसून आंतरराष्ट्रीय शीतयुद्धांतील चीननें उचलेला हा एक आक्रमक पवित्रा आहे हें नीट समजून घेतलें तरच, चीनच्या विविध हालचालींचा उलगडा होऊं शकतो व उपाययोजनेची दिशाहि समजूं लागते. गेल्या दोन-तीन वर्षांपासून कम्युनिझमचा फैलाव कसा करावा याबाबत रशिया - चीन यांच्या. मध्यें तीव्र स्वरूपाचे मतभेद आहेत हें जगजाहीर आहे. मागासलेल्या देशांसमोर कम्युनिस्टप्रणीत समाजरचनेच्या श्रेष्ठत्वाचें प्रात्यक्षिक उभें करून, आर्थिक सुबत्ता, सामाजिक समता, वैज्ञानिक प्रगति इत्यादि सर्व आघाड्यांवर साम्यवादी समाजच भांडवलशाही राष्ट्रांपुढें कसे जाऊं शकतात, हें उदाहरणानें सिद्ध करून व वेळ पडल्यास युद्धाचीहि तयारी ठेवून कम्युनिझमचा प्रसार करण्याची रशियन नेत्यांची विचारसरणी आहे. तर मागासलेल्या देशांतील वर्गसंघर्ष तीव्र करून रक्तमय लाल क्रांतीचा उठाव घडवून आणणें हा चीनी नेत्यांचा मार्ग आहे. भारत हा चीनी नेत्यांच्या दृष्टीनें भांडवलशाही राष्ट्रांच्या कच्छपी लागलेला देश आहे. परंतु पंडित नेहरूंच्या समाजवादी विचारांच्या व तटस्थतेच्या ध्येयधोरणांच्या पुरस्कारामुळें त्याचें हें सत्यस्वरूप नीटसें स्पष्ट होत नव्हतें, ही चीनची अडचण होती. म्हणून हा बुरखा फाडून नेहरू-सरकारचें भांडवलशाही सत्यस्वरूप जगासमोर उघडें करावें, हिंदुस्थानांतील डाव्या विचारसरणींची चालू असलेली आत्मवंचना थांबवावी, संघर्षासाठीं अवश्य असणारी परस्परविरोधाची धार तीव्र करून प्रत्यक्ष कृतीनेंच रशियन विचारसरणीला टोला द्यावा या हेतूनें चीननें आक्रमणाचें पाऊल उचललें. कांहीं प्रमाणांत चीनचा कार्यभाग साधला, तर त्याचे कांहीं अंदाज चुकले. आक्रमणानंतर भारतांत कम्युनिस्टांची झालेली धरपकड, मेननसाहेबांची गच्छंती, अमेरिकेकडे भारतानें मदतीसाठीं घेतलेली धांव यामुळें आणीबाणीच्या प्रसंगीं आपली तटस्थता सोडून भारत पाश्चात्य गोटांतच सामील होणार हें चीनला दाखवितां आलें. पण आक्रमणाला तटस्थ राष्ट्रांकडून व कम्युनिस्ट देशांकडूनहि पाठिंबा न मिळाल्यानें व भारतांत एकमुखानें प्रतिकाराचा आवाज उठल्यानें कांहीं काल माघार घेऊन पुन्हा अनुकूल संधीची वाट पाहाणें चीनला शहाणपणाचें वाटलें. सीमावाद हें चीनचें जागतिक युद्धपटावरील एक प्यादें आहे. चीन हें प्यादें केव्हांहि पुढें रेटील किंवा वेळ पडल्यास तें बळी देऊन प्रतिपक्षाचें दुसरें एखादें मोहरें पदरांत पाडून घेईल. हा युद्धपट समजला तरच शत्रूच्या बारीक-सारीक हालचाली समजतील, अखेरचा विजय हस्तगत करून घेतां येईल. नाहींतर आक्रमणानंतर सुरुवातीला दिल्लीची जी तारांबळ उडाली तीच परिस्थिति कायम राहील व ठेंच लागूनहि आमच्यांत सुधारणा होत नाहीं हें सिद्ध होईल.

उपाययोजनेची दिशाहि यामुळें स्पष्ट होऊं लागते. चीनचें आक्रमण हें भारताच्या तटस्थतेच्या व सहजीवनाच्या विचारसरणीला आव्हान असेल तर या विचारसरणीचा पाया बळकट करणें हें आमचें कार्य ठरतें. आजवर आम्हीं केवळ विचारप्रचारांत व स्वप्नरंजनांत रमलों होतों. कोणत्याहि गटांत भारत सामील होणार नाहीं, कोणाकडूनहि भारत मदत स्वीकारील हें धोरण अभावात्मक आहे. भारत मूलभूत गरजांच्या बाबतींत परावलंबी राहाणार नाहीं अशी प्रथम सोय केल्याशिवाय तटस्थतेच्या धोरणाला कांहीं फारसा व्यावहारिक अर्थ उरत नाहीं. चार ठाणीं

शत्रूच्या हातांत पडल्याबरोबर अमेरिकेकडे ल्हान–सहान शस्त्रास्त्रांसाठींहि झोळी घेऊन जाणारा भारत तटस्थ कसा राहूं शकतो ? ही सुजला सुफला भूमि स्वतंत्र होऊन पंधरा वर्षें झालीं तरी आपल्या लेकरांना पोटभर अन्नाचा घांस देऊं शकत नाहीं, परदेशांतून अजूनहि धान्याच्या बोटी आणाव्या लागाव्यात हें तटस्थतेच्या धोरणाला कसें शोभून दिसतें ! स्वायत्त व स्वाधीन समाजच सहजीवनाची उपासना करूं शकतो. ही पायाभरणी गेल्या पंधरा वर्षांत आम्हीं केलेली नाहीं. म्हणूनच आमच्या तटस्थतेचा, सहजीवनाचा, विश्वशांतीचा पुरस्कार हीं स्वप्नरंजनें ठरलीं. पाश्चिमात्य साम्राज्यशाही आणि लाल हुकूमशाही यांना पर्यायी असा तिसरा भारतीय आदर्श यातून उभा राहूं शकला नाहीं.

या रचनात्मक उभारणीसाठीं नवीन सामाजिक संघटना, तरुण राजकीय पक्ष यांनींच पुढें सरसावलें पाहिजे. सरकारी यंत्रणेच्या हातून पंचवार्षिक योजना यशस्वी करण्याचे प्रयत्न गेलीं पंधरा वर्षें चालू आहेत., त्यांत म्हणावें असें यश कांहीं आपल्या पदरांत पडलेलें नाहीं. कारण आदर्शानें भारलेलीं ध्येयवादी माणसें या यंत्रणेपासून चार हात दूरच राहिलेलीं आहेत. ध्येयवादी कार्यकर्त्यांचा भरणा त्यामानानें सामाजिक संघटना व राजकीय पक्ष यांचेजवळ विशेष आहे. पण आज या कार्यकर्त्यांच्या तळमळीला वाव राहिलेला नाहीं, त्यांच्या श्रमाला कांहीं दिशा राहिलेली नाहीं. सत्ता हस्तगत केल्याशिवाय विशिष्ट समाजपरिवर्तन घडूं शकत नाहीं या विचारसरणीचा सर्वच पक्षांवर प्रभाव पडलेला आहे. परंतु समाजपरिवर्तनाचा पूर्ण आराखडा आधीं तयार असावा लागतो, त्या दृष्टीनें कार्यकर्त्यांचा संच उभा करावा लागतो, लोकमत सुशिक्षित करून ठेवावें लागतें, तरच सत्ता हातीं आल्यावर ती विशिष्ट उद्दीष्टांसाठीं राबवता येते, अन्यथा उद्दिष्टें नोकरशाही यंत्रणेच्या पोलादी मिठींत गारठून जाण्याचीच शक्यता असते, हा गेल्या पंधरा वर्षांतील अनुभव आम्ही जमेस धरत नाहीं. आमचेकडे रचनात्मक कार्य व राजकीय उद्दिष्टें यांची कृत्रिम फारकत झालेली आहे. गांधीजींच्या राजकीय सामर्थ्याचें बीज हरिजन–सेवेंत होतें, ग्रामोद्धारांत होतें हें आम्हीं ध्यानांत घेतलें पाहिजे. पंचवीस–तीस वर्षांच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यांत प्रत्यक्ष असे लढे गांधीजींनीं तीनच केले. पण या लढ्यांची पूर्वतयारी, त्यासाठीं अवश्य असणारी सामाजिक मनाची घडण, कार्यकर्त्यांचा संच ते नित्याच्या सेवाकार्यांतून निर्माण करीत होते. हाच साध्यसाधनांचा व नित्यनैमित्तिकांचा विवेक आजहि आम्हांला मार्गदर्शक ठरणार आहे.

कालमानाप्रमाणें मार्ग बदलले आहेत. उद्दिष्टांत फरक पडला आहे. पण केवळ राजकीय पातळीवर काम न करतां आर्थिक, सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमांतून जनशक्ति संघटित करण्याची कार्यपद्धति बदलण्याचें कारण नाहीं. दहा वर्षें राजकीय पक्षांनीं राजकारण–संन्यास घेतला व प्रत्यक्ष पुनर्रचना कार्यावर सर्व लक्ष केंद्रित केलें तर खऱ्या अर्थानें देशाचें सामर्थ्य वाढेल व आपली विश्वशांतीचीं स्वप्नें साकार होण्यासाठीं अवश्य ती सामाजिक बैठक सिद्ध होईल. उदयोन्मुख पक्षांनीं हा चौदा वर्षांचा वनवास पत्करून जनसंघटनेचें दिव्य नाकारलें तर मात्र येथें रामायणहि घडणार नाहीं आणि रावणवधाचीहि शक्यता उद्‌भवणार नाही. शिवाय रामायणकालीं एकाच रावणाचा प्रश्न होता. आज दोन लंकाधिपती स्वर्गसुखाचीं आमिषें दाखवित दोन सीमावर खडे आहेत. एक डॉलरपौंडांच्या छनछनाटांत आपल्या स्वार्थाचा नंगा नाच लपवूं पाहात आहे तर दुसरा विळाकोयत्याच्या खणखणाटांत अधिराज्यस्थापनेच्या उघडउघड वल्गना करीत आहे. या दोन साम्राज्यवाद्यांच्या टक्करींत भारताच्या विश्वशांतीच्या व विश्वमानवाच्या स्वप्नांचा मात्र चक्काचूर उडेल. अखेर माणसांप्रमाणें राष्ट्रेंहि स्वप्नांवरच जगत असतात. विश्वमानवाची, विश्वसमाजाची निर्मिती हेंच प्राचीन काळापासून भारतीयांनीं उराशीं जपलेलें स्वप्न आहे. याच स्वप्नपूर्तीसाठीं हा समाज आजवर अनेक संघर्ष खेळला व अनेकदा पराभूत होऊनहि याच स्वप्नपूर्तीसाठीं हा समाज आजहि जिवंत राहिला. यापुढेंहि हें स्वप्न भंगलें तरी आमचेजवळ जीवापलीकडे जपायचें आणि मरणाचें मोल देऊनहि जोपासायचें असें दुसरें कांहींच शिल्लक उरणार नाहीं. राज्य हातीं येऊनहि बिभीषणाला राज्याभिषेक करून ' जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी ' या भावनेनें अयोध्येला माघारी येणाऱ्या रामचंद्रांची ही भूमि आहे. चौदा वर्षें प्रभू वनवासांत असतांना उपभोगशून्य वृत्तीनें राज्यशकट चालविणाऱ्या भरताचा हा भारत आहे. येथें कोणाचेंहि साम्राज्य टिकणार नाहीं, निर्माण होणार नाहीं. येथें फक्त रामराज्यच यशस्वी होईल, चिरस्थायी होईल !

• • •

# आमचे वाचक

**सप्टेंबर, आक्टोबर, नोव्हेंबर १९६२ या तीन अंकावरील वाचकांच्या पत्ररूप प्रतिक्रियांचें संकलन.**

किर्लोस्कर प्रेस,
स्वारगेट,
पुणें,

प्रिय श्री. माजगांवकर, १-९-११६३

हें पत्र लिहून आज आपली भेट घडत आहे याचा मला आनद वाटतो.

आजच्या टपालांतून आलेला सप्टेंबरचा 'माणूस' अक मिळाला. अंक चाळून पाहात असतांना, 'मासिकें कशासाठीं' हा आपला संपादकीय लेख वाचून पाहिला. आपण लिहिलेला संपादकीय लेख मला फारच आवडला त्याबद्दल मी आपलें हार्दिक अभिनंदन करतों.

या संपादकीय लेखाद्वारें, मासिकांचें व दैनिकांचें कार्यक्षेत्र कोणतें हा आपण उपस्थित केलेला मुद्दा मला विशेष उद्‌बोधक वाटला. माझ्याप्रमाणें अितर मासिकाच्या व दैनिकांच्या सपादकांनाहि आपला लेख आवडेल अशी आशा करतों.

आपला,
मु. श किर्लोस्कर,
संपादक किर्लोस्कर मासिके.

•

३८।१४ एरंडवणा,
९ वी गल्ली,
प्रभात रस्ता,
पुणें ४.

प्रिय श्री. माजगांवकर, ३१-८-६२

'माणूस' चा अंक आज हाती आला आणि माणुसकीची शीतल झुळुक अगावरून जात आहे असें वाटले. 'तरुण भारता'नें जें लिहिलें त्याचा परामर्ष घेणारा आपणासारखा नि.स्पृह पत्रकार या पिढीत आपला तेजस्वी पत्रकार-धर्म निष्ठेनें आचरीत आहे ही परम भाग्याची गोष्ट आहे.

तुमच्या सपादकीय स्फुटातील उत्तरार्घ फारच प्रभावी आहे. मराठी भाषेतील मासिकांच्या सपादकानी आपापली बैठक, भूमिका व दृष्टिकोन कसा राखावा या सबधीं आपण जी अपेक्षा व्यक्तविली आहे ती रास्त आहे. दैनिकें व त्याच्या साप्ताहिक आवृत्त्या यामुळें वाचकांची एक तातडीची गरज भागते हें खरें; परंतु त्याच्या कार्यकक्षेला काहीं विशिष्ट मर्यादा पडतात हें त्यांनीं नीट ओळखून ठेवलें पाहिजे. या संदर्भात प्रायमिक शाळा व माध्यमिक शाळा अशी जी उपमा आपण दिली आहे ती समर्पक वाटली.

महाराष्ट्रांतील पत्रव्यवसायात, आजच्या स्पर्धेच्या जगातहि सहकार्यवृत्ति व 'खेळकरपणा राखण्याची गरज आहे. याबाबत 'माणूस' वयाने लहान असूनहि, मोलाची कामगिरी बजावणार असें दिसत आहे.

आपला,
य. गो. निस्तुरे,
सपादक, 'नवें जग'

आपल्या उभयतांच्या प्रोत्साहनपर पत्रांबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.
आपला,
श्री. ग. मा.

घनजी चाळ,
नारायण बाग,
कल्याण,

स. न. ८-९-६२

आपलें 'माणूस' मासिक मी दरमहा नियमितपणें वाचीत असतो. परंतु हें पत्र लिहिण्याचें कारण मीं ऑगस्टचा अक वाचला. त्यांतील 'रणावीण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें' ह्या लेखाचा पहिला भाग फारच उद्‌बोधक वाटला. तो अपूर्ण असल्यानें सप्टेंबरच्या अकाची उत्कंठा लागून राहिली आहे. लायब्ररीत आल्याबरोबर सर्वप्रथम मी 'माणूस' घेतल नि लेख वाचून काढला. खरोखरीच लेख उत्कृष्ट वाटला आणि आहेच यात शका नाही. आतां शेवटच्या भागाची वाट पहात आहे. अशीच इग्रजी ग्रथाची परीक्षणें आपण (अर्थात् अमूल्य) भविष्य काळात देत जावी. म्हणजे माझ्यासारख्या वाचकाची अडचण दूर होईल. सर्वच इग्रजी म्हणा, अगर कोणतेंहि पुस्तक विकत घेणें जमत नाही.

आपणांस सुयश येवो ही इच्छा !

आपला
राघवेंद्र भणूर

७१६, चौथी गल्ली.
शाहुपुरी
कोल्हापूर,

स. न. २२–८–६२

ऑगस्ट महिन्याचा अंक हाती पडल्याबरोबर अनुक्रमणिका चाळून मी कोणता लेख आधीं वाचला असेन तर रा. म. शास्त्री याचा. या लेखामुळें मी पुढच्या अंकाची आतुरतेनें वाट पाहात आहे. ह्या अंका-पासून हा आपला खरोखर स्तुत्य व कौतुकास्पद उपक्रम आहे. भडक प्रणयानें भरलेल्या गोष्टीपेक्षां आम्हा तरुणांना ही लेखमाला फारच आवडेल.

आपला
सुहास मुकुंद शिखरे

●

१०८, खरे टाऊन,
धरमपेठ,
नागपूर

मीं नुकतांच ' माणूस 'चा ऑगस्ट महिन्याचा अंक वाचला. त्यातील श्री. रा. म. शास्त्री, याचा ' रणाविण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें ' हा लेख वाचला. मला तो फारच आवडला. सप्टेंबरच्या अंकाची मी उत्सुकतेनं वाट पाहात आहें. या आपल्या उपक्रमाला मी सुयश चिंतिते.

आपली
कु. कल्पना शर्मा

[ वरील तीन पत्रें प्रातिनिधिक म्हणून छापलीं आहेत. श्री. रा. म. शास्त्री यांच्या लेखमालेचें स्वागत करणारीं असख्य पत्रें आमचेकडे आलीं आहेत, अनेकांनीं या लेखमालेचें स्वतंत्र पुस्तक काढा असें आग्रहानें सुचवले आहे. या सर्व पत्र–लेखकाचे आम्ही आभारी आहोंत या (जानेवारी) अंकापासून श्री. रा. म. शास्त्री यांची दुसरी मह-त्वाची लेखमाला आम्ही देत आहोंतच. संपादक ]

विमणीनगर
अमरावती.

स. न. १–९–६२

' माणूस 'चा अंक मिळाला. डॉ. अत्तरदे यांच्यावर मी सहज व नवें लिहावें म्हणून लिहिलेला लेख एवढा चर्चा-विषय होईल व मोठें स्वरूप धारण करील असें मला वाटलें नव्हतें. आपल्या मासिकानें अशा रीतीनें कांहीं आगळ्या बाबोचें उद्‌बोधन करावें ही गोष्ट मराठी मासिकसृष्टीच्या दृष्टीनें आग ी, मार्गदर्शक आणि गौरवार्ह आहे. ' माणूस 'चें हे निराळेंपण कुणालाहि आवडेल.

आपला
प्रा. भाऊ मांडवकर

●

बी. डी. चाळ नं. ७.
रुम नं. ५६. वरळी.
मुबई–१८

स. न. ६–९–६२

सप्टें. १९६२ च्या ' माणूस ' अंकातील एका सामान्य पट्टेवाल्याची मुलाखत वाचली. हें कार्य प्रशंसनीय आहे. तें इतरांना मार्गदर्शक ठरेल ही आशा.

आपला
जी. एन. छलके.
भवानी मंदिर
मोर्शी
जि. अमरावती.

स. न. २७–९–६२

सप्टें. १९६२ च्या ' माणूस 'मधील ' गणपत जाधव ' या सामान्य पट्टेवाल्याची मुलाखत वाचून ' माणूस 'च्या ध्येयवादाची पूर्ण कल्पना आली व आनंद वाटला. खरोखर ही मुलाखत वाचून झाल्याबरोबर, ' जे का रजले गाजले । त्यांसी म्हणें जो आपुले । तेंचि मासिक वाचावें ज्ञान तेथेचि मिळावें ।, असें मीं उत्स्फूर्त शब्दांत माझ्या मित्रास म्हटलें.

आज थोर पुढाऱ्यांच्या वल्गनाना व पोरकट आचारविचाराना प्रकाशित करण्यात अनेक वृत्तपत्रांना व मासिकांना भूषण वाटते आहे. पण सामान्य माणसांच्या बहुमोल कृत्यावर एक अक्षरहि लिहि-ण्याचा थोरपणा त्यांच्याकडून दाखविला जात नाही. जें सामान्य तें असामान्य समजून त्यातील सत्यदेखील उजेडात आणले जाऊं नये याला काय म्हणावे ! लघुकथा प्रकाशित करण्यापेक्षां अशा प्रकारचें लेख व मुलाखती प्रसिद्ध केल्यास आपल्याकडून साहित्यसेवेबरोबर जनसेवाहि होईल.

आपला
म. ब. काळे
बी. ए., बी. टी,

●

C/o श्री. विजयकुमार चिटणीस.
ऑल इंडिया रेडिओ

स. न. नागपूर.

आपल्या मासिकाची मी नेहमींची वाचक असुन आपल्या मासि-कानं अल्पावधीतच आपलं आगळं स्थान निर्माण केल आहे. मराठीची पदवीधर या नात्यानं मला मराठी वाङ्मयाची आवड असणं स्वाभा-विक आहे. आपल्या मासिकातील वाङ्मय उत्कृष्ट दर्जाचं असतं याबद्दल माझी खात्री पटली आहे.

आपली
सौ. विद्या चिटणीस
एम. ए.

●

खामगाव
२६–१०–६२

श्री. संपादक, ' माणूस ' यांस—

मीं आपलें मासिक कांही तरी उच्च विचारसरणीचे असेल म्हणून सुरू केलें. पण दिवाळी अंकातील " जुन्या वाड्यातून, लेखक मोती नदी, अनुवादक अशोक शहाणे " हा लेख वाचून धक्का बसला. अशा प्रकारचे लिखाण आपण प्रसिद्ध करणार असाल आणि तें आपल्या तरुण पिढीपुढें ठेवणार असाल तर आपण मासिक बंदच करणे बरें

असे मला वाटतें. हा लेख 'मेनका' वगैरे मासिकात आला असता तर मला विशेष वाईट वाटले नसतें. कारण ती मासिके त्याकरतांच आहेत. कळावें.

आपला,

डॉ म मा. सावजी.

(डॉ. सावजी यानी अगत्यपूर्वक पाठविलेल्या पत्राबद्दल आम्ही त्याचे आभारी आहोत. 'माणूस' च्या दिवाळी अकांतील मोती नदी याच्या 'जुन्या वाड्यातून' कथेतील घटनांची क्रमवारी, त्याचे महत्त्व, त्यातून सूचित होणारा अर्थ—हे सर्व साकल्यानें पाहतां ही कथा वाचून कोणाच्या काम–भावना चेतविल्या जातील असे वाटत नाही. लेखकाचा तसा हेतु आहे असें निदान आम्हाला तरी वाटत नाही. स्त्री-पुरुषांतील प्रेम या सनातन विषयाचें आजच्या काळातील रूप कसे आहे एवढें सागूनच केवळ लेखक थाबत नाही, ती तर कथेची निव्वळ सुरुवात आहे! नतरच्या भागांत काही घटना मांडून ह्या रूपाचा अभ्यास करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे, असे आम्हाला वाटतें. हा अभ्यास गभीरपणे केला आहे. त्यात छचोरपणा नांवालाहि सापडणार नाही. हल्लीच्या काळांत जुन्या वाड्यांसारख्या जागा नाहीतच असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीकडे डोळेझाक करणें आहे. त्याने वस्तुस्थिती नाहीशी होत नाही. कथेंत लेखकानें ह्या वस्तुस्थितीचे सागोपाग वर्णन कुठेंच केलेलें नाही, उलट खोल जाऊन तिची कारणें शोधण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. या दृष्टीनें ही कथा परत एकदा वाचून पाहिली तर ह्या गोष्टी नि.सशय ध्यानी येतील.

या कथेचे मूळ लेखक 'मोती नदी' हे बगाली आहेत. श्री.अशोक शहाणे यानी ती मूळ बगालीवरून अनुवादित केली आहे. वग सस्कृति समेलनाचें मुखपत्र "कालपुरुष" या सारख्या प्रतिष्ठित नियतकालिकांत ती मूळ प्रसिद्ध झाली. ही अेकच गोष्ट 'माणूस' मधील तिच्या अनुवादाचें समर्थन करण्यास पुरेशी आहे.

डॉक्टरसाहेब, वरील खुलासा आपले समाधान करील असा आमचा विश्वास आहे. आम्ही प्रसिद्ध केलेल्या कथाविषयीं आपणांसारखे वाचक जागरूक आहेत ही आम्ही भाग्याची गोष्ट समजतों संपादक.)

२७४, घाणेकर बगला,
रामदास पेठ, नागपूर १

स. न २१–११–६२

'माणूस' चा दिवळी अंक चागला निघाला आहे. मुखपृष्ठ चागले साधले. '१९ कविता'–(द. भि. कुलकर्णी) ही रसग्रहणाची अभिनव पद्धति विशेष आवडली. सुरेश भटानी बरीच आघाडी मारली आहे.

आपला

महेश जोशी

●

जी. के. नायडू बगला,
टिकेकर रोड.
धंतोली, नागपूर.

स. न. २५–११–६७

'माणूस' चा दिवाळी अक वाचला. दोन उपक्रम अभिनदनीय आहेत. कवितांचें रसग्रहण व 'धन्य तूचि कांता' हें अनेकाचें मनमोकळें आत्मकथन. कथासकलनहि उत्तम आहे.

एकूण दिवाळी अकाचा मानदड उच्च प्रतीचा राखल्याबद्दल धन्यवाद.

आपला

राम बेटावदकर

मु पो. पोखरापूर-
जि. सोलापूर.

स न. २९–११–६२

फार फार आनद झाला आपला 'माणूस' वाचून. सर्व अक वाचून झाल्यावर 'कळलें आतां अतर' असे म्हणावे वाटतें. शनवारवाड्यातील शमादान, ऐवज, अनवाणी आणि इतर कथाहि उत्तम आहेत. जुन्यावाड्यातून व आजोळ तितकेसे पटले नाही. इतर भडक रगशृंगाराची मासिकें आपल्या 'माणूस' पुढें फिक्कीं पडतात. माणूसधर्म आपण चांगल्या तऱ्हेने फार पाळतां आहात याबद्दल शतशः धन्यवाद.

आपला एक वाचकशेतकरी

कृष्णाथ महादेव दळवे.

●

मु. पो. सिओनी.
व्हाया–पाढुरणा
जि. छिंदवाडा, म. प्रदेश

स. न. २६–१२–६२

दिवाळी अक मिळाला. अंक विविध साहित्यानें नटलेला आहे. कवितांच्या रसग्रहणाचा उपक्रम मौलिक आहे. मुखपृष्ठ, आतील सजावट आणि अकाचा एकंदर थाटमाट आल्हादकारी आणि मगलमयी आहे. तथाकथित शृंगारसाहित्य याहून वेगळेंच असे 'अक्षरसाहित्य' 'माणूस' मराठी माणसाला धैर्यानें व श्रद्धेने देत आहे.

आपला

नरेंद्र पराडकर.

★

अमरावती,

स. न. २१–११–६२

'माणूस' चा दिवाळी अंक मला आवडला. अभिनदन करणें औपचारिकपणाचें ठरेल. पण एवढेंच सांगतो कीं, एकूण मासिकाच्या बाजारगर्दीत 'माणूस' आपलें वेगळेंपण राखून आहे. याचें एकच उदाहरण म्हणजे मुखपृष्ठ.

आपला

सुरेश भट.

●

विभूते वाडा.
मंगळवार पेठ,
मिरज.

स. न. १७–११–६२

'माणूस' मासिकाचा दिवाळी अक उत्कृष्ट निघाला आहे. निवडलेले साहित्य अव्वल दर्जाचे आहे. 'धन्य तूचि काता' हें सदर मला फार आवडलें. कोयनालक्ष्मीचें मुखपृष्ठ अत्यत आकर्षक, समयोचित आणि उत्तम आहे.

इतक्या अल्पावधीत 'माणूस' नें मराठी साहित्यक्षेत्रात एक आगळें स्थान पटकावले आहे यात शका नाहीं. धन्यवाद.

आपला

एस्. ए कुलकर्णी.

● ● ●

# अटळ यूद्धाचा माओ-सिद्धांत


रशियन समाजांतील निरनिराळ्या स्थित्यंतरांची बाहेरच्या जगताला निःपक्षपाती दृष्टीनें कल्पना आणून देण्यासाठीं रशियांतून देशांतरित आलेल्या बऱ्याच रशियन अभ्यासकांनीं म्युनिक येथें एक संस्था चालविलेली आहे. या संस्थेचें नांव '**इन्स्टिटयूट फॉर दि स्टडी ऑफ यू. एस्. एस्. आर्.**' असें असून संस्थेमार्फत दरमहा एक अभ्यास-पत्रिकाहि (Bulletin) प्रकाशित करण्यात येत असते. या पत्रिकेच्या मार्च व एप्रिल १९६२ या दोन अंकांत मिळून के. पाव्हलॉव्ह या अभ्यासकानें 'Communist China : A Reluctant Drama' या नांवाचा एक प्रदीर्घ लेख लिहिला आहे. वरील अवतरण या लेखांतलें आहे.

*M*ao regards any protracted period of peaceful co-existance with the capitalist system as impossible and an eventual war between the Capitalist and Communist worlds as inevitable. For Mao-Tse-tung the very idea of peaceful co-existance goes against the grain, since he is a man who has reached his present position by a constant ruthless struggle against both enemies of the revolution and personal opponents. It is diametrically opposed to his views as a revolutionary who has spent his whole life experiencing deprivation and fighting battles through which he has sought, with fanatical persistance, to inspire the Chines people with the spirit of Yenan and prepare them for the struggle ahead. Again, peaceful co-existance with capitalist countries is contrary to his dream as a nationalist of restoring the majesty and glory of his country in battle against the imperialists and colonisers. Khrushchev recognises the destructive power of modern armaments in the hands of their enemies as well as in the hands of Communists. But for Mao, unwilling as he is to acknowledge the advances made by the capitalist world and its technological superiority, all enemies, w hatever their military potential, are nothing more than 'paper tigers.' For him it is the people who are truly omnipotent, and then only when they are led by Communists.

भांडवलशाही देशांबरोबर शांततामय सहजीवन फार काळ शक्य नसल्यानें कम्युनिस्ट व भांडवलशाही देशांतील अंतर्गत युद्ध ही एक अटळ बाब आहे असा माओचा सिद्धांत आहे. शांतता आणि सहजीवन माओच्या रक्तांतच नाहीं. कारण त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांशीं व लाल क्रांतीच्या आड येणाऱ्या विरोधकांशीं दीर्घकाल निर्दयपणें झुंज देत देतच तो आजच्या सर्वश्रेष्ठ पदाला पोचलेला आहे. ज्याची सारी हयात विपत्तीत व कडव्या प्रतिकारांत खर्च झाली, एकांतिक निष्ठेनें ज्यानें चिनी जनतेला आगामी संग्रामासाठीं सतत जागृत ठेवलें अशा क्रांतिकारक पिंडाच्या माओला सहजीवनाचें तत्त्व मानवणें केवळ अशक्यच आहे. शिवाय साम्राज्यवादी देशांशीं युद्ध खेळून चीन हें एक जगांतील प्रबळ राष्ट्र म्हणून मान्यतेला चढविण्याच्या त्याच्या राष्ट्रीय स्वप्नरंजनाशींहि सहजीवनाचें तत्त्व विसंगतच आहे. आधुनिक शस्त्रास्त्रें, भांडवलशाही काय किंवा कम्युनिस्ट काय, कोणत्याहि देशाच्या हातीं असली तरी अंतिम तीं उभयपक्षांच्या व साऱ्या मानवजातीच्या संहारासच कारणीभूत ठरतील अशी ख्रुश्चेव व इतर रशियन कम्युनिस्टांची भावना आहे. परंतु माओ या भावनेला किंमत देण्यास तयार नाहीं. यांत्रिक प्रगतींत पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रें आघाडीवर आहेत हेंच मुळी माओला मान्य नाहीं. आणि समजा, जरी तीं असतील व लष्करी सामर्थ्याचा प्रचंड साठा त्यांच्या मागें उभा असेल तरी माओच्या दृष्टीने ती केवळ बुजगावणीं आहेत. खरें बळ जनतेंत आहे; आणि विशेषत कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं जनता संघटित झालेली असेल तर जगांतील कोणतीहि शक्ति तिच्या सामर्थ्यासमोर टिकणार नाहीं असा माओचा विश्वास आहे.

# युद्ध संयोजन आघाडी

सीमेवरचें युद्ध आज थंडावलें आहे. उद्यां तें पुन्हा सुरू होईल अगर होणारहि नाहीं. कारण केवळ प्रादेशिक सीमांचा वादच यांत अभिप्रेत नाहीं. डाव्या-उजव्या राजकारणाचे अनेक खोल अर्थ यांत दडलेले आहेत. पण सैनिकी सामर्थ्य वाढीबरोबरच इतरहि सर्व सामाजिक अंगोपांगांची पुनर्रचना करण्याची निकड या युद्धघटनेमुळें सर्वांना जाणवूं लागलेली आहे हीहि गोष्ट कमी महत्त्वाची नाहीं. सैनिकी आघाडीइतकीच नागरी जीवनाच्या संयोजनाची आघाडीहि यापुढें आपल्याला लढवितां आली पाहिजे. आमचें शिक्षण, आमचे उद्योगधंदे, शेतीव्यवस्था या सर्व क्षेत्रांत नव्या उभारणीचा एक विशेष जोम दिसून आला तरच युद्धाचा धोका टळण्याचा संभव आहे. या दृष्टिकोनांतून संपादित केलेलें साहित्य या आघाडीच्या सदरांत वाचकांसाठीं देण्याचा मानस आहे.



युध्दकालीन आर्थिक धोरण व विकासयोजनेच्या काळांत अनुरूप आर्थिक धोरण यांत बरेंच साम्य आहे. उत्पादनास विशिष्ट वळण लावणें, उपभोगाचा संकोच करून बचत शक्यतोंवर वाढविणें, उत्पादनास आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या वस्तु व वाहतूक वगैरे साधनांचें वांटप नियंत्रित करणें, जीवनावश्यक वस्तू सर्वत्र, समप्रमाणांत योग्य भावांत सर्वांस उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणें, सरकारी कारभाराचा बोजा जनतेवर समप्रमाणांत पडेल, त्यायोगें आर्थिक विषमता वाढणार नाहीं अशी काळजी घेणें, या सर्व गोष्टी युद्धकाल किंवा विकासयोजनांचा काल या दोहोंत सारख्याच आवश्यक असतात. गेल्या दहा वर्षांत वरीलप्रमाणें नियोजनास योग्य असें धोरण अवलंबिलें गेलें असतें तर युद्धकालीन अर्थव्यवहारासाठीं आवश्यक असलेलें वळण लगेच देणें सोपें झालें असतें. विषमता वाढूं न दिल्यामुळें आणि भाववाढीस आळा घातल्यामुळें जनतेवरील बोजा सह्य झाला असता.

दुर्दैवानें याकडे दुर्लक्ष केलें गेलें म्हणून युद्धकालीन धोरणाच्या दृष्टीनें आतां प्राथमिक अवस्थेपासून सुरुवात करावी लागेल. ही सुरुवात युद्धकाळीं कोणतें आर्थिक धोरण इष्ट व आवश्यक आहे हें नीट कळून घेण्यापासून करावी लागेल असें दिसते. गेल्या कांहीं दिवसांत पुढाऱ्यांनीं ज्या घोषणा व जीं वक्तव्यें केलीं त्यांवरून युद्धकालीन आर्थिक गरजांची कल्पना स्पष्ट होत नाहीं. उदाहणार्थ, युद्धकार्यांत फंड उभारण्यास फार गौण स्थान द्यावयास हवें. युद्धाकरितां लागणारा खर्च राष्ट्रीय उत्पादनाच्या मानानें एवढा मोठा असतो कीं, सर्वांवर सक्तीनें बोजा टाकून तो भागवावा लागतो. राष्ट्रकार्यांत सर्वांनीं सहभागी व्हावें, युद्धप्रयत्नांत उत्साहानें भाग घ्यावा याकरितां भावनात्मक आवाहनें उपयुक्त ठरतील, पण नेहमींचा व्यवहार चालवयाचा तर यापलिकडे जाऊन सर्वांनींच सुसूत्र आणि कडक धोरण अवलंबिण्याखेरीज गत्यंतर नाहीं. युद्धकाळांत हाच मोठा धोका कीं, कडक धोरण अवलंबिण्यास सरकार तयार होत नाहीं. राष्ट्रांतील संपत्तिवान, सत्तारूढ व बलशाली वर्गांस हाताशीं धरून त्यांच्याच कलानें कारभार चालविण्याची प्रवृत्ति बळावते. नियोजनास योग्य असें धोरण आजवर अवलंबिलें गेलें नाहीं यांतहि कोणतेंहि कडक विशेषतः संपत्तिवानास अप्रिय अशा उपाययोजना हातीं न घेणें ही प्रवृत्ति प्रामुख्यानें होती.

डॉ. धनंजयराव गाडगीळ

# आणिबाणीच्या दोन महिन्यांतील

# आमची लोकशाही

चीनी आक्रमणानतर पंतप्रधान नेहरू यांनीं जनतेच्या दडपणापुढें माघार घेऊन श्री. कृष्ण मेनन याना मत्रिमडळातून व संरक्षणमत्रीपदावरून अर्धचंद्र दिला ही घटना लोकशाही संकेतांच्या दृष्टीनें कितपत योग्य ठरली हा एक विचाराचा प्रश्न आहे. गेल्या निवडणुकीत मेननच्या उमेदवारीला नेहरूनी हिरीरीनें पाठिंबा दिला. मेननचा पराभव म्हणजे स्वतःवर वैयक्तिक अविश्वास होय अशी कांहीशी आततायी भूमिकाहि नेहरूनी त्यावेळी घेतली. मेनन जर नेहरूंचेंच प्रतिनिधित्व करीत होते व मंत्रिमडळाचे निर्णय जर सर्व सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर एकमुखानें घेतले जात होते तर चीनविषयक धोरणाचें प्रायश्चित्त केवळ एकटया मेनन यांना भोगावयास लावणें इष्ट नव्हतें. चीनविषयक धोरणाचा पराभव हा पं. नेहरूनी आपला व आपल्या मंत्रिमडळाचा पराभव मानायला हवा होता व लोकशाही सकेतानुसार सर्वंच मत्रिमंडळानें राजिनामा सादर करणे अगत्याचें होते. मेनना निवडून आणणें हें नेहरूवरच्या विश्वासाचें प्रतिक होतें तर मेननना काढून टाकणें नेहरूच्या अविश्वासाचें प्रतिक मानलें जायला हवें होतें. अर्थात् राजीनाम्यानंतरहि देशाचें व सरकारचे नेतृत्त्वहि पंडितजीकडेच आलें असतें यात तिळमात्र शका नाही. पण असें असलें तरी सकेतानाहि काही महत्त्व आहे. जॉर्ज वॉशिंग्टन हा अमेरिकेचा पहिला लोकप्रिय अध्यक्ष अगदी एकमुखानें निवडून येतो हें पाहिल्यावर एक सभासद उठून आपला विरोध नोंदवितो, कां ? वॉशिंग्टन नको म्हणून नाही, तर भावनेच्या भरांत लोकशाही सकेताची व मूल्याची पायमल्ली होऊं नये म्हणून. एक ऐतिहासिक आदर्श निर्माण करण्याची संधि आमच्या जॉर्ज वॉशिंग्टनला लाभली होती. ती वाया गेली हें खरें आहे !

कदाचित् नेहरूंच्या मंत्रिमंडळाचे अनेकजिनसी स्वरूपहि अशा सोयीस्कर तडजोडीना कारणीभूत ठरत असावें. आज पाटील, मोरारजी ही उजव्या गटाची मडळी, नदा-शास्त्री, जगजीवनराम ही निव्वळ गाधी तत्त्वाची भोळी मडळी, मालवीय- मेनन-याच्यासारखे डाव्या गटाचे पुरस्कर्ते असे नेहरू मत्रिमडळाचें चमत्कारिक कडबोळें आहे. हें असे का याविषयी लिहितांना नेहरूचा एक चरित्र-लेखक डॉ. मायकेल ब्रिचर लिहितो—

" हें सरकार काँग्रेसचें आहे. काँग्रेसमध्यें जें मतप्रवाह आहेत त्या सर्वांचें प्रतिनिधित्व मत्रिमंडळात नेहरूंनीं ठेवलेलें आढळतें. ज्या शक्ती नेहरूविरोधी समजल्या जातात, त्यांनाहि मंत्रिमडळांत स्थान आहे. याचे कारण कदाचित् असे असेल कीं, मंत्रिमडळाबाहेर राहिल्यास याच शक्तींचा नेहरूंना अधिक उपद्रव होण्याची शक्यता आहे. सर्वांत महत्त्वाची बाब हीच वाटते कीं ज्या सहकाऱ्यांबरोबर नेहरूंनीं काँग्रेसचें राजकारण अनेक वर्षें केले त्याना वगळणें नेहरूना कठिण वाटते. "

एकदा अनेकजिनसी मत्रिमंडळाचा व्यवहार चालू ठेवल्यावर सध्याच्या आणिबाणीच्या प्रसगी त्यांच्या मर्यादा थोडया अधिक व्यापक का करतां येऊ नयेत असाहि एकहि प्रश्न पुढें उद्भवतो. विशेषत: ज्या व्यक्तींनीं व पक्षानी चीनच्या आक्रमक हेतूंची व चालींची अगदी प्रथमपासून कल्पना देण्याचा दूरदर्शीपणा व धैर्य दाखविलें त्या व्यक्तीचा किंवा पक्षांचा एखादा प्रतिनिधि मंत्रिमंडळांत घेणें पडितजीच्या उदारमतवादी धोरणाला साजेसें ठरलें असतेच; शिवाय राष्ट्रीय आघाडी बळकट करण्याच्या दृष्टीनेंहि या कृतीचा फार उपयोग होऊं शकला असता. एरव्हीच्या काळीं मेनन व मोरारजी एकाच मत्रिमंडळात नादू शकतात तर आणीबाणीच्या प्रसंगीं एखादा नाथ पै किंवा वाजपेयी याचेमुळें मत्रिमडळाचें ऐक्य फारसें धोक्यांत येण्याचा सभव नव्हता. आपलें हिटलरविषयक धोरण चुकलें हें ध्यानांत येताच हिटलरच्या उदयापासून या राक्षसी सकटाची इंग्लंडला सतत जाणीव देणाऱ्या चर्चिलला मंत्रिमंडळात पाचारण करण्यात चेंबरलेनला कांही सकोच वाटला नाही. आणि चेंबरलेन जाऊन चर्चिल आला तरी त्याने प्रथम जी गोष्ट केली ती ही, कीं ॲटलीना बोलावणें पाठवून ' बेव्हन, क्रिप्स इत्यादि कर्तबगार मजूरपुढाऱ्याची राष्ट्राला गरज आहे ' हें स्वच्छ सागून मत्रिमडळांत या मजूरपक्षीयाचा समावेश करून घेतला. पडितजीना हा उदारपणा दाखविणें कठिण नव्हतें. पण हीहि सधि हुकली असेच म्हणावें लागेल.

प्रोफेसर मॉरिस जोन्स यांनीं ' भारतातील लोकशाही ' या ग्रंथात माडलेला एक विचार मग आठवू लागतो. प्रा. जोन्स म्हणतात,



"लोकशाहीवर श्रद्धा निर्माण व्हावी, राष्ट्राचे निर्णय लोकसभेंत ठरावेत, हें देशाला शिकवण्याकरतां पंडित नेहरूंनीं उघडलेली एक शाळा असें आजच्या भारतांतील लोकसभेचें स्वरूप आहे. मात्र अजूनहि लोकशाही भारतांत रुजली आहे असें म्हणता येणार नाहीं. असें समजणें धोक्याचें आहे. भारतांतील आर्थिक उन्नति ही अधिक महत्त्वाची आहे. लोकांची सामाजिक व आर्थिक उन्नति लोकशाहीच्या मार्गानें होत आहें. अशी भारतीय जनतेची खात्री पटली तरच हा प्रयोग चालूं शकेल. जर विविक्षित काळानंतर त्याची दृश्य-फळें दिसलीं नाहींत तर हा मार्ग बदलण्यास जनता उद्युक्त होईल. कारण लोकशाही करता लोकशाही एवढा विवेक अजून भारतीय जनतेंत खोलवर रुजलेला नाहीं."

पंडितजींचें मनापासून लोकशाहीवर प्रेम आहे. म्हणून त्यांनीं लोकशाही शिक्षणाकरतां एक शाळा उघडली. पण आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांचेकडून लोकशाही व्रताचें कठोर आचरण घडणें न घडणें हें अखेरीस जागृत, सुबुद्ध व लोकशाहीनिष्ठ जनशक्तीवर अवलंबून राहणार. अशी जनशक्ति आगचेकडे नाहीं. म्हणून संकेतहि सोमीनुसार पाळलें गेल्यास नवल नाहीं.

मेनन प्रकरणामुळें एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली नेहरूंनंतर येणारा नेता केवळ नेहरूंच्या खास मर्जीतला व विश्वासांतला असून भागणार नाहीं. केवळ वैयक्तिक हुशारी व तडफ हेंहि भांडवल अपुरें आहे. जनतेशीं व आपल्या पक्षाशी त्याचे दाट जिव्हाळ्याचे संबंध असले पाहिजेत. त्याच्या मूलभूत प्रामाणिकपणावर जनतेचा विश्वास हवा. असा परस्पर विश्वास होच सर्व नैमित्तिक वादंगांतून व वादळांतून नेत्याला तारून नेणारी शक्ति असते. ही शक्ति नेहरूंजवळ भरपूर आहे. म्हणून अनेक बाबतींत जनता जरी नेहरूंवर नाराज असली तरी नेहरूंशिवाय अन्य कोणाला माळ घालायला ती तयार नाहीं. उलट हीच शक्ति मेनन यांचेजवळ कमी पडली. म्हणून नेहरूंसारखा समर्थ सखा पाठीराखा असतांनाहि त्यांची राजकीय नौका पहिल्याच वादळवाऱ्यांत दूर भिरकावली गेली.

● ● ●

ज्या शत्रूशीं आपल्याला दीर्घकाल मुकाबला करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे तो अंतर्गतदृष्ट्या कसा सुसंघटित झालेला आहे हे नीट ध्यानांत घेतलें तरच प्रतिकारासाठीं अवश्य तें राष्ट्रीय सामर्थ्य आम्ही उभें करूं शकूं. त्या दृष्टीनें हा लेख विचारांना चालना देणारा ठरावा.

# भारत आणि चीन

—आर्. के. पाटील

## चीनमधील समाजपरिवर्तन

चीन व भारत यांमधील भेद अगदी थोडक्यात सांगा. असें जर कोणीं म्हटलें तर त्याचें उत्तर, दोन शब्दात देतां येईल. सघटना व समाजवाद. चीन देशांत प्रत्येक धंद्यांतील–शेतकऱ्यापासून ते खाजगी धदेवाल्यापर्यंत व कारखान्यांतील मजुरांपासून ते रिक्षा-वाल्यापर्यंत– सर्व लोकांची सघटना असते. त्यामुळें प्रत्येक तऱ्हेच्या मजुरांचें मिळकतीचें प्रमाण काय, त्याचें जीवनमान कसे असतें, त्याच्या राहणीचा दर्जा जर सुधारावयाचा असेल तर काय उपाय-योजना केली पाहिजे. याचें विस्तृत विवेचन व तदनुसार योजना आखणें शक्य होतें. एवढेंच नव्हें, तर ही सरकारची जबाबदारी आहे असें समजण्यात येतें व तदनुसार तेथील सरकार वागतेंहि. भारतामध्यें जरी अशा संघटना असल्या तरी त्या संप, निदर्शनें, मागण्या वगैरे प्रस्तृत करणें यांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कामाला त्या एकत्र येत नाहींत. म्हणजे सघटनेतल्या व्यक्तीचें जीवनमान सुधरविण्याची जबाबदारी एकाच तऱ्हेनें पार पाडतां येते व ती म्हणजे सरकारशी किंवा मालकांशी भांडून. चीनमध्यें ही जबाबदारीच मुळीं सरकार घेते व नाना तऱ्हेने ती पार पाडण्याचा प्रयत्न करतें. एक-दोन उदाहरणें देऊन ही बाब स्पष्ट करतां येईल. पेकिंग शहरात रिक्षावाले पुष्कळच होते. त्यामुळें एक तर त्याची आमदनी वाढत नव्हती, व दुसरें म्हणजे सरकारनें नवीन ट्रॅम्स व बसेस सुरू केल्या. त्याच्यावर आणखी ताण पडत होता, तेव्हा त्यांची सख्या कमी व्हावी म्हणून अशी सूचना करण्यात आली कीं, त्याच्यापैकी अर्ध्या अधिक लोकानी सहकारी शेतीवर जाऊन बसावें. सरकारने त्याना शेती, अवजारें, राहण्याच्या सोयी व शेतीला लागणाऱ्या इतर सर्व सोयी व व्यवस्था पुरविण्याचें कबूल केलें. तरीहि ते पेकिंग शहर सोडा-वयाला तयार नव्हते, व पेकिंग शहरात दुसऱ्या कोणत्याहि धद्यांत त्याना गुतविणें शक्य नव्हतें. शेवटी, सरकारने एक जालीम उपाय अमलात आणावयाचें ठरविले. त्याला अनुसरून ट्रॅम्स व बसेस याचे दर फारच कमी केले. परिणाम असा झाला की, रिक्षात कोणी बसे-नासे झालें व रिक्षेवाल्यांची उपासमार व्हावयास लागली. तेव्हां शेवटीं ते शेतीवर जाण्यास तयार झाले. मग पेकिंग शहरवासियानीं एक मोठा समारंभ केला व स्पेशल गाडीमध्यें बसवून मोठ्या प्रेमानें त्यांना निरोप दिला. अशा तऱ्हेने प्रत्येक श्रेणीच्या मनुष्याला पुढील पाच वर्षांत आपल्या उत्पन्नात व राहणीत काय फरक होईल याचा पूर्ण अंदाज असतो याच विचारसरणीला अनुसरून चीनमध्यें, भिकारी व वेश्याव्यवसाय - याचें समूळ उच्चाटन करण्यात आलें आहे. भिकाऱ्याकरितां ठिकठिकाणी भिकारगृहें (बेगर होम्स) स्थापन करण्यात आलीं असून, त्यांतून त्यांना उपयुक्त काम देण्याची जबाब-दारी सरकारवर आहे. याप्रमाणे सपूर्ण चीन राष्ट्रांत त्यानी कारवाई केली. आता खरोखरच चीन देशांत भिकारीच दिसत नाहीत. भारतां-तून येणाऱ्या माणसाला तर त्याचें फारच आश्चर्य वाटतें. जरी कोण्या एखाद्या गरीबाला तुम्हाला काहीं देण्याची इच्छा झालीच तर तुमच्या सोबत जो कोणी चिनी नागरिक असेल तर तो एकदम तुम्हाला असें न करण्याबद्दल विनंती करील व सागेल कीं, 'एक तर यामुळें तुम्ही याचें चारित्र्य बिघडवाल व दुसरें आमचें सरकार या लोकाकरिता काही करीत नाहीं. हा निष्कर्ष यातून निघतो.'

वेश्याच्या बाबतींतसुद्धा चिनी सरकारनें फार मूलगामी व अत्यत व्यापक अशी कारवाई केली. शाघाय शहराचेंच उदाहरण घेऊं. प्रत्येक वेश्येची शिरगणती, पत्ता इत्यादि माहिती गोळा करण्यात आली व एकाच वेळी सर्व वेश्यांना त्याच्याकरिता मुद्दाम तयार कर-ण्यात आलेल्या खास वसतिगृहात नेऊन ठेवण्यात आलें. असें सांगतात की, त्यापैकीं कित्येकींना आपल्या व्यवसायाची इतकी सवय झाली होती की, त्याच्या अभावी त्या भ्रमिष्टासारख्या वावरायला लागल्या. परतु, वसतिगृहाच्या व्यवस्थापक-वर्गानें या बाबतीत कोणत्याहि तऱ्हेचा कमजोरपणा दाखविला नाहीं. त्या वसतिगृहांत तेथील स्थायिकाना नाना तऱ्हेचे उद्योग शिकवण्यात आले व कारागीर, शिक्षिका व गृहिणी अशा सर्व तऱ्हानी तेथील वासितांना पुन्हा समा-जात मानानें राहता आले.

श्री. आर्. के. पाटील यांनीं आय्. सी. एस्. अधिकारी म्हणून इंग्रजी अमदानींत अनेक अधिकारांच्या जागावर कामें केलीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते मध्यप्रदेशांत शेतकी व विकास मंत्री म्हणूनहि अधिकारारूढ होते. १९५६ मध्यें योजना समितीनें (Planning Commission) श्री. पाटील यांच्या नेतृत्वाखालीं एक अभ्यास-मंडळ चीनच्या विकासकार्याची पाहणी करण्याकरतां पाठविलें. या पाहणीच्या अहवालावरूनच श्री. पाटील यांनीं आपला 'भारत आणि चीन' हा प्रख्यात ग्रंथ नंतर तयार केला. हा लेख या ग्रंथांतील संकलनावर आधारित आहे.

## आमचें कमजोर शासन

मनात वारवार प्रश्न हा उठतो कीं, त्या सुधारणा आम्हीं आमच्या देशात का घडवून आणू नयेत ? ह्या वर्गाबद्दल आमच्या समाजांत व त्यामुळें आमच्या सरकारांनाहि कमी-कळकळ आहे हेंच याचें एकमेव कारण आहे किंवा नाही ? 'आम्हीं काय करावें,' ह्या गोष्टी करण्याकरितां जी जनमनाची तयारी असावी लागते ती आज नाही, त्यामुळें आपण ज्या त्वरित गतीनें पुढें जावयाला पाहिजे त्या गतीनें जात नाही हें आज सरकारतर्फेचें उत्तर आहे. परतु कल्याणकारी राज्य म्हटल्यानंतर जनमनाची तयारी करणें हीसुद्धा सरकारचीच जबाबदारी होऊन बसते. आज आम्ही असा पुढाकार घेत नाही, म्हणूनच आमचें शासन कमजोर आहे. शासनापुढें लक्ष ( Objective ) नाही म्हणूनच शासनात जबाबदारी नाहीं. आजच्या शासनाची परिस्थितीच ही आहे की, कल्पनेप्रमाणें सुधार झाला नाहीं किंवा काही बिघडले तर त्याची निश्चित जबाबदारी कोणावरच टाकता येत नाही. ही जबाबदारी वरपासून खालपर्यंत राहण्याकरिता व निश्चितपणे तिचे विभाजन होण्याकरिता शासनाच्या प्रत्येक अगानें काही निश्चित लक्ष्यें आपल्यासमोर ठेवली पाहिजेत. म्हणजे पुढील वर्षी आम्ही इतक्या शाळा उघडू, एवढेंच जर लक्ष असले तर शाळेच्या इमारती कदाचित् अस्तित्वात येतील पण त्यात विद्यार्थी राहणार नाहीत व विद्यार्थी असले तर योग्य शिक्षण देणारे शिक्षक राहणार नाहीत. असला अनुभव आपल्या विकासकार्यात पुष्कळदा येतो. विद्यार्थ्यांकरिता आखाडे बाधले पण त्यात शेळ्या-बकऱ्यांचें वास्तव्य आहे. म्हणून अतिम लक्ष शाळांच्या बाबतीत म्हणजे, विविध अवधीत निश्चित सख्येंत विद्यार्थी नियोजित शिक्षणमान घेऊनच बाहेर पडतील. सहकारी शेतीत अमुक टक्के जास्त उत्पादन व समितीतील प्रत्येक व्यक्तीच्या उत्पादनात वाढ अशीं आमची लक्ष्यें असली पाहिजेत. म्हणजे मग खुर्चीवर बसून हुकूम सोडण्याची प्रवृत्ति जाऊन शासनात लागणारी वास्तवता आपोआप निर्माण होईल. आज तर पगार घेऊन कसल्याहि तऱ्हेची लक्षपूर्तीची जबाबदारी आमच्या अधिकारीवर्गावर नसल्यामुळें त्याना केव्हाहि अग झटकता येतें ही दु:खद समस्या पदोपदी नजरेला येते आहे. अर्थात् त्याचबरोबर काम झाले नाहीं तर सबधित अधिकाऱ्याला कामावरून दूर करणे व ही जाणीव त्याला करून देणे की, तो अगिकृत जबाबदारी पार पाडू शकला नाही, हें ओघानेंच आले. हें जर योग्य तऱ्हेनें व्हावयाचें असेल तर सरकारी नोकरांना जास्त शिस्त, जास्त कर्तव्याची जाणीव व कामात चुकारपणा केल्यास जबर शिक्षा मिळते हो जास्त भीति. ह्या तिन्ही बाबींचा आजच्यापेक्षां जास्त प्रमाणांत प्रादुर्भाव झाल्याशिवाय लक्षपूर्ति करूं शकेल असें शासन निर्माण होणेंच शक्य नाहीं.

### ध्येयवादी नेतृत्वाचा अभाव

आज ज्या नोकरशाहीचें आपण वारस झालो आहोत तिची घडण परकीय सत्तेच्या अमदानीत झालेली आहे. त्या अमदानीतले वैशिष्टय हें होतें की, शासकापुढें दृष्टिकोन राज्य चालविण्याचा होता. राज्यातून लोकाचें कल्याण कसे होईल हा दृष्टिकोनच नव्हता. अगोदरच सरकारी नोकराची विचारसरणी म्हणजे आहे तसे चालू ठेवण्याची, त्यांतल्या त्यांत राज्यकर्त्यांचा नवीनतेवर कटाक्ष, अशा वातावरणांत वाढलेली आजची नोकरशाही आहे. तेव्हा तिच्याकडून लोकाच्या विकासाबाबत किंवा समाजवादी समाजरचना आणण्याच्या दृष्टीनें काही पुढाकार घेतला जाईल हे फारसे सभवत नाही. हुकुमाचे ताबेदार हीच त्याची वृत्ति व हीच त्याची निष्ठा. तेव्हा त्यानीं काय करायचे हें नेमून देणारे, लोकानीं निवडून दिलेल्या प्रतिनिधीना जबाबदार असलेले मत्रिमंडळच, पण मत्रिमडळाजवळच जर असा ध्येयवादी कार्यक्रम नसेल तर मग काय व्हावयाचें ? अशा परिस्थितीत सरकारी नोकरवर्गाचें प्रभावी नेतृत्व जें मत्रिमडळाला करावयाला पाहिजे तें होत नाही. उलट बऱ्याचश्या खात्याच्या बाबतीत नोकरवर्गाच्याच नेतृत्वावर मत्र्याला अवलबून रहावें लागतें. यामुळे मत्री व त्याच्या खात्यांतील नोकरवर्ग याच्या ज्या पारस्परिक सबधाची अपेक्षा लोकशाहीत असते तिच्या अभावामुळें आजच्या लोकशाही शासनातून जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पुऱ्या होऊ शकत नाहीत. बरें, एकाच श्रेणीतील सरकारी नोकरामध्यें पारस्परिक मित्रत्व, सहकार्याची भावना ही तरी बऱ्याच प्रमाणात असावी तर तेंहि दिसत नाहीं. व्यक्तिगत हेवेदावे, मनाचा सकुचितपणा हे फार बोकाळलेले आहेत. विशेषतः सामुदायिक दृष्टिकोनाचा अभाव असल्यामुळें सघश: आपणाला काही घडवून आणावयाचें आहे ही भावना नाही. त्यामुळें व्यक्तिगत विचाराचें प्राबल्य जास्त. प्रत्येक सरकारी नोकराला मी वर कसा जाईन याची, माझेंच काम जास्त चागले कसे होईल यापेक्षा काळजी.

### सुधारण्याची दिशा : पगारकपात, नोकरकपात

हें सर्व जर दूर व्हावयाचें असले तर पहिल्या प्रथम सरकारी नोकराच्या क्षेत्रात पगारामध्यें भलतीच विषमता आहे ती काढली पाहिजे. एका कारकुनाला ७०–८० रुपये जेमतेम पडतात. पण एका सेक्रेटरीला ३००० रुपये महावार द्यावे लागतात. ही परिस्थिति सरकारी कर्मचाऱ्यात सहकार, बधुभाव ह्याचा प्रादुर्भाव होऊ देत नाही. निरनिराळ्या हुद्याच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या आहेत व त्यानुसार पगारात भिन्नता असावी हें तत्त्व मान्य केल्यानतर एवढा फरक असह्य वाटतो. ह्यामुळें अवास्तवता, आपल्या शहाणपणाविषयीं खोटी प्रतिष्ठा, अहमन्यता ही वाढून सरकारी नोकराचें लक्ष आपल्या

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसे | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगावकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | „ | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | „ | ०.२५ |
| विद्यालकार | प्रभाकर इनामदार | १.३० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात तुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दाडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| बडबडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङ्मयविलास | „ | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट (काव्य) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो. उदापुरे | ३.०० |

| | | |
|---|---|---|
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दाडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | „ | ६.०० |
| पूर्णामायचीं लेकरं | „ | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा (नाटक) | „ | ०.५० |
| शितु („) | „ | २.०० |
| पवनाकाठचा धोंडी („) | „ | २.५० |
| उद्धव („) | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्याचें सिंहासन („) | गो. कृ मुगशीकर | २.०० |
| गाजलेले जीव भाग १ ते ४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | „ | २.५० |
| पाताळलोकची अद्‌भुत यात्रा | „ | ३.०० |
| चितोऱ्याचा प्रताप | „ | २.०० |
| हिंमतवान जासूद | „ | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरची माणसे | शातारा‍म | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशंकर पंडित | १.५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | „ | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | भ. श्री. पंडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३.०० |
| ज़ळातील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४.०० |

कामापेक्षां वरच्या हुद्याकडेच लागतें. याशिवाय एवढा मोठा फरक असताना हीच नोकरशाही समाजवादी, समाजरचना, अस्तित्वात कशी आणू शकेल ? तेव्हां याच्या श्रेणी कमी करून वरच्या आणि खालच्या पगारातील विषमता बरीच कमी केली पाहिजे. त्याच बरोबर सरकारी नोकरांच्या संख्येंत आज जी जंगलासारखी वाढ झालेली आहे तीहि कमी करावी लागेल. दिल्लीला गेल्यावर ही तक्रार नेहमी एकू येतें कीं, 'सेक्रेटरीएटमधील जर एकतृतियांश कारकून कमी केले तर कामाचा उरक चांगला होईल व कार्यक्षमता वाढेल.' आश्चर्य अर्थातच या गोष्टीचें वाटतें की, अगदीं जबाबदार लोक असे विधान करतात व जेव्हां त्यांना विचारावें कीं, यांत सुधारणा कांहीच कां होत नाहीं, तेव्हां तें समाधानकारक उत्तर देऊं शकत नाहीत. हीच बाब चपराशींबाबतहि तितकीच खरी आहे. पहिले ते निदान आपल्या ऑफिसरच्या घरीं काम करीत असत. परंतु आतां तेंहि बंद झाल्यापासून तर त्यांना कामच नसल्यासारखें झालेलें आहे. सेक्रेटरीएटमध्यें रिकामें बसलेल्या अशा लोकाकडे पाहून आपल्या संघटन-कौशल्याबद्दल विषाद वाटतो. यांत शंका नाही की, काम करण्याच्या पद्धतीत बरीच सुधारणा होण्यासारखी आहे. प्रत्येक मनुष्याकडून आजच्यापेक्षां जास्त व व्यवस्थित काम होणे शक्य आहे. कल्याणकारी राज्यांत सरकारचें कार्यक्षेत्र वाढणें स्वभाविक आहे. परंतु जर त्याबरोबरच कार्यक्षमता वाढली नाही, किंवा तीत ऱ्हास व्हायला लागला, तर वाढत्या करवाढीतून मिळणाऱ्या पैशाचा अपव्ययच होईल.

## आदर्शवादी जनसेवक पक्ष

या सर्वांच्या मूळाशी देशांत जे राजकीय पक्ष असतील, त्याची तर जबाबदारी फारच मोठी आहे. तेच देशाच्या विचाराला वळण लावूं शकतात. जो पक्ष निवडणुकीत सफलता पावेल त्याचेंच सरकार बनत असल्यामुळें आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्याला अनुसरून लोकांकडून कार्य झालें पाहिजे ही जबाबदारी त्यांची आहे. गावोगांव व खेडोखेडीं त्यांच्या शाखा असून पक्षाच्या विचारसरणीप्रमाणे प्रभावी लोकमत बनविणें हें त्या राजकीय पक्षांचें कर्तव्य आहे. लोकांचे विचार आज काय आहेत. पुढें जाण्याची दिशा कोणती, त्याप्रमाणे कोणत्या क्रमाने लोकमत तयार केलें पाहिजे, कोणत्या सुधारणा लोकाना पचतील, व कोणत्या पचवायला लोकमत तयार करावे लागेल या सर्व बाबीच्या चर्चा अगदी खालपासून वरपर्यंत जेव्हा होईल तेव्हाच पक्षसंघटनेला काही मूर्त स्वरूप येईल. आजचे पक्ष केवळ मतें मिळविण्याच्या संघटना आहेत. निवडणुका संपल्या की, पक्षाचें काम संपले व निवडणुकीतसुद्धां प्रत्येक खेड्याची आज अशी परिस्थिती आहे कीं, कांही ठराविक लोक आपल्याला अनुकूल असले कीं संपलें ! सर्व गांव त्याच्या पाठीमागें येतें, म्हणजे व्यक्तिगत मतदारांचा संबंध निवडणुकीच्या प्रचारात क्वचितच येतो. पक्षाची प्रभावी संघटना होण्याकरितां पक्ष आदर्शानें भारलेला असला पाहिजे. आज तो राजकीय महत्त्वाकांक्षेनें भारलेला आहे. त्याचें रूपांतर आदर्शवादी जनसेवक पक्षात कसें करावयाचे हा एक मोठा प्रश्न आजच्या पक्षनेत्यांपुढें आहे. राजकीय पक्ष व सरकारी नोकरशाही हे दोन्ही मिळून देशांतील सत्ताधारी वर्ग बनलेला आहे. आज दोन्हीहि आपापल्या परीनें सत्ता व पैसा यांच्या पाठीमागें लागलेले आहेत. अशा परिस्थितीत आदर्शवादाकडे देश झुकणार कसा ? नेत्याच्याच आदर्शवादी आचारांतून जनता आदर्शवादी होणार की नाही ? नेत्याची मोठी राहणी, मोठे पगार, बँकेंतील मोठे साठे हीच जर आदर्शवादाची लक्ष्यें होऊन बसली तर लोकहि त्याच मार्गानें जाण्याचा प्रयत्न करतील. आज याच गोष्टींना किंमत आहे. हेंच लोकांचें ध्येय होऊन बसलें आहे. खेड्यापाड्यातून जी पक्षाची शक्ति आज आधारलेली आहे तीहि अशाच लोकांच्या प्रतिष्ठेवर व आर्थिक शक्तीवर. हें सर्व खासच बदलावयाला पाहिजे. जे सहकारी शेती सफलतेनें चालवून दाखवतील, किंवा अशाच तऱ्हेचें विधायक कार्य जे करतील, व अन्य तऱ्हेनें समाजाच्या परिवर्तनाची इच्छा दाखवितील त्यानाच समाजवादी समाज–रचनेला वाहिलेल्या पक्षात स्थान मिळालें पाहिजे !

• • •

आर. के. पाटील

भारत आणि चीन

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाळा जेव्हां पुरत्या विझल्याहि नव्हत्या, युद्धाच्या खाईंत अवघी युरोप जेव्हां भाजून निघालेला होता आणि पुन्हा युद्ध होऊं नये म्हणून जगांतल्या शांततावादी राष्ट्रांचें धुरीण जेव्हां युनायटेड नेशन्सच्या उभारणींत गर्क होते त्यावेळीं स्टॅलीन आपल्या सहकाऱ्यांना बजावीत होता, **" फक्त पंधरा ते वीस वर्षं...आणि हा युद्धाचा खेळ पुन्हा आपल्याला खेळायचा आहे. "**

या युद्धपिपासू सुलतानाची नांवनिशाणीहि रशियांतून उखडून टाकण्याची मोहिम नव्या राज्यकर्त्यांनीं हातीं घेतली आहे. पण स्टॅलीनचें पाणी पेकिंगच्या वळणावर निघालेलें आहे. स्टॅलीनला अभिप्रेत असणारें युद्ध त्याचे हे नवे अनुयायी जगावर लादतात काय अशी भीति उत्पन्न करणाऱ्या घटना घडूं लागल्या आहेत.

जिलास यांच्या Conversations With Stalin या ग्रंथाचें म्हणूनच यासाठीं विशेष महत्त्व.

आज जिलास (D'iles) याचें वय ५१ वर्षांचें आहे. १७ एप्रिल १९६२ ला युगोस्लाव्हियाचा अध्यक्ष मार्शल टिटो यानें त्याची पुनः तुरुंगांत रवानगी केली. त्याला त्यापूर्वी १९५५ मध्यें भयानक प्रचाराच्या आरोपांखालीं तुरुंगांत टाकण्यांत आलें होतें. तुरुंगांत असतांनाच त्यानें हंगेरींत कम्युनिस्टांनीं लोकांना जीं कंठस्नानें घातली त्याचा निषेध केला आणि या नव्या गुन्ह्याबद्दल त्याची शिक्षा तीन वर्षांनीं वाढविण्यांत आली. तुरुंगांतून सुटल्यावर त्यानें आपला The new class हा ग्रंथ प्रसिद्ध केला आणि त्याला पुनः तुरुंगांत टाकण्यांत आलें. ही शिक्षा भोगून तो सुटला आणि त्याचें Conversations with Stalin हें प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध होण्याची कुणकुण टिटो सरकारला लागताच पुनः १७ एप्रिल १९६२ ला त्याला पुनः तुरुंगांत डांबण्यांत आलें.

जिलासचा मान युगोस्लाव्हियांत टिटोच्या खालोखाल होता. युगोस्लाव्हियाच्या स्वातंत्र्यलढ्यांत त्यानें टिटोच्या खालोखाल भाग घेतला. हा लढा चालू असतानांच १९४४, ४५ व ४६ सालीं निरनिराळ्या शिष्टमडळांतून युगोस्लाव्हियाच्या सरकारनें जिलासला मॉस्कोंत पाठविलें. प्रत्येक खेपेस त्याची स्टॅलीनशी बादशाहीं इतमामांत गांठ पडली. या गांठींभेटींत त्याला घडलेल्या स्टॅलीनच्या दर्शनानें हें चित्रण वाङ्मयदृष्ट्याहि उच्च प्रतिचें आहे. कारण राजकारणांत पडण्यापूर्वी बेलग्रेड युनिव्हर्सिटींत त्यानें कथाकार व कवि म्हणून ख्याति मिळविली होती.

●●●

# मी पाहिलेला लाल हुकूमशहा



रा. म. शास्त्री



“ही लढाई पूर्वीच्या युद्धाहून वेगळी आहे. जो जो भू–भाग ज्याच्या ज्याच्या अंमलाखालीं येईल त्या त्या भू–भागावर त्या त्या राष्ट्राची जीवन-प्रणाली लादली जाईल.”

मार्शल स्टॅलिन हें बोलत असतांना कुणीतरी म्हटलें कीं, जर्मनांना पुन: डोकें वर काढणें निदान पन्नास वर्षें तरी आतां शक्य नाहीं. हें ऐकतांच स्टॅलिन ओरडून म्हणाला.–“ हा भ्रम आहे! ते पुनः उठतील, फार थोड्या दिवसांत पुन: उठतील. अत्यंत प्रगत असे कारखानदारी कामगारांनीं भरलेलें तें राष्ट्र आहे. त्यांच्या अंगांत भरपूर कसब आणि कर्तृत्व आहे. फक्त दहा–बारा वर्षांची उसंत मिळण्याचा अवकाश –ते उठलेच म्हणून समजा. म्हणूनच स्लाव वंशाच्या लोकांचें एकत्रिकरण व्हायला हवें. एकदां स्लाव लोकांचें एकत्रिकरण भक्कम उभें राहिलें कीं कुणाची डोळा वर करण्याची हिंमत होणार नाहीं...”

बोलतां बोलतां मध्येंच स्टॅलिन एकदम उभा राहिला. हातानें चोळणा वर ओढीत, जणु आतां कुणावर झडप घालणार आहे अशा अवसानांत त्यानें आवेशानें गर्जना केली.

“हें युद्ध आतां संपल्यासारखेंच आहे. पंधरा ते वीस वर्षांत या युद्धांत झालेली हानि भरुन काढण्यांत येईल. आणि मग पुन: एकदा हा खेळ आपल्याला खेळावयाचा आहे–”

एकोणीसशें शेहेचाळीसच्या काळांत स्टॅलीननें उच्चारलेले हे भयानक शब्द, सध्यां मार्शल टिटोच्या तुरुंगांत कोंडलेले युगोस्लाव्हियाचे एक कम्युनिस्ट नेते मिलोवन जिलास यांनीं “Convesation wirh Stalin” (स्टॅलिनशी झालेले संवाद) या आपल्या पुस्तकांत नमूद केले आहेत.

पुस्तकाच्या प्रस्तावनेंत जिलास लिहितो–

“माणसाच्या स्मृतीचा हा विशेष आहे कीं, ज्या गोष्टी नंतर घडलेल्या घटनांनीं महत्त्वाच्या ठरत नाहीत त्या विसरल्या जातात. परंतु हेंदेखील एक वैगुण्यच म्हणावें लागेल. कारण अशा पूर्वग्रहदूषित वृत्तीमुळें भूतकालांत जमा झालेल्या घटनांची सांगड आवश्यकतेप्रमाणें वर्तमानाशी व पुढल्या आशा–आकांक्षाशीं घालण्याची खेंचाखेंच सुरू होते. या घोटाळ्याची दखल घेऊन मीं या पुस्तकांत जे सत्य आहे तें जसेंच्या तसें पुढें ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळें जर यदाकदाचित् हें पुस्तक माझ्या आजच्या विचारामुळें दूषित झालें असें कुणाला वाटलें, तर त्याचा दोष माझ्या आजच्या पूर्वग्रहांकडे व असूयेकडे न देतां तो दोष माणसांच्या स्मृतीचाच समजावा.”

“मी असें मानतों कीं, माणसामाणसांचे परस्परांतील संबंध हे कोरड्या सत्यापेक्षां अधिक बोलके आणि महत्त्वाचे असतात. आणि म्हणून मीं या संबंधाच्या चित्रणाला महत्व दिलें आहे.”

स्टॅलिनच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याची एक लाट अलिकडे उसळली आहे. त्यांतलाच आपलें पुस्तक हा एक भाग आहे असें मानून त्याचें महत्व लोकांनीं कमी लेखण्याचा संभव आहे हा धोका जिलासने ओळखला आहे आणि म्हणूनच प्रस्तावनेंत त्यानें पुढें बजावलें आहे–

“स्टॅलिनसंबंधीं आज फारच परस्पर विरोधी माहिती सांगितली जात आहे. अशा स्थितींत मीं पाहिलेला स्टॅलिन मला जसाचा तसा डोळ्यांपुढें अजून दिसत असल्यामुळें या पुस्तकाच्या शेवटीं मला या वादळी व्यक्तीसंबंधीं माझें स्वतःचें म्हणणं मांडणें आवश्यक वाटलें. माणसासंबंधीं आणि त्याच्या परस्पर संबंधासंबंधीचें सत्यकथन हें कितीहि संपूर्ण आणि योग्य रीतीनें केलें तरी तें सत्य अखेर त्या विवक्षित काळांत तीं माणसें वावरलीं त्या काळापुरतेंच मर्यादित असतें ही गोष्ट विसरता येणार नाहीं.”

दुसऱ्या महायुद्धांत जर्मन व इटालियन सैनिकांनीं युगोस्लाव्हियाचा कबजा घेतल्यानंतर युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्ट पक्षानें देशाची दास्यांतून मुक्तता करण्याकरतां जें देशभक्तांचें गनिमी काव्यानें लढणारें सैन्य उभें केलें, त्यानें युगोस्लाव्हियाच्या स्वातंत्र्य-लढ्यांत महत्त्वाची कामगिरी केली. जरी या पक्षाचा शत्रूशी मुकाबला चालू होता तरी आपला लढा हा जागतिक कम्युनिस्ट लढ्याचा एक भाग

आहे आणि त्यामुळे त्याचा सोविएट रशियाशी घनिष्ट संबंध असला पाहिजे ही भावना या पक्षनेत्यात होती. कम्युनिस्ट पक्षाचें जें अंतर्वर्तुळ ( High Command ) असतें त्याला Political Bureau किंवा Politburo ( पॉलिट ब्यूरो ) ही संज्ञा आहे. युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्यूरोचे समासद याचमुळें मॉस्कोशी रेडिओद्वारा संधान राखून लढत होते.

युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्ष जर्मनांशीं लढत होताच. परंतु दास्यमुक्तीनंतर जें सरकार अस्तित्वात येणार तें कम्युनिस्ट विचारसरणीचें असलें पाहिजे या दृष्टीनें त्यांची तयारी चालू होती म्हणजे या स्वातंत्र्य-लढ्याच्या पोटांत एक अतर्गत क्रातीहि छपलेली होती. यामुळें जो देशभक्त आहे परंतु कम्युनिस्ट नाही, तो उद्याचा आपला शत्रु आहे याची पक्की गांठ बाधून हा पक्ष लढत होता.

मास्कोमधील युद्धकालीन नेत्याना युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षानें चालविलेल्या अतर्गत क्रातीच्या प्रयत्नासबधी एकतर अपेक्षा नव्हती आणि विश्वासहि नव्हता. जो जो जर्मनांच्या विरूद्ध लढतो तो तो आपला आजचा मित्र आहे हेच धोरण रशियाला त्यावेळी फायद्याचें होते, आणि याच दृष्टिकोनामुळें मॉस्को आणि युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाचे पोलिटब्यूरो यांच्यामधें विसवाद उत्पन्न झाला. म्हणजे युगोस्लाव्ह सारख्या देशानें अत्यत आणिबाणीच्या काळांत जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा विचार करणें जर मास्कोच्या मातबर कम्युनिस्ट हुकूमशहांना सोईचें नसेल तर त्या चळवळीला मास्कोचा मनापासून आशीर्वाद नसतो. या विसंवादाची चाहूल जिलासला प्रथम लागली तो प्रसग त्यानें सांगितला आहे.

" १९४३ चा तो मार्च महिना होता. युगोस्लाव्हची सुप्रीम कमांड व जर्मन युद्धनेते यांच्यामधें युद्धकैद्यांच्या देवाण-घेवाणीचीं बोलणी पुरीं होत आली होतीं. याचा मुख्य फायदा एवढाच होता कीं युगोस्लाव्हमधील कम्युनिस्ट देशभक्तांना पकडल्यानतर द्रोही म्हणून जी कत्तल करण्यांत येत असे ती थांबून आतरराष्ट्रीय न्यायाप्रमाणें त्याना युद्धबदी म्हणून वागवले जाण्याची ही नांदी होती. खरे पाहता मॉस्कोला ही गोष्ट कळवावयास हवी होती. परंतु टिटो व रँनकोविक या आमच्या नेत्याना हेंच वाटत होतें की, मास्कोला आमच्या सैन्याला मिळणारी ही अधिकृति आवडणार नाहीं. मास्कोला आम्हीं फक्त एवढेंच कळवले की, जर्मनीशीं बोलणी सुरू आहेत. परंतु मॉस्कोने आमच्या परिस्थितीचा यत्किंचितहि विचार केला नाही. आम्ही देशाकरतां रक्ताच्या नद्या वाहवल्या त्याचीहि त्यांना कदर नव्हती. मॉस्कोने याबाबतीत आम्हाला जी वागणूक दिली त्या संबधी मार्शल टिटोनें काढलेले उद्गार मला आठवतात. रामा नदीच्या तीरावर आमचा तेव्हा मुक्काम होता. टिटोने सागितलें, "आपल्या सैन्याचा आणि आपल्या लोकाचा विचारच आपल्याला केला पाहिजे. तेंच आपलें कर्तव्य आहे ! "

त्या काळी कम्युनिस्टांच्या आजवरच्या वाटचालीप्रमाणे युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाचें स्टॅलिन हेच दैवत होतें. त्याची प्रत्येक कृति ही समर्थनीय ठरविण्याचा सर्वांचा अलिखित करारच होता म्हणाना ! फिनलडवरची रशियाची स्वारी, मॉस्को येथील हुकुमशहाच्या टोळीत वेळोवेळीं होणाऱ्या हकालपट्ट्या आणि नेत्याची वासलात या सर्वांचें समर्थन करणे हेंच पार्टीचे कर्तव्य समजलें जाई. जिलास सागतो—

" स्टॅलिनची मते, त्याची मतें माडण्याची पद्धति, त्यातले शब्दाचें लालित्य, त्याची तर्कशुध्दता, या सर्वांची मी भाषणांतून वाहवा करीत असे. जणू काय त्याचा प्रत्येक शब्दन्‌शब्द हा साक्षात् सरस्वतीचाच शब्दझंकार होता. जर ती वक्तव्यें अन्य कुणाची म्हणून माझ्यापुढें आली असती तर त्याच वक्तव्यांना मी अत्यंत रटाळ व ग्राम्य शब्दाचं भेंडोळें म्हणून त्याची संभावना केली असती. खरें पाहतां आम्हां युगोस्लाव्ह कम्युनिस्टांच्या बाबत जें घडत होतें तेंच सर्व ठिकाणीं लागू होतें. मानवाचा इतिहास पाहिला तर ज्यांनीं ज्यांनीं आपले मानवाचें भवितव्य एकाच विशिष्ट कल्पनेला टांगून ठेवलें त्यांच्या त्यांच्या बाबतींत हाच बुध्दिविक्रय त्यांच्या नशिबांत येतो. "

युगोस्लाव्ह देशभक्ताच्या सुप्रीम कमांडकडे जें पहिलें लष्करी शिष्टमडळ आले तें ब्रिटिशाचें होतें. १९४३ च्या मे महिन्यांत पॅराशूटच्या सहाय्याने त्यानीं सुप्रीम कमाडशी सबध प्रस्थापित केला. सोविएट रशियाचें लष्करी मडळ त्यानतर दहा महिन्यांनीं म्हणजे फेब्रुवारी १९४४ मध्यें युगोस्लाव्हियात गेले.

## शिष्टमंडळाची तयारी

एक युगोस्लाव्ह शिष्टमंडळ परतभेटींसाठीं इग्लंडला धाडण्यांत आले होते. त्याच न्यायानुसार आतां एक लष्करी मडळ मॉस्को वारीसाठी निघणार होतें. परंतु ब्रिटिशाकडें पाठवलेल्या मडळाचे उद्देश व मॉस्कोला जाणारें मडळ याचा उद्देश यात फार अंतर होतें. हें मंडळ एका कम्युनिस्ट देशांतून दुसऱ्या कम्युनिस्ट देशांत जात होतें. एवढेंच नव्हे तर तें कम्युनिस्टाच्या गगोत्रीला जात होतें. या मंडळावर जाण्यासाठीं मार्शल टिटो यानें जनरल टेरझिक् यांचेबरोबर जिलासची निवड केली. सर्वजण लष्करी गणवेषांत असले तरी जिलास हा कम्युनिस्ट पार्टींतील सर्वोच्च मंडळाचा सभासद असल्यामुळें त्याच्यावर विशेष जबाबदारी होती. शिवाय जिलासला रशियन भाषा उत्तम अवगत होती. यापूर्वी कधीच त्याने रशियांत पाऊल ठेवलेलें नव्हतें व या दृष्टीनें कसलाच पूर्वग्रह त्याचेपाशी नव्हता.

मार्च १९४४ च्या सुरुवातीस या लष्करी मडळानें प्रस्थान ठेवलें.

या मडळापुढें जीं अनेक उद्दिष्टें होतीं, त्यातलें एक रशियाकडून परतफेडीच्या बोलीवर दोन लाख डॉलरचे कर्ज मागणें हा होता. ही मदत परत फेडण्याच्या मुद्यावर टिटोचा खास आग्रह होता. दुसरा हेतु असा होता की, जी राष्ट्रीय समिति युगोस्लाव्ह देशभक्ताच्या सैन्याचे अधिपत्य करीत होती तिला स्वतत्र युगोस्लाव्हचें सरकार म्हणून रशियाची मान्यता मिळवावयाची.

जिलास प्रयाणाची हकिगत सांगतो—

" मला निरोप देताना टिटोनं सागितलं, कीं डिमिस्ट्रोव्हकडून किंवा स्टॅलिनशी मुलाखत झाल्यास स्टॅलिनकडून एका गोष्टीची शहानिशा करून घे— आपल्या ' पार्टीच्या कामासबधी मॉस्कोंत काहीं असमाधान नाहीं ना ! '

" मी आता लवकरच रशियांत पाऊल ठेवणार या विचाराने माझ्या अगावर रोमांच उठत होते,

" आमचा पहिला मुक्काम इटलीमध्यें बारी इथं झाला. इथें युगोस्लाव्ह सैन्याचा माठा तळ होता. तिथून आम्ही वाट वाकडी करून ट्यूनिसला गेलो. कारण, त्यावेळी ग्रीस व क्रीट्वर जर्मनांचा कबजा होता.

"एका सोविएट विमानातून आम्ही ट्यूनिसहून रशियाला जाण्यास निघालों.

" मॉस्को शहरावर अवकळाच होती. तिथल्या इमारती फारच सामान्य होत्या. आमचं स्वागतहि आम्ही कम्युनिस्ट देशाकडूनच आल्यामुळं फारस शाही थाटाचं नव्हतं. परंतु मानवजातीच्या मुक्तते-करता आम्ही जो अखेरचा लढा लढत होतो, त्याच्या विचारापुढें आम्हाला सर्वंच गोष्टी सुसह्य वाटत होत्या. हीच ती भूमि. जी आमची होती, आणि मानवजातीची होती, याच भूमीवरून भांडवल-शाही विरुद्ध जीवन-मरणाचा लढा खेळला जात होता.

### मंडळ माशा मारूं लागलें

कम्युनिस्ट तत्त्वज्ञानानें भारलेलें हें शिष्टमंडळ रशियांत येऊन आठवडा लोटला परंतु त्यांची कुणाशीच गांठ-भेट होईना. जिलासनें विनंती केली– मला मोलोटोव्ह याची भेट घेऊं द्या. शक्य असल्यास जोसेफ स्टॅलिनशी गाठ घेण्याची संधि द्या–परंतु सगळे व्यर्थ !

असाच एक महिना उलटला. त्यानंतर शिष्टमंडळाची मोलोटोव्ह व स्टॅलिन यांच्याशी मुलाखत झाली. ही मुलाखत होताच यक्षि-णीची कांडी फिरावी त्याप्रमाणें सोविएट रशियाची सगळी यंत्रणा त्याना विमुक्तपणें पाहण्याची संधि मिळाली.

पॅन स्लाव्हिक कमिटीने ( स्लाव्ह वंशाच्या लोकाचें एकीकरण मंडळ ) या शिष्टमंडळाचा पहिला जाहीर सत्कार केला. जिलासच्या हें लक्षात आलें कीं, एखाद्या पाहुण्याची राजकीय तपासणी उरकून त्याचें स्टॅलिन व मोलोटोव्ह यानी वर्गीकरण केल्यावर मगच त्याच्याशी कसे वागायचें हें ठरविण्यात येत होतें.

टिटो याने जिलासाला डिमिस्ट्रोव्हची गांठ घेण्यास सांगितलें होतें, हा डिमिस्ट्रोव्ह बल्गेरियाच्या कम्युनिस्टांचा नेता होता. याला जिलास तीनदां भेटला. याच्यासंबंधी जिलास लिहितो–

" स्टॅलिन ज्यांना आदरानं वागवी त्यात डिमिस्ट्रोव्हची गणना होती. बल्गेरियाच्या कम्युनिस्ट चळवळीचा तो कर्तुमकर्तुम् पुढारी होता. त्याचा स्टॅलिनसंबंधीचा दृष्टिकोन मला सांगितला पाहिजे. तो स्टॅलिन-विषयीं आदरपूर्वक कौतुकाने बोलत असे परंतु त्यात भक्ति किंवा स्तुति नसे. तो स्वतः एक विचारी नेता होता. आणि केवळ यशाकरता त्याने स्टॅलिनच नेतृत्व मानलं होतं हें स्पष्ट कळून चुकत असे. त्यानें स्टॅलिनचें युद्धविषयक कर्तृत्व मला वर्णन केले. तो म्हणाला–

" जेव्हां जर्मन सेना मॉस्कोला धडका देऊं लागल्या तेव्हां राज-धानींत गोंधळ आणि अनिश्चितता यांच वातावरण पसरूं लागलं. सोविएट सरकार कुइबिसेव इथं हलविण्यात आलं. परंतु स्टॅलिननं क्रेमलिन सोडलं नाही. कांही दिवसांनी मीदेखील मॉस्को सोडलं. पण स्टॅलिन हलला नाही. मॉस्कोतच ठाण मांडून प्रतिकार करण्याचा त्याचा निश्चय होता. त्याने त्या भयानक पार्श्वभूमीवर ऑक्टोबर क्रांतीच्या वर्षदिनी लालचौकात प्रतिवर्षाप्रमाणें सैनिकांकडून मानवंदना घेतली. त्याच्या डोळ्यासमोरून जाणारे सैनिक तडक रणांगणाकडे जात होते. ज्यावेळी स्टॅलिन ठामपणें मॉस्कोमध्यें तळ ठोकून आहे याचा पडताळा त्या सैनिकाना आला तेव्हा त्यांचं मनोधैर्य शतपटींनी न वाढलं तरच नवल ! "

ज्या लाल सैन्याचा अपमान केल्याचा आरोप दोन वर्षांनी जिला-वर पुढें करण्यात आला त्या लाल सैन्यासंबंधी जिलास लिहितो–

" आजहि माझे कांहीहि मतभेद असले तरी मी रशियन सैन्याच्या गुणाचे गुणगानच करीन. सुशिक्षितांतील बुद्धिवादी समाजातील सर्वांत शूर जवानांचा वर्ग हा या सैन्याचा कणा होता. त्याची अशी स्वतंत्र जात नव्हती. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाशी त्याची फारशी ओळख नसली तरी त्याच्याविषयीं जें शौर्य अपेक्षित होते तें त्याच्यापाशीं भरपूर प्रमाणात होते. स्टॅलिननें सैन्यांत महत्त्वाचे फेरबदल केले. अधिकाऱ्याच्या उलथापालथी केल्या. पण त्याने या बाबतीत मुख्यतः दोन हेतू नजरेसमोर ठेवले होते. (१) सैन्याची निष्ठा सोविएट सरकारशी आणि स्वतःशी बावनकशी राहील याची स्टॅलिनने काळजी घेतली आणि (२) सैन्य अद्यावत् साधनानी सुसज्ज ठेवण्यासाठी जिवाचें रान करून, सैनिकाना उत्तम जीवनमान आणि लायक माणसाना त्वरित बढत्या देऊन त्याने सैन्याला कधीच असमाधानी ठेवले नाही."

### अखेर भेट झाली

एके दिवशी जिलास व त्याचे सहकारी एका सरकारी सभेंत उत्त-रांची भाषणे करीत असतांना कुणीतरी जिलासच्या कानात कुजबुजलें " आटपा, आटपा फार महत्त्वाच्या मुलाखतीला लगेच जायचं आहे."

जिलासला व जनरल टेरझिक्ला एका सामान्य दर्जाच्या मोटारींत लगोलग कोंबण्यात आलें. मोटार सुरूं होताच, सेक्युरिटी खात्यातील एका अनोळखी माणसानें त्याना सांगितले की, ' आपण स्टॅलिनच्या भेटीला जात आहोत. '

आपण स्टॅलिनला लवकरच प्रत्यक्ष भेटणार आहोंत या गोष्टीचा जिलासला एवढा आनंद झाला की सत्य की स्वप्न या संभ्रमांत तो क्षणभर सांपडला. जिलाससारख्या एका अज्ञात अशा कम्युनिस्ट नेत्याला स्टॅलिनची ही भेट म्हणजे जीवनांतील सर्वोच्च आनंदाचा क्षण वाटला नाही तरच नवल ! त्यावेळीं जिलासच्या दृष्टीने ट्रॉट्स्की, बुखारिनचे अनुयायी हे सर्व देशद्रोहीच होते. त्याच्या बाबतींत स्टॅलि-नने जे उपाय योजले ते सर्व यथायोग्यच होते असा जिलासचा विश्वास होता; किंबहुना स्टॅलिननें ट्रॉट्स्कीवाद्यांची जी क्रूर विटंबना केली त्यामुळें स्टॅलिनविषयीचा त्याचा आदर उलट दुणावला होता.

क्रेमलिनच्या दरवाजांत मोटार येऊन थडकली. तिथें मोटारीचा कबजा दुसऱ्याच एका अधिकाऱ्यानें घेतला आणि मोटार प्रचंड आवा-रांतून पळूं लागली. एका ठेंगण्या इमारतीच्या दर्शनी भागापुढें मोटार आली. तिथें तिसऱ्या एका अधिकाऱ्याने जिलास व टेरझिक् याचा कबजा घेतला व त्यांना दरवाजातून आत नेले. प्रत्येक अधिकारी त्याची शरीरे दुसऱ्याच्या हवाली करताना लष्करी सलाम ठोकण्यास विसरत नव्हता. त्याच्या निळ्या टोप्यांवरून ते सर्व सेक्युरिटी खात्या-तील होते हें स्पष्ट कळून येत होतें. यापुढची हकीगत जिलासच्या शब्दातच वाचण्यासारखी आहे जिलास लिहितो–

" आम्हाला एका लहानशा कचेरीत नेण्यात आलं तिथं जनरल श्चकॉव्ह आमची वाटच पाहत होते. एका बुटक्या, जाड आणि तोंडावर देवीचे व्रण असलेल्या वृद्ध माणसान आम्हाला तिथंच बसण्यास सांगितलं व तो स्वतः टेबलामागच्या खुर्चीवरून उठून शेजारच्या खोलीत गेला.

"सर्व गोष्टी कशा आखल्यासारख्या वेगानें घडत होत्या. आंत गेलेला तो माणूस बाहेर आला व त्यान आम्हांला आत जाण्यास सागितल. स्टॅलिनची खोली येईपर्यंत आणखी एक-दोन दालनें ओलांडावी लागतील असा माझा अदाज होता. परतु मी दरवाजा लोटून उंबरठा ओलाडतो तोच मला तो त्याच दालनात समोरच्या बाजूच्या खोलीतून येताना दिसला. ज्या खोलीतून तो बाहेर आला त्या खोलीच्या सताड उघड्या दरवाजातून मला जगाचा एक प्रचंड गोल माडलेला दिसत होता. मोलोटोव्हहि पाठोपाठ आला. तोंडावर फारसें तेज नसलेला मोलोटोव्ह निळचा गडद युरोपियन पोषाखांत एका मोठ्या बैठकीच्या मेजामागें उभा राहिला.

"स्टॅलिनची व आमची खोलीच्या मध्यभागीं गांठ पडली. मी प्रथम पुढें झालो. आणि माझी ओळख सागितली. मग टॅरेझिक्नें आपला परिचय करून दिला. परतु परिचय करून देतांना त्यानें आपल्या सर्व लष्करी हुद्याची फलटण म्हणून दाखविली. स्टॅलिननें गभीरपणे सर्व हुद्याचो लाबण ऐंकली आणि किंचित् गमतीच्या सुरात स्वतःची ओळख सागितली- 'स्टॅलिन.' बस् फक्त एकच शब्द !

"आम्ही मग मोलोटोव्हशी हस्तांदोलन केले. आणि सर्वजण टेबलाभोंवती बसलों. मोलोटोव्ह स्टॅलिनच्या उजव्या हातास बसला आणि टेरेझिक् झुकॉव व मी डावीकडे बसलों. दालन फारस मोठं नव्हत. मात्र लाबट आकाराच होतं. आणि त्यात कसलाहि डामडोल नव्हता.

### रूप पाहतां लोचनीं

"स्टॅलिनच्या अगावर मार्शलचा लष्करी गणवेष होता. मात्र कसलेंच लष्करी पदक लटकावलेलें नसले तरी 'ऑर्डर ऑफ हिरो ऑफ दि सोविएट युनियन' या बहुमानाचा सुवर्णतारा छातीच्या डाव्या बाजूस झळाळत होता. त्याच्या उठण्या-बसण्यात काहीहि कृत्रिमता नव्हती व कसलाहि अधिकाराचा आव नव्हता. स्टॅलिनची जी भव्य आकृति चित्रातून व सिनेमाच्या तुकड्यांतून मन:श्चक्षूवर उमटली होती त्याच्याशी त्याच हें रूप मिळतं-जुळत नव्हत एक क्षणहि तो निश्चल बसलेला नव्हता. हातातल्या पाईपशी त्याचा खेळ सुरू होता. त्यावरील "डनहिल" ही ब्रिटिश कारखान्याची कोरलेली पाढरी अक्षरें उठून दिसत होतीं. मध्येंच तो निळचा पेन्सिलीने समोरच्या कागदावरील काही शब्दांभोवती वर्तुळ काढी. जसजसा एक एक मुद्दा चर्चा होऊन सपत होता तसतसा स्टॅलिन त्या विवक्षित भागावर रेघा मारीत होता. मध्येंच डोक वर उचलून उजवीकड व डावीकडे पाही. व बसल्या ठिकाणी थोडी चुळबूळ करी.

'त्याची ती ठेंगणी व फारशी आकर्षक नसलेली देहयष्टी पाहून माझा थोडा विरस झाला. त्याच्या अगावर असलेला 'टोरसो' आखूड आणि निरुद होता. हातपाय मात्र भरपूर लाब होते. त्याचा डावा हात आणि खादा काहीसा ताठच रहात होता. त्याचा जबडा मोठा होता. आणि डोक्यावरचे भरपूर केस मागे सारले असले तरी पुढून सुरू झालेल टक्कल फारस पसरलेल नव्हतं. तो गोरा होता आ णि गाल मात्र लालसर होते. नतर मला कळलं, क्रेमलिनमध्यें काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या गालावर ही ताबडी छटा नजरेस पडे. त्याला सोविएट अधिकाऱ्याच्या वर्तुळात 'क्रेमलिन कॉम्प्लेक्शन' अशी सज्ञाच होती. त्याचे दात काळसर होते. आणि एका ओळीत वाढलेले नसून आंत वांकलेले होते त्याच्या मिशाहि भरघोस व ताठ नव्हत्या. त्याच्या डोक्याचा आकार आकर्षक नसला तरी त्याच्याकडे पाहताच शेतकऱ्याच्या तोंडवळ्याची आठवण होत असे. डोळ्यातली ती पिवळसर झांक आणि त्यात मिसळलेले ताठरपणाचे आणि खोडसाळपणाचे भाव या साऱ्या गोष्टी गावढळ बेरकीपणाची ओळख देत होत्या.

"त्याचे उच्चारहि खास रशियन भाषेचे नव्हते. परतु रशियन भाषेचं त्याच ज्ञान पुष्कळच होतें. बोलताना तो स्पष्टपणे बोले. परंतु शब्दांची व्याप्ति मोठी असे. त्याच्या बोलण्यांत रशियन म्हणीची आणि उक्तीची रेलचेल होती. मला हें नतर कळलं की, स्टॅलिनचा रशियन वाङ्मयाशीच फक्त गाढ परिचय असला तरी त्याच राजकीय इतिहासाच ज्ञान मात्र फक्त रशियापुरतं मर्यादित नव्हतं.

"एका गोष्टीच मात्र मला मुळीच आश्चर्य वाटल नाही. स्टॅलिनजवळ नर्म विनोदाचं अंग होतें. विनोद कांहीसा रांगडा असला तरी प्रतिष्ठेला धक्का न लावणारा होता. उथळ नव्हता की ढोबळ नव्हता. त्याच्या प्रतिक्रिया चटकन कळून येत. आणि त्यांत एक निश्चितपणा असे. याचा अर्थ सांगणाऱ्यांचं म्हणणं तो संपर्ण ऐकून घेत नसे असा नाही. परंतु मोठमोठाली वक्तव्यं त्याला आवडत नव्हती, हें नक्की. मोलोटोव्हशी त्याचे असलेले सबंध काहीसे विशेष होते. हा एकच पोलिटब्यूरोचा सभासद असा होता की ज्याला स्टॅलिन "मॉलोटी" या खास नावानें सबोधित असे.

### सोव्हिएट युनियन ? नव्हे रशिया

"स्टॅलिनने प्रश्न विचारून संभाषणाला सुरवात केली कीं, आमचें सोविएट रशियासबधीं काय मत बनलें आहे ? मीं उत्तर दिलें- "आम्हीं उत्सुकतेनें सर्व गोष्टी पाहात आहोंत !" माझ्या या उत्तरावर स्टॅलिननें टोला दिला- "आम्हीं मात्र फारशा उत्सुकतेचे धनी नाहीं. रशियात सर्व गोष्टी सुधाराव्या एवढाच आमचा प्रयत्न आहे." मला पक्कें स्मरतें कीं, स्टॅलिननं सोविएट संघ (Soviet Union) असा वाक्यप्रयोग केला नाहीं, तर रशिया असाच देशवाचक उल्लेख केला. याचा अर्थ रशियन राष्ट्रवादास तो उत्तेजन देत होता. इतकेंच नव्हे तर तीच भावना त्याची स्फूर्तिदात्री होती. आज हा विचार माझ्या मनात डोकावत आहे, परतु प्रत्यक्ष भेट चालू असताना स्टॅलिननं चटकन वनवासात असलेल्या युगोस्लाव्ह सरकारचा विषय काढल्यामुळं माझं मन त्या प्रश्नाकडं गुतलं. मोलोटोव्हकडे वळून स्टॅलिनन प्रश्न केला- "काहीतरी युक्ति करून ब्रिटिश सरकारला टिटोच्या नेतृत्वाला मान्यता देण्यास, आपल्याला भाग पाडतां येणार नाही का ? नाहीतरी टिटो एकटाच जर्मनांशी लढत आहे." मोलोटोव्हच्या चेहऱ्यावर छद्मी हास्य उमटल. त्यात खुषीचा भागहि भरपूर होता. मोलोटोव्हनं उत्तर दिल- "नाही. तें अशक्य आहे. युगोस्लाव्हियात घडणाऱ्या घटनाची ब्रिटिशांना पूर्ण जाणीव आहे."

"जेव्हां मीं दोन लाख डॉलर्सच्या कर्जाचा विषय काढला तेव्हां स्टॅलिननें या आकड्याची टर उडवली. त्याच्यामतें या एवढ्याशा पैशान आम्हाला कसलीच मदत होणार नव्हती. तरीसुद्धां मागितलेली रक्कम देऊं अस त्यानं आश्वासन दिल. मी जेव्हां पुढ म्हटल कीं, या कर्जाची पै अन् पै आणि आम्हाला मिळालेली सर्व लष्करी सामुग्रीची मदत स्वतत्र होतांच आम्ही परत करूं, तेव्हां स्टॅलिन एकदम रुष्ट झाला. त्यान रागानं म्हटल-

" अस बोलून तुम्ही माझा अपमान करीत आहात. तुम्ही तुमचं रक्त साडोत असताना आम्ही दिलेल्या लष्करी साधनाचे पैसे आम्हीं घ्यावे ? मी कुणी व्यापारी नाही.– आमच्यापैकीं कुणीच धंदा करूं इच्छित नाहीं. आम्ही ज्याच्यासाठी लढत आहोंत त्याच ध्येयासाठीं तुम्ही लढत आहांत. या प्रसगी जें जें आमच्यापाशी देण्यासारखं आहे तें तें तुम्हाला देण हें आमच कर्तव्य आहे. त्यात उपकाराचा भाग नाही. ( You insult me. You are shedding your blood and you expect me to charge you for the weapons! I am not a merchant, we are not merchants. You are fighting for the same cause as we are. We are duty bound to share with you whatever we have. )"

स्टॅलिन पुढें म्हणाला– " परंतु आम्ही तुम्हांला विमानानं फारशी मदत करूं शकणार नाही. कारण विमानान कितीशी मदत करणार ? या करतां जहाजं हवींत. आमच्याजवळ ती नाहींत. काळयासमुद्रातील आमचं आरमार जर्मनीनं नाहींस करून टाकल आहे–"

जनरल झुकॉव्हनं मध्येंच सूचना केली–

" अतिपूर्वेकडं आपली कांहीं जहाजं आहेत, आपण ती काळया समुद्रात आणूं......"

त्याचं बोलणं खोडून काढीत स्टॅलिननं मध्येंच त्याला थांबवीत म्हटल—

" तुम्ही काय बोलतां आहात हें तुमचं तुम्हाला तरी कळतं आहे कां ? तुमच डोकं ठिकाणावर आहे ना ? अतिपूर्वेकडेहि युद्धच चालूं आहे. आपली जहाजं सुखासुखी तिथून कशीं बाहेर आणता येतील ?"

हें बोलत असताना स्टॅलिनचा चेहरा उग्र आणि भेसूर दिसूं लागला. एका स्टॅलिनमधून जणू हा दुसराच स्टॅलिन उत्पन्न झाला होता. तो पुढं म्हणला–

" जहाज विकत घ्यावीं लागतील. कुणाकडून घ्यावी–तुर्कीजवळ जहाज आहेत. पण त्यातलं एकहि ते आपल्याला विकायला तयार होणार नाहीत. इजिप्त–? इजिप्तकडून जहाज नक्की विकत मिळतील! इजिप्त काहीहि विकायला मा -पुढं पाहात नाही, तिथ जहाजाची काय कथा ? इजिप्तकडूनच जहाजं घ्यायची– ! "

स्टॅलिन बोलत असताना जनरल झुकॉव्हन स्टॅलिनचे निर्णय भराभरा टिपायला सुरुवात केली होती. परंतु ही जहाज कधीच विकत घेण्याचा प्रसग आला नाही. याच मुख्य कारण पूर्व सरहद्दीवर रशियन फौजा इतक्या पुढें सरकल्या कीं त्यांची फळी युगोस्लाव्हियाच्या सरहद्दीला येऊन भिडली. मग मदतीचा ओघ जमिनीमार्गेच सुरू झाला हा भेटीचा वृत्तांत सांगताना जिलास लिहितो–

" उठतां उठता स्टॅलिनन मला मिलन गॅरिव्होलिक या आमच्या रशियात धाडलेल्या पहिल्या वकिलाविषयी माझं मत विचारलं. मी सांगितल, की " तो धूर्त आहे."

स्वतःशीच पुटपुटल्यासारखं स्टॅलिन म्हणाला– " बरोबर आहे. पुष्कळ राजकारण्याना वाटत की, राजकारणात कशाला महत्त्व असेल तर फक्त धूर्तपणाला. परंतु गॅरिव्होलिक मला एक महामूर्ख माणूस वाटला– ! "

मी पुनः सांगितलं कीं, " मला गॅरिव्होलिक हा फार दूरदर्शी माणूस वाटला नाहीं तरी तो मूर्ख आहे असं म्हणता येणार नाही. " माझ्या बोलण्याकडं दुर्लक्ष करून स्टॅलिननं विचारल–

" युगोस्लाव्हियाच्या पीटर राजाला शेवटीं एखादी बायको सापडली की नाही– ?"

जेंव्हा मीं उत्तर दिलं की, त्याच लग्न एका ग्रीक राजकन्येशी झाल आहे, तेव्हा खट्याळपणें हंसत स्टॅलिन म्हणाला– " मोलोटोव्ह किंवा मी एखाद्या दुसऱ्या देशातल्या राजकन्येशी लग्न केल तर काय होईल ? कदाचित् कांहीतरी बऱ्या गोष्टीहि घडतील !"

मोलोटोव्ह किंचित् हंसला. आवाजदेखील न काढता !

" मीं स्टॅलिनसाठीं आणलेल्या भेटी त्याच्यापुढं ठेवल्या. आम्हाला भेटीसाठीं मोटारीत कोंबण्यापूर्वी या भेटी तत्पूर्वीच मोटारीत ठेवण्यांत आल्या होत्या. भेटवस्तू फार सामान्य होत्या. परंतु स्टॅलिननं त्याचंहि कौतुक केलं. त्यांतली बंदूक उचलून त्यान नेम धरून पाहिला आणि खाली ठेवीत म्हणाला–

" यापेक्षां आमची वजनाला अधिक हलकी आहे– !"

"– झाली. पहिली भेट अशा रीतीनें तासाभरांतच संपली– "

●●

या पहिल्या भेटीनंतर थोड्याच दिवसांत जिलासला पुनः स्टॅलिनला भेटण्याची संधि मिळाली. त्याच सुमारास दोस्तांच्या सेना नॉर्मंडीत उतरल्या होत्या. मध्यंतरीच्या काळांत स्टॅलिन व मोलोटोव्ह संबंधी जिलासने भरपूर निरीक्षण आणि अभ्यास केला होता.

### यांत्रिक माणूस –मोलोटॉव्ह

मोलोटोव्ह हा फारसा बोलका नव्हता. तो जेव्हा स्टॅलिनबरोबर असे किंवा जेव्हां त्याच्याशीं सहमत होणाऱ्याच्या सहवासांत असे तेव्हां त्याच्याशी बोलणें सोपें असे. परंतु एकदरीत तो घुम्याच होता. त्याच्या मनात काय आहे हें समजणें कठीण असे. त्याने अमुक प्रकारचे निर्णय कां घेतले याची कारणमीमांसाहि सुसंगतपणे ध्यानांत येत नसे. याउलट स्टॅलिन हा उत्साही आणि बोलका होता. तो सारखा भेटलेल्याना प्रश्न विचारीत रहात असे. स्वतःशीदेखील तो मोठयामोठ्यानें वादंग करी. मोलोटोव्ह हा सदासर्वकाळ एकाच वृत्तीचा वाटे. उलट स्टॅलिनच्या वृत्ती प्रसंगानुरूप बदलत व पलट खात. चर्चिलनें मोलोटोव्हला यांत्रिक माणूस (Robot) असे संबोधलें आहे.

विचार केला तर हें ध्यानांत येतें कीं, स्टॅलिन व मोलोटोव्ह यांचे स्वभाव परस्परपूरक होते. रोजच्या व्यवहारांतली शुष्कता मोलोटोव्हमुळें स्टॅलिनला उपद्रवकारक होत नसे आणि स्टॅलिनच्या उत्साहाला आणि आकांक्षाना मोलोटोव्हचा व्यावहारी अडसर आवश्यकच असे. स्टॅलिनशिवाय मोलोटोव्हचें कर्तृत्व चमकूच शकलें नसतें ही गोष्ट खरी असली तरी मोलोटोव्हची मैत्रीहि स्टॅलिनला अनेकदृष्ट्या उपकारकच ठरली यात संशय नाहीं. दोघेहि आपल्या साध्यासाठीं साधनाचा विवेक करणारे नव्हते. मात्र स्टॅलिनने आपलीं साधनें फार काळजीपूर्वक आणि महत्त्व जाणून विचारपूर्वक हाताळली. उलट मोलोटोव्हनें साधनाचें महत्त्वच कमी लेखलें. ज्या अनेक गोष्टी स्टॅलिनने केल्या त्यामागचा मेंदू मोलोटोव्हचा होता.

या दुसऱ्या भेटीसाठी जिलासला जिथें प्रथम भेट झाली त्याच क्रेमलिनमधील इमारतीत नेण्यांत आले. मात्र खोल्या निरनिराळ्या होत्या.

जिलास या भेटीची हकीगत सांगतो—

"मी पोंचलों तेव्हां मोलोटोव्ह निघण्याच्याच तयारीत होता. त्यानें अंगावर कोट चढवून हातांत हॅट घेतां-घेतां मला सांगितलें कीं, स्टॅलिनबरोबर आज सर्वांना खाना घ्यावयाचा आहे"

"मोटारीत बसल्यावर मोलोटोव्हने मला विचारलें, मला भाषा किती येतात ? मी सांगितलें मला रशियन समजतें व फ्रेंच बोलण्याचा सराव आहे. युगोस्लाव्हियातील कम्युनिस्ट पक्षाच्या बळाबळासंबधींहि आमचे बोलणें झालें.

"या दिवसांपूर्वीच दहा दिवस युगोस्लाव्हियात जर्मनांनी चढविलेल्या आकस्मित हल्ल्यामुळें टिटोला डोंगरात पळून जावें लागलें होतें. लष्करी दृष्टया आणि राजकीय दृष्टया हा टोला गंभीर होता. आमचा प्रश्नहि गंभीर होता. युगोस्लाव्हियातील लष्करी शिष्टमंडळ या बातम्या मास्कोला पाठवित होतें सोव्हिएट विमानं रात्री आमच्या सैन्याला अन्न फेकीत होती. परंतु खाली पडणारी मदत आमच्या पळापळीमुळें अलगद जर्मनाच्याच हातीं लागत होती.

"जवळजवळ वीस मैल मोटार प्रयासानंतर आम्ही एका डेरेदार वृक्षांच्या छायेत बांधलेल्या झोपडीवजा घरांशी पोंचलों. आम्ही दरवाजातून आंत शिरताच स्टॅलिन आम्हांला सामोरा आला. यावेळी त्याच्या पायात बूट होते आणि गळ्यापर्यंत बंद बटनांचा 'टचुनिक' अंगावर होता. या वेषांत तो अधिकच लहान आणि साधासुधा वाटत होता. अगदी घरगुती वेषांत वावरतांना अधिक मोकळेपणा जाणवत होता. त्यानं आम्हाला एका जवळजवळ रिकाम्या दालनांत नेलं. तिथं पुस्तकं नव्हतीं; कसल्या तसबिरी नव्हत्या, नुसत्या लांकडी भिंती सभोंवतीं जाणवत होत्या. आम्हीं सर्व एका छोटया लिहायच्या दालनात टेबलाभोंवती बसलो. बसताक्षणीच स्टॅलिननं प्रश्न विचारायला सुरूवात केली. 'युगोस्लाव्ह सुप्रीम कमांडची हालचाल काय ?' त्यानें पुढें विचारलें—

"सर्वजण अन्नपाण्याविना मरणार काय-?"

मीं त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, की असं होणं शक्य नाहीं जर्मनांनी अचानक हल्ला केला. थोडी पळापळ झाली एवढच ! एकदम स्टॅलिन म्हणाला—

"का नाही ? कितीतरी वेळां सैनिकांना अन्नपाण्यावाचून मरावे लागल आहे. अन्नान्नदशा हीच सैन्याची सर्वात मोठी वैरीण असते !"

"मग स्टॅलिन आम्हांला पाठविण्याच्या मदतीसबंधी बोलूं लागला. सोविएट आघाडी अजून आमच्या सरहद्दीपासून फार दूर होती. फायटर विमानांच्या पहाऱ्यातहि रसद पोचविणें शक्यच नव्हतें. बोलतां बोलता स्टॅलिन एकदम चिडून म्हणाला—" हें वैमानिक भ्याड आहेत. दिवसा उड्डाणाची त्याना भीति वाटते ! भित्रे...भागूबाई...!"

"मोलोटोव्हनं मध्येंच तोंड घातलं—" ते भ्याड नाहीत, भित्रेहि नाहीत. परिस्थिती उलटी आहे. फायटर विमानं फार लांब पल्ल्याचा प्रवास करूं शकत नाहीत. शिवाय जाणं येणं होईपर्यंत पुरेल एवढं जळण घेऊन त्याना उडाव लागतें. म्हणून बहुधा ही विमानें रात्रीच बाहेर पडतात आणि थोडाच बोजा वाहू शकतात—"

मीदेखील मोलोटोव्हच्याच म्हणण्याला दुजोरा दिला. कारण आपला जीव धोक्यांत घालून रशियन वैमानिक फायटर विमानांच्या पहाऱ्याशिवाय युगोस्लाव्हपर्यंत धडका मारीत होते हें मला ठाऊक होतं. मात्र टिटोन आतां आपलं मुख्य ठाणं अधिक सुरक्षित ठिकाणीं न्यावं या स्टालिनच्या सूचनेचा मीं पाठपुरावा केला. स्टॅलिननं हा विचार त्यापूर्वीच टिटोला कळवलेला असावा. कारण टिटोन इटालीत जाण्याच मान्य केल. तिथून तो व्हिस् (Vis) बेटावर गेला व व लाल सैन्य युगोस्लाव्हियात शिरेपर्यंत तिथेच राहिला.

"दोस्त राष्ट्रांनीं या पूर्वीच युगोस्लाव्हियाच्या मदतीकरता रशियाला विमानतळ देण्याच मान्य केल होतं. तिथं तावडतोब रशियानें वाहतुक विमान (Transport Planes) पाठवावीं अशी सूचना स्टॅलिननं केली.

"विषय दोस्तांच्याकडे वळला. ओघानंच स्टॅलिन आमच्या व दोस्ताच्या (Allies) संबंधाकडे वळला. मला वाटत आम्हाला पुनः भेटण्याचा स्टॅलिनचा उद्देश या विषयाला तोंड फोडण्याचाच असावा.

"त्यानें आम्हाला या बाबतीत ज्या सूचना केल्या त्याचा सारांश असा होता कीं, आम्ही आताच इंग्लिशांच्या मनांत काही विकल्प येईल—युगोस्लाव्हिया उद्या कम्युनिस्ट राजवटीखालीं जाईल—असा संशय येईल—अशा गोष्टी करतां कामा नयेत. स्टॅलिनन रागारागानें विचारलें—

"तुम्हाला तुमच्या टोप्यांवर लाल तारा लावला नाही तर काहीं अडणार आहे कां ? बाह्य स्वरूप महत्वाचं नाही. महत्व आहे आपण काय साधतों याचं—लाल तारे कशाला हवेत ते—? मेहरबानी करा आणि असलं कांहीं करू नका—"

"तो रागावून बोलत होता. परतु हा राग नसून फक्त नाराजी होती. हें स्पष्टपणें दिसत होतें. मी खुलासा केला — "लाल तारे काढून टाकणें आम्हाला अशक्य आहे. त्या चिन्हांचं स्वरूप आतां केवळ प्रदर्शनाचं राहिलं नसून त्यामध्यें आतां आमची परंपरा आणि आमच्या भावना गुतल्या आहेत. आमच्या सैनिकाच्या दृष्टीनें त्याला काहीं आगळं स्थान आतां प्राप्त झालं आहे— "

### दोस्तांना फसविण्याचा इंग्रजांचा धंदा

"तरीहि स्टॅलिनन आपलं म्हणणं सोडल नाहीच मात्र त्याच्या आग्रहांत आता पूर्वीचा जोर नव्हता. या सबधात मग स्टॅलिननं निराळाच मुद्दा मांडला—

"तुम्हांला कदाचित असं वाटत असेल कीं, युद्धांत आम्ही आज इंग्रजाचे मित्र आहोत तेव्हां इंग्रज कसे आहेत आणि चर्चिल कोण आहे हें आम्हीं विसरलों आहोंत .. त्यांचा धंदा आम्हाला ठाऊक आहे. आपल्या दोस्तांनाच फसविण्याचा त्यांचा धंदा पुरातन आहे. पहिल्या महायुद्धात त्यांनीं रशियन आणि फ्रेंचांना बनवलं आणि चर्चिल— ? चर्चिल हा अशाप्रकारचा माणूस आहे कीं, जो कपर्दिके करतांहि तुमचा खिसा कापायला कमी करणार नाहीं ! आणि रूझवेल्ट— ? रूझवेल्ट तसा नाहीं. त्याच्यापेक्षां बरा आहे. जर मोठा लाभ असला तरच तो खिशांत हात घालील. चर्चिल मात्र कपर्दिकेकरतांहि घालील. विसरूं नका .. "

टिटोच्या जिवाला इंग्रजांकडून धोका आहे, याचा इशारा स्टॅलिननं आम्हांला दिला. त्याच्या हेरखात्यापासून सावध रहा असे त्यानें सांगितलं. तो म्हणाला—

"या इंग्लिशांनींच जनरल सिकोरस्कीला विमानांत ठार मारलं. मग विमान गोळ्या झाडून राळखुदंपणें खालीं पाडले. पुरावा नाहींसा केला– साक्षीदार नाहींसा केला–"

" मी मायदेशीं परतल्यावर स्टॅलिनचं हें बोलणें टिटोच्या कानावर घातलं आणि लगेच त्यानं आपला मुक्काम व्हिस बेटावरून २१ सप्टेंबर १९४४ ला रुमानियांत हलविला.

" युगोस्लाव्हचें शाही सरकार (Royal Govt.) अस्तित्वांत होतेंच. डॉक्टर इव्हान सुबाझिक् हा प्रतिनिधी म्हणून होता. त्यानें टिटोशीं वाटाघाटी करुन राष्ट्रीय मुक्ति सैन्यालाच (National Liberation Army) प्रमुख सेना म्हणून मान्यता देण्याचं कबूल केलं होतं. स्टॅलिननं सूचना केली–

" सुबाझिक्शी संबंध ठेवा. त्याला कांहीहि करा पण बिथरवूं नका' आत्ताच त्याच्यावर हल्ला करण्याची गरज नाहीं. बघूया त्याला नेमक काय हवं आहे– ?"

मीं स्टॅलिनचं हें बोलणंहि टिटोच्या व मध्यवर्ति मंडळाच्या कानांवर घातलं. व त्यामुळंच टिटो-सुबाझिक करार होऊ शकला.

"मग आम्ही जेवणाकरतां उठलों. दालनातून जात ना तिथ भिंतीवर लावलेल्या जगाच्या प्रचंड नकाशाकडे पहात मी किंचित रेंगाळलों. सोविएट राष्ट्रसंघ त्या नकाशात लाल रगात रंगविला होता. त्यामुळें त्याचा विस्तार अधिकच मोठा वाटत होता. स्टॅलिननं नकाशाच्या त्या भागाकडे हात करीत म्हटलं–

" ब्रिटिश आणि अमेरिकन लोकाना हा एवढा मोठा भूभाग लाल झाला ही कल्पना कधींच सहन होणार नाहीं.... कधींहि नाहीं !!"

" नकाशात स्टॅलिनग्राड शहराभोंवती पश्चिमेच्या बाजूनें निळ्या पेन्सिलीन अर्धवर्तुळ केलेलं होतं. स्टॅलिनग्राडची लढाई चालू असता स्टॅलिननंच बहुधा तें अर्धवर्तुळ केलेल असाव. मी कुठं पाहात आहे तें स्टॅलिनच्या ध्यानांत आलं आणि मला वाटत, त्याला समाधान वाटलं. परंतु त्यानं आपल्या भावनाची मुळीच ओळख दिली नाही.

" का कुणास ठाऊक, पण मी एकदम उद्गारलों.

" जर कारखानदारी वाढली नसती तर सोविएट युनियुननं या संहारक युद्धांत टिकाव धरला नसता. आणि हें युद्धहि करणं त्यांना अशक्य झालं असतं— "

" स्टलिननें धागा उचलीत म्हटलें–

" बरोब्बर. याच मुद्यावर आमचं व ट्रॉट्स्की-बुखारीन यांचं भांडण झालं–"

" फक्त एकदाच– या नकाशासमोर ट्रॉट्स्की–बुखारीन यांचीं नांवं मी स्टॅलिनच्या तोंडून ऐकली. त्याच फक्त 'भाडण' झाल...!

" जेवणाच्या खोलीत सोविएट पार्टीचे दोन-तीन उपाधिकारी आधींच येऊन बसलेले होते. ते आम्ही आत शिरताच उभे राहिले. परंतु अखेरपर्यंत त्याच्यापैकी फारसं कुणी बोलले नाही.

## पक्वान्नांची गर्दी झाली !

" टेबलावर चांदीच्या तबकांतून असंख्य खाद्यपदार्थांची गर्दी उसळलेली होती. प्रत्येकानं आपल्याला हवे असलेले पदार्थ आपआपल्या थाळ्यांत गोळा केले. आणि आम्हीं टेबलाच्या अर्ध्या मोकळ्या भागाच्या आसपास बसलों. मटण, गोमास आणि कडक नशा चढणारी मद्यें तिथ होतीं. परतु बाकीच्या गोष्टी मात्र साध्यासुध्या होत्या. स्टॅलिनने घंटा वाजवून बोलावल्याखेरीज कुणीहि नोकर पुढं येत नव्हता. मीं एकदा बिअर मागितली. तेव्हाच नोकराला फक्त एकदांच बोलावावें लागले. खाण्यापिण्याचा आग्रह मात्र पुनः पुनः होत होता.

" असें जेवण बहुधा सहा-सात तास चालतें. रात्री दहाला सुरुवात झाली की पहाटेचे चार वाजेपर्यंत खाणेंपिणें रमतगमत गप्पाष्टकात सुरूंच असतें. या गप्पांत ऐकलेल्या गोष्टी, दंतकथा, राजकारणाची गभीर चर्चा, आणि तत्त्वज्ञानविषयक संवाद यांची रेलचेल असे. अनौपचारिकरित्या परतु वस्तुतः अशा खान्याच्या प्रसगीच सोविएट देशाच्या धोरणाचे आराखडे आकार घेत असत. स्टॅलिनच्या कटाळवाण्या आणि गभीर जीवनात हे प्रसंगच काय ते विरंगुळ्याचे व मौजेचे होते. मद्यामुळें वृत्ती उत्तेजित असत आणि त्यामुळ आधीच मनमोकळेपणा असलेल्या वातावरणाची शान अधिकच वाढे. तिऱ्हाईताला या गप्पाष्टकांत रगलेल्या मडळीत स्टॅलिनला ओळखणं जड गेलं असतं. परतु तसा फरक प्रत्यक्ष जेवणात रमलेल्याना जाणवत असें हें मात्र खास. त्याचीं मतं विचारपूर्वक ऐकलीं जात. त्याला कुणी जोराचा विरोध करीत नसे. एखाद्या- मोठ्या कुटुंबात घरांतला वयोवृद्ध पुरुष जी अबोलकी सत्ता गाजवतो तशी सत्ता या प्रसगीहि स्टॅलिनला बिलगून असे.

" स्टॅलिनचं खाणें जबरदस्त होतं. तो नेहमीं मांसावर जोर देई. हा बहुधा त्याच्या गिरीकुहरांत घालवलेल्या बालपणाचा परिणाम असावा. अमुक एक पदार्थ त्याला विशेष आवडत होता असं मात्र मला जाणवलं नाहीं. त्याला कधीं मद्य चढलेलंहि मला आठवत नाहीं. एखादे वेळेस मोलोटोव्हला जास्त होई व तें लक्षांतहि येत असं. बेरिआ मात्र पक्का पिऊन झिंगणारा होता.

"जेवतांना जे अनेक विषय पुढें आले त्यासंबंधी खास अशा ज्या गोष्टी माझ्या लक्षात आल्या त्याच फक्त मी नमूद करतो.

स्टॅलिननं विचारलं–

" अल्बानियात काय चालूं आहे ? तिथले लोक आहेत तरीं कसे ?

" मीं सांगितलं—

" जें युगोस्लाव्हियात घडत आहे तेंच तिथं घडत आहे. बाल्कन-राष्ट्रांतील अल्बानिया हें सर्वांत प्राचीन राष्ट्र आहे. स्लाव्हांच्या पूर्वी–ग्रीकांच्याहि पूर्वी या देशाची परपरा जाते–"

" म्हणजे त्यांचा स्लाव्हांशी कांहींच संबंध पोंचत नाहीं– ?" स्टॅलिननं मध्येंच मला अडवलं.

" नाहीं. पूर्वी त्याच दऱ्यांतून स्लाव्ह रहात होते. म्हणून तिथल्या शहराच्या आणि गावाच्या नांवात स्लाव्ह सस्कृतीचे अवशेष आढळतात इतकच–! अल्बानियन लोकानीं त्यांना पिटाळून लावलं–"

"खोडसाळपणानें डोळे मिचकावीत स्टॅलिन म्हणाला,– "मला वाटल, अल्बानियन लोकात थोडें तरी स्लाव्ह रक्त असेल–"

तो विषय तितकाच राहिला मग मीं बोलतांना एकदा सांगितलं कीं, आम्ही कैदी म्हणून कुणाच जर्मनाला पकडत नाहीं कारण जर्मनांनी आमचे सर्व शरण आलेले कैदी मारून टाकले.

"हसत हसत स्टलिन मग सागू लागला–

"आमच्यापैकी एक अधिकारी जर्मन कैद्याची एक टोळी घेऊन चालला होता. वाटेत त्यानं एक एक कैदी यमसदनाला धाडला. शेवटी फक्त एकच उरला. त्याला घेऊन तो ठाण्यावर आला तेव्हा विचारणा झाली– "बाकीचे कुठे आहेत?" त्यानं उत्तर दिलं, "कमाडर इन चीफच्या आज्ञेप्रमाणें मी शेवटच्या माणसापर्यंत सर्वांना मारून टाकल, हा शेवटचा तेवढा इथपर्यंत आणला..."

स्टॅलिननतर मीं पण एक किस्सा सागितला. तो स्टॅलिनला फारच आवडला,– "एक तुर्क आणि एक लुटारू यांची गाठ पडली. तुर्कांच्या व या लुटारूंच्या नेहमी लढाया चालत. परंतु गांठ पडली तेव्हां काळ शांततेचा होता. तुर्कानं लुटारूजवळ आश्चर्य प्रदर्शित केले–"कशाला तुम्हीं नेहमी नेहमीं युद्ध करतां?" तो लुटारु म्हणाला– "लूट मिळविण्यासाठी! आम्ही गरीब आहोंत. आणि त्यामुळं कुठं लूट मिळेल याच्या आम्ही शोधांत असतो! पण तुम्ही कां लढाया करतां?"

"तुर्कानं अभिमानानं सागितलं—

"सन्मानाकरतां आणि वैभवाकरतां आम्ही लढाया करतो" त्या लुटारूनं शेरा मारला– 'प्रत्येकजण आपल्या जवळ जें नाही त्याच्याकरता लढतो."

"माझं बोलणं संपण्यापूर्वीच स्टॅलिन खदखदां हसू लागला. म्हणाला– "वा, वा, ! खरं आहे. ज्याच्याजवळ जें नाही त्याच्यासाठींच जो तो लढतो–"

"मोलोटोव्हदेखील हंसला पण थोडेसं आणि आवाज न करता! विनोदाचें त्याला वावडंच असावें.

"नंतर कोमिन्टर्नच्या (आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट देशाची संघटना) विसर्जनाबाबत स्टॅलिन म्हणाला–

"हीं पाश्चिमात्य राष्ट्रं अशीं बेरकीं आहेत कीं यासंबंधी त्यांनीं गोष्टच काढली नाहीं. आम्हीदेखील तितकेच खबीर होतों. त्यांनीं तशी मागणी केली असती तर आम्हीं कधीच कोमिन्टर्नंच विसर्जन केलं असतं. मी आणि मोलोटोव्ह इथं डोक्यावर डोकं घाशीत मनसुबे करायचे आणि कोमिन्टर्न वेगळ्याच दिशेनं ओढाओढी करीत राही. हा विसवाद पुढ फारच वाढला. एखाद्या डिमिट्रोव्हसारख्या माणसाबरोबर काम करणं आम्हाला शक्य आहे. परंतु इतर देशातील कम्युनिस्ट नेत्याचा अनुभव तसा चागला नाहीं. खरी गोष्ट ही आहे कीं कोमिन्टर्नच्या अस्तित्वाला या युद्धकाळांत फारसा वाव नाहीं. देशोदेशीच कम्युनिस्ट पक्ष आपापल्या देशातील राष्ट्रवादाच्या भाषेंत बोलत व वागत असताना कम्युनिस्ट देशाच्या सघटनेंच अस्तित्व हा अडसरच ठरला असता."

"खानें चालू असतानाच दोन लखोटे आले. स्टलिननं दोन्ही माझ्या हातात दिले व फोडून वाचण्यास सागितले.

'एकात सुबाशिकन अमेरिकेला काय कळविलं त्याचा वृत्तांत होता. नेमकी ओळ अशी होती– "आम्हां युगोस्लाव्ह लोकाना सोविएट रशियाविरुद्ध जाण शक्य नाहीं. कुठलंहि रशियाविरोधी धोरण आम्ही अंगिकारणार नाही. कारण आमच्यांत स्लाव वंशाशी व रशियाशी मिळत्याजुळत्या अशा आमच्या परपरा आहेत."

"खलिता वाचीत असताना माझ्या तोंडावर आश्चर्य होतं त्याचं स्वरूप ताडून स्टॅलिन म्हणाला– "ते आमचे खलिते चोरतात. आम्हीहि त्याचे चोरतो."

"दुसरा खलिता चर्चिलकडून आला होता. त्यात कळवल होत की, दुसऱ्या दिवशीं सकाळपासून फ्रान्समध्यें सैन्य उतरण्यास सुरुवात होईल. स्टॅलिनन या खलित्याची टिंगल करण्यांस सुरवात केली–

"उतरतील...... उद्या नक्की फ्रान्समध्यें उतरतील! पण जर धुकं नसलं तर!! आतापर्यंत या ना त्या कारणावरून त्यांनीं फ्रान्समध्यें सैन्य उतरविण्याची टाळाटाळ केली आहे. अजून मला शंका आहे, उद्यां आणखी काही कारण शोधून काढतील. नुसती वचनं आणि भाराभर आश्वासनें!"

"मोलोटोव्ह मात्र निक्षून म्हणाला–

"नाहीं यावेळी तस होणार नाही. ब्रिटिश व अमेरिकन फौजा उद्यां निश्चित फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरतील"

"माझा मात्र असा पक्का ग्रह आहे की, त्यावेळी वरवर जरी स्टॅलिन दोस्तांची टवाळी करीत असला तरी सैन्यें नॉर्मंडीत उतरणार याविषयी तो मुळीच साशंक नव्हता. परतु आमच्या देखत त्याची टवाळी करण्यांत त्याचा अन्य काही हेतू असावा. आमचे व इंग्लंड अमेरिकेचे संबंध नेहमीं ताणलेले रहावे या करतांच त्याचा हा डावपेंच असावा.

**"स्टॅलिनला जें साधायचं होतं, त्याकरतां तो जे मार्ग चोखाळीत असे, त्याला जो व्यक्तिगत अनुभव आला होता, या सर्वांचा परिणाम त्याच्यावर असा झाला होता कीं, जें त्याच्या वर्चस्वाखालीं नसेल अशा कशाबद्दलहि त्याला विश्वास वाटत नसे. इतकंच नव्हे तर अशांकडे तो शत्रू म्हणूनच पाही. युद्धाच्या परिस्थितीमुळं युगोस्लाव्हियांतील क्रांति त्याच्या हातांतून निसटूं पहात होती. म्हणून त्या क्रांतीच्या नेत्यांना अँग्लो अमेरिकन बागुलबोवांचा धाक दाखवून त्यांना आपल्या अधिकाराखालीं जखडण्याचा प्रयत्न स्टॅलिन करत होता."**

••

जिलासनें स्टॅलिनसबधी केलेले विधान सर्वत्र हुकुमशहाना तंतोतंत लागू पडतें. सर्वसत्ताधिकारी झाल्यावर औरंगजेबासारख्या बादशहाला ज्याप्रमाणे कुणावरहि विश्वास टाकणे धोक्याचें वाटू लागले तशीच स्टॅलिनची अवस्था झाली. लष्करशाहीच्या जोरावर धर्मप्रसार किंवा राज्यविस्तार करणाऱ्याच्या नशिबी हा उद्वेग ठरलेलाच असतो. जगात सोविएट तत्त्वज्ञान आणि साम्यवादी विचार लष्करशाहीच्या जोरावर पसरावयाच्या स्टॅलीनवादातूनच एका नव्या हुकुमशाहीला खतपाणी मिळालें होतें. जी आपल्या वर्चस्वाखालीं नाही अशी साम्यवादी क्रांतिही स्टॅलिनशहाला आता खपत नाहीशी झाली होती.

निरोप घेतां घेता जिलासनें स्टॅलिनला युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षासंबधी त्याचें काय मत आहे हा प्रश्न केला. स्टॅलिन उत्तरला—

“ मला कांही सांगावयाचं नाही. काय बोलायचं आणि कसं वागावयाचं हें तुमचं तुम्हालाच अधिक चांगलं कळेल. ”

जिलासनें व्हिसला परतल्यावर टिटोला सर्व वृत्तांत सांगितला, कोमिन्टर्नचें विसर्जन झालेलें आहे. युगोस्लाव्ह कम्युनिस्टांना स्वतःचा मार्ग स्वतःच आखणे भाग आहे. त्यांना फक्त त्यांच्याच सैन्याचा आतां आधार आहे.

जिलास आपली प्रतिक्रिया सांगतांना एक महत्वाचा विचार सांगतो—

“ जरी मी स्वतः कम्युनिस्ट होतों तरी त्यावेळींहि माझ्या मनांतलें विश्व हे स्टॅलिनच्या विश्वाहून फार निराळं आहे हें मला सारखं जाणवत होतं. ”

इथें जिलासच्या पुस्तकाचा एक भाग संपला. जिलासच्या मनांत जरी स्टॅलिनच्या मार्गाविषयीं आणि साधनाविषयीं कांहीं गंभीर शंका या पहिल्या भेटीत निर्माण झाल्या तरी एकदर रशियाच्या सामर्थ्याचा त्याचेवर विलक्षण परिणाम झाला. तो सांगतो–

**“ या सोविएट भूमीवर पाय ठेवला व साम्यवादी विचारांची बैठक स्वीकारली कीं जग हें आजिंक्य आहे हें खरंच वाटत नाहीं. ”**

सगळें जग साम्यवादी विचाराखाली आणण्याचें हें सुंदर स्वप्न–युद्धाच्या भयानक वास्तवतेंत जिलास पहात होता. यातलें स्वप्न कोणतें आणि सत्य कोणतें हें तपासून पहाण्याची गरज त्यावेळीं जिलासला वाटली नाही. कारण माणसें ही प्राप्त परिस्थितीत असतांनाहि स्वप्नावर जगतातच. याला जिलास कसा अपवाद असेल–?

या ठिकाणीं जिलासच्या व लाल हुकुमशहाच्या पहिल्या भेटीचा वृत्तांत संपला. या भेटीच्या वेळीं जिलास कांहीसा अस्वस्थ झाला व निवेदनात त्यानें ही गोष्ट लपविलेली नाहीं. पुढली भेट होण्यापूर्वी स्टॅलिनची जिलासवर मोठी गैरमर्जी झाली. एक सत्य विधान कुणाची भीडमुर्वत न ठेवून केल्यामुळें जिलासवर शहेनशहा खप्पा झाला. या भयंकर अपराधाच्या पडछायेंत पुढली भेट झाली. यावेळी जिलासच्या मनांत शंकाकुशंका दृढमूल झाल्या स्टॅलिनचे व मोलोटोव्हचे खरें अंतरंग त्याला दिसून येऊं लागलें. याची जी हकीगत पुढील प्रकरणांतून जिलास सांगतो त्याची ओळख पुढील भागात वाचकाना घडेल.

●●●

( पुढील अंकांत चालू )

---

# ' शठं प्रति सत्यम् 'ची सनातन आणि भव्य शोकांतिका !

A credulous father, and a brother noble
Whose nature is so far from doing harms
That he suspects none; on whose foolish honesty
My practices ride easy. I see the business.
Let me if not by birth, have lands by wit.

— *Edmond.–' King Lear '*

सरळमार्गी सज्जनाची राजकारणांतील फसगत हा एक महान् शोकांतिकेचा विषय आहे. किंग लिअरच्या रूपानें शेक्सपियरनें हा अमर केला. नाटकांतील खलपुरुष एडमंड लिअरच्या मुलीला सांगतो—

' हा भाबडा बाप, आणि दिल्दार भाऊ.
ज्याचें मन दुसऱ्याचें अहित कधीं चिंतणार नाहीं.
कुणाचा कधीं याला संशय येत नाहीं.
प्रामाणिक तर इतका कीं, जगांत त्याचें हंसें व्हावें.
माझ्या जाळ्यांत हा अचूक पडणार.
सगळें कसें सुस्पष्ट आहे. बापकमाईची भूमि माझ्या
नशिबांत नसली तरी याची भूमि आतां माझीच
आहे. '

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.

# साहित्य विभाग

साहित्याची प्रगति झाली पाहिजे याचा अर्थ त्याची गुणवत्ता वाढली पाहिजे. वाचकांचा अनुभव समृद्ध आणि संपन्न करणं हा साऱ्या ललित साहित्याचा हेतु. वाचकांचं उद्बोधन, वाचकांचं नीतिसंवर्धन, धर्मकारणाचा अथवा समाजकारणाचा प्रचार, सामाजिक सुधारणा, क्रांति, इत्यादि हेतु मनाशीं ठेवून ललित साहित्याची निर्मिति करूंच नये, असं कुणाचंच म्हणणं नाहीं. माझंदेखील नाहीं. मी असं म्हणतों, असं जे सांगतात ते माझ्या भूमिकेचा विपर्यास करण्याच्या हेतूनं सांगत असतील.उपदेश, प्रचार, सुधारणा, क्रांति अशा हेतूंच्या पोटतिडिकीनं ज्यांना कथा-कादंबऱ्या लिहायच्या असतील त्यांनीं खुशाल लिहाव्यात. अशा पोटतिडिकेनं लिहिणारे कादंबरीकार, नाटककार झालेंच नाहींत किंवा होणार नाहींत असं भलतं विधान मीं कधींहि केलं नाहीं. परंतु एवढं मात्र मी कटाक्षानं सांगत आलों आहे, कीं अशा लोकांचं जें साहित्य टिकलं आणि अक्षर साहित्यांत जमा झालं तें त्यांतल्या उपदेशामुळें नव्हे किंवा प्रचारामुळें नव्हे, तर त्यांतल्या अस्सल कलागुणांमुळें. याचा पुरावा म्हणून हवीं तेवढीं उदाहरणं दाखवितां येतील. उद्बोधन, प्रचार इत्यादींवर ललित साहित्यानं बहिष्कार टाकावा असं मला मुळींच सुचवायचं नाहीं. माझा महत्त्वाचा सिद्धांत आहे तो एवढाच, कीं उद्बोधन, शिक्षण वगैरे हेतु गौण आहेत, आगंतुक आहेत. आगंतुक अशा अर्थानं, कीं ललित साहित्याच्या सरस-नीरसतेची कसोटी त्यावर अवलंबून नाहीं. वाचकांचं मनरंजन हीदेखील खरी कसोटी नव्हे. Entertainment आणि Enlightenment असे इंग्रजींत दोन शब्द आहेत. त्यांचा वापर करून असं म्हणण्यांत येतं कीं **" The purpose of literature is not to enlighten but to entertain."** म्हणजे वाचकांचं उद्बोधन नव्हे तर मनरंजन करण्याचा ललित साहित्याचा हेतु मानावा या मताचा पुरस्कार मीं केला आहे. परंतु आतांशा मला वाटूं लागलं आहे, कीं या विधानांतदेखील बदल केला पाहिजे, Entertainment आणि Enlightenment या शब्दांप्रमाणेंच Enrichment असा एक शब्द आहे. त्याचा उपयोग करून मला असं म्हणावसं वाटतं, कीं **" The true purpose of literature is neither enlightenment nor mere entertainment ; but the enrichment of the reader's experience. "** म्हणजे ज्यायोगें वाचकांच्या अनुभूतीची विस्तृतता, समृद्धता, संपन्नता वाढेल तें खरं ललित साहित्य.

उत्कट अनुभूतीचा सुंदर अविष्कार हेंच कवितेचं, कादंबरीचं, नाटकाचं खरं अस्सल स्वरूप ! लेखकाच्या लिखाणांत त्याच्या अनुभूतीची समृद्धता जितकी प्रकट होईल आणि तिच्या सुंदर आविष्काराचा परिणाम घडून वाचक, श्रोते, प्रेक्षकें यांच्या अनुभवाची समृद्धता जितकी वाढेल, तितकी त्या साहित्याची थोरवी समजावी.

( 'हीं सात शल्यें मनीं' मधून उद्धृत. )

ना. सी. फडके.

# पाणकिडा



: अनुवादक :
अशोक शहाणे

: लेखक :
स्मरजित् कुमार बंद्योपाध्याय

तिकडं एक नळ झालाय्. हा नळ म्हणजेच ह्या वाड्याचा ठेवा. ह्या वाड्यांतल्या चार-पांच भाडेकरूंच्या मनाला उधाण आलंय् फरसबंदी शेवाळी जागा. अंगणाच्या वरच ताठ नळ आहे. बेलाच्या सैंपाकघराच्या भितींतनं नेमका आलेला. त्यालाच लागून बेलाचं घर. ओटयाच्या पट्टीला विटांच्या आडोशानं घेरलेलं सैंपाकघर. घराच्या मागं एक पेरवाचं झाड आहे. पुरषी ढंगांत उभं. फांद्या-बिद्या पण पुरषा-सारख्या मजबूत. एक कागदी लिंबाचं झाड. पेरवाच्या शेजारींच वांकून उभं. बेलाच्या नजरेसच पडलं नाहीं कधीं, कीं आपल्या घराच्या मागं टिचभर जागेंत अशीं दोन झाडं आहेत. कधीं त्यांना फुलं येतात. कधीं फळं धरतात. तीं फळं पिकतात. पांखरं किलबिलाट करतात. त्यांच्या फांद्यांवर बसल्या-बसल्या. बेलाच्या नजरेंत भरलंच नाहीं कधीं.

बेलाच्या घरालगतनंच गेलेला नळ. पण तरी हा नळ तिला कितीसा वेळ वापरतां येत होता !

पलीकडचे भाडेकरू, त्यांचीं मुलबाळं इकडं येऊन नळ उघडून वैताग आणतात. जोंपर्यंत पाणी असतं, तोंपर्यंत नळावर त्यांचे अत्याचार चालतात. पिण्याच्या पाण्याखेरीज बाकी सगळं पाणी– विशेषत: कपडे धुण्याकरतां, भांडीं घासण्याकरतां, आंघोळ करण्याकरतां–सगळंच ह्या नळावर अवलंबून. गोरं पाणी माखतात. पोटावर थापटतात. दोन्ही हातांनीं डोक्यावर चोपडतात. रजनीनं हा वाडा विकत घेतलाय्. पडकं घरच विकत घेतलं होतंन्. मग हळूं हळूं तो भेगा बुजवतोय्. आधीं घराचीं दारं, कड्या, रंगाचं काम, मग ओटा, सैंपाकघराची भिंत उभारणं– हीं सगळीं कामं आधीं बघायला लागलीं रजनीला. अन् मग अचानक पाण्याचा नळ घेऊन तो हजर झाला. जमीन उकरून पाईप ओढून आणलान् रस्त्याच्या खालच्या मोठ्या पाईपापास्नं. सुखसोयी आजकाल थोड्या-थोड्या होतायत. आतां लाइटदेखील येणाराय् म्हणे. अनिल म्हणत होता, लाइट आला कीं आपण घेणार म्हणून. बेलाच्या घराच्या आंत इलेक्ट्रिक लाइट लागणार. एकापाठोपाठ एक आशा उराशीं बाळगून जगतायत हीं.

नळानं जीव परत दिलाय् वाड्याला. इतके दिवस पाण्याचे किती हाल होते. अनिल ऑफिसांतनं आला, कीं नेहमीं पाणी भरून ठेवायचा

त्या पाण्यानं अधारांत बसून बेला आघोळ करायची. पाणी भरण्याकरतां माणूस ठेवायचा म्हणजे खर्च आलाच की. निदान सात-आठ रुपये तरी नक्कीच. त्या जागेंत पाण्याचे हालच फार. विशेषत: वैशाख-ज्येष्ठ महिन्यांत. शिवाय उन्हाळयाच्या दिवसांत चुलीशी बसून सैपाक उरकायला किती त्रास होतो बेलाला ! अग तडतडतं. मग पाणी नसलं आघोळ केली नाही तर आयुष्य सार्थकी लागत नाहीं

शिवाय बेलाला रूप आहेच. बेलाच्या रूपाचं फक्त त्या वाडयाचाच नव्हें तर ह्या पाडयालाहि आकर्षण आहे. म्हणून ती ह्या रूपाच्या वेदना सारख्या भोगत राहते. ह्या वेदना म्हणजे बेलाच्या जीवनातला एक आनंद आहे. ऑफिसच्या वेळेपुरत बेलाला जरा गप्प-चुप्प राहाव लागतं. मग अनिल ऑफिसला निघन गेल्यावर जेव्हां काम हलकं होतं, तेव्हा बेला बाहेरच्या दाराला फट ठेवून पारोशा केसाची रिबिन सोडते. पिना-आंकडे काढते. शाळेत जाणाऱ्या मास्तरणी न् मुल बघता बघतां आघोळ करायच विसरून जाते. ह्या जुन्या नीलरतन लेनचा प्रवाह बघता बघता बेलाला वाटतं, ठीकच तर आहेत की हे !

रस्त्यावरचे लोक रोखून-रोखून बघतात तिचे पातळ ओंठ. तिचा गुलाबी रंग. तिच्या गळयाशेजारची स्पष्ट वळी. तिचे लांबसडक भरपूर काळे केस. तिच्या नरम नरम दोन डोळयातली बुबळ. तिच्या हातातल्या काचेच्या बागडया. बेला अगदी निर्दोष सुदर आहे की, नाहीं, ह्याचा विचार करायची फुरसत कुणाला असणार. बेलाला काही तें कुणी सांगून जात नाहीं. पायाच्या पोटऱ्या—पायाचा बांधाच मोठा आहे. पायावर किंचित्शी काळी—काळी लव आहे. हे लक्षण बरं नाहीं ? ह्रॅत् ! त्यांत काय वाईट आहे. अनिल काहीं म्हणाला नाही चो त्याच्यावरनं.

आघोळ करायच्या वेळेलाच बेलाला पायाच्या बोटांची बेचकीं धुऊन काढावीं लागतात. फक्त तेव्हाच. तेहि वेळ व्हायचा नाही पूर्वी इतक करायला. इतक्या लोकाच्या घरात ती फुरसत मिळायची नाही. तसंच सरळ पाणी ओतून—साडी-पोलक्यावरनच अनिलनं भरून आणलेल्या पाण्यान आघोळ करायला लागायची. म्हणून तेवढं कां होईना पाणी वाचवण्याकरता बेला इतक नीट हात-पाय-अग धुवायची नाहीं. सथपणान आघोळ पण करायची नाही कधीच. झटपट पाणी ओतून घेऊन घरांत यायची आडवं लावायला.

पण काही का असेना, आतां नळ झालाय्. बेला मुद्दामच उशीर लावते. कस का असेना, आघोळ करायला मिळणारच. पहिल्या-पहिल्यादा बादल्या घेऊन सगळ्या वाडयातली गर्दी जमली होती. काय पाणी आहे ! काय जोर आहे पाण्याला ! सबंध वाडयालाच नशा चढली होती जणू अन् बेला ? सबंध वेळ ती आपली विचार करायला लागलो— किती लाबून येत हें पाणी ! शिवतळयाजवळ पाण्याच एक मोठ्ठ टॅंक झालं होत. सिनेमाला जाताना बेला तें बघून आली होती. तिथनच हे पाणी येत. अन् इतक्या लोकाचे पाण्याचे हाल सपवत.

त्या घरातील मुलगी मघेंच टपकून दोन बादल्या भरून घेऊन गेली. परत एक पाउल घासत घासत पुढं आली. "एवढं द्या ना मावशी-मिनूमावशी, हें एवढ विसळून घेतें—वरण उतू गेलं असेल—बाबाची घाई—"

झिग्याफुलाच्या रगाची साडी नेसलेली नीलूची आई नळावरील गर्दी बघून गेली. पाणी साचलेल्या जागेंत तिचे पाय भिजले. पाणपावलाचे छाप उमटले दारांत-सोप्यात.

रेखा, छबी तिकडं तयार होतायत्. बसल्या-बसल्या वेणीची रिबिन सोडतायत्. आतां त्या पण येतील. आघोळ करतील.

एवढयातच लहानशी बादली आणून चारदा पाणी घेऊन गेल्याय् कान्तम्हातारी. रात्रदिवस ती पाणी भरत असते सारख. अन् दोन मोठ्ठया बादल्या भरून ठेवते. हें करता-करताच ऑफिसची वेळ होते. सुधात, रेवती, अनिल— सगळेच आघोळीला हजर. ह्या एवढया वेळांतच धांप लागते बेलाला.

म्हातारी दारात बसून राहते रोग्यासारखी. तें त्या काळचं अंगात आहे, म्हणूच गप्प बसून राहावस वाटत नाही. जीव जातो की राहतोसा होतो फक्त पाण्याच्या वेळेला. बादल्या भरून ठेवते. पाणी जरास खर्च झालं, की हात घालून बघते— किती खाली गेलय्. परत भरते. पाणी नसल तर क्षणभरदेखील जगायची नाही. हाच म्हातारीचा रोग आहे. पाण्याशीं जणू काही लग्नच लागलय्.

म्हातारी परत नळाशी आली. व्याकूळ नजरेनं बघत बाजूला उभी आहे. कुणीतरी नळावर आहे वाटत. गेल्याबरोबर येऊन बादली लावेल.

पाण्याच मोठ्ठं टॅंक आठवत बेलाला अय्या ! किती लाबनं पाणी येतं. जमिनीखालनं. नळातन.

पाण्याच्या धारेच्या माऱ्यानं चौथरा फुटल्याय्. लहान-लहान विटकर पडल्यायत्. पाण्याकडं बघता-बघता बेलाला मधनच हसू येतं— कित्ती छान आहे पाणी !

स्वत:चा नळ झाला, तरी बेलाला त्याचा पुरा भोग घेता येत नाही. वाडयांत आणखी पाच भाडेकरू आहेत. अन् सगळयांत म्हणजे ह्या म्हातारीला पाहयलं, की बेला रडकुंडीला येते. आजकाल जादाच झालंय् तिच. हात घालून-घालून बादली घेऊन ती आपली हजर. नळाखाली आपली बादली लागेपर्यंत ठाम उभी राहते म्हातारी. ठाम उभी राहते. बेलाला अस्वस्थ होतं.

मग वैतागून बेला आपला तांबडा टॉवेल, टूथब्रश, बदामी रंगाचे ब्रासिअर्स बाजूस घेते. साबणाच्या पेटींतल पाणी ओतून साबण स्वच्छ करून ठेवते.

तोंपर्यंत म्हातारीनं बादली नळाखालीं लावलेली. अन् हात बुडवून म्हातारी बसून राहते. पाणी भरलं, कीं तिला अदाज येईल. मग सावकाश ती निघून जाते. थोडंसुद्धां पाणी कमी झालेलं खपत नाहीं म्हातारीला. अस पाणी भरून ठेवणं पण बेलाला आवडत नाही. पाणी सांठवयाची सवय नाही बेलाला. झिरझिर पाणी पडत असाव. तिथं सावकाशीन निवातपण आघोळ करण्यात एक शाति असते. निदान बेलाला तरी तसच वाटतं.

छोटी बादली घेऊन नेली उभी राहते. तोंडानं चाटते बादली. कुणाची तरी बादली नळाखाली भरत्याय्. पाणी वाहयला लागल्याबरोबर फाजील मुलीसारखी नेली ओरडली—"आभादिदी" आभादिदी, तुमची बादली बोलवत्याय तुम्हाला !

म्हणून त्या भर दुपारच्या वेळी बारीकसारीक काम उरकते. बेला वाडयातले लोक आडवे झाले कीं, मग लोकाची जत्रा भरल्यासारखा हा वाडा, त्यातलीं माणस विसरता येतात बेलाला. थोडया वेळापुरती

विसरता येतात. स्तब्ध होऊन एकाचं ध्यान करतां येतं तिला. अंगणातली सगळ्यांत अधारी जागा तिथंनच हा नळ उंच होत आलाय. काय सुंदर जागा शोधून काढल्याय्! खालीं जागजागी विटकरं दगड, शेवाळं जमलंय्. विशेष म्हणजे ही मोरी नाही वरती काहीं नाहीं. बाजूला काही नाहीं. फक्त एक नळ मोडक्यातोडक्या अंधाऱ्या जागेत. म्हणूनच वाट्टेल तेव्हां अंघोळ करतां येत नाहीं बेलाला. सगळे बाहेर गेले, घरात शिरले, इथ शात झालं, की मग बेला येते. दुपारच्या ह्या थडगार वेळेकरता वाट बघावी लागते तिला. ह्या वेळात वाड्यांतलं कुणीहि कडी काढून बाहेर आलं, तर त्याला बेला दिसेल नळाखालीं. एवढ्या वेळा पुरतीच ती वेगळी होऊन जाते. मनात अनेक गोष्टी विचारानी जडावतात. दुपारच्या वेळी हें जें पाणी पडतं. शेवाळी जागेत हे जें पाणी पडतं झिर्‌झिर्–त्यात एक वेगळी माया आहे. गोडी आहे. हें पाणी म्हणजे अभिषेकाच्या पाण्यासारखं नाहीं. शांत पेंगत्या दुपारच पाणी लिंबाच्या रसासारख, त्या वाड्यांत जेव्हां सामसूम होते, तेव्हाच घरदार साफसूफ करून आघोळीकरतां बाहेर येते. बादली लावून बादलीभर पाणी हातच ठेवते. कसलंतरी तेल लावते. तेव्हा मग घराच्या छपराजवळच्या पेरवावरून दोन-चार चिमण्या अगणात उतरतात. अंगणात दोन प्रहरचं उन्ह नाचतं. पेरवाची सावली ॲस्बेस्टॉसच्या छपरावर लोळण घेते ह्या वेळपर्यंत बेलाच काम आटपल नसलं, तरी हीच तिची स्वत.कडे पाह्यची वेळ. स्वतःच्या शरीराकड, पायाच्या पोटऱ्या, नखं सगळ्यांकडं पाह्यची ही वेळ. डुगडुगणाऱ्या दाराला लांकडी खिट्टी लावून आस्ते आस्ते बेला पाय नळाखाली पसरते. पहिल्यांदा पाय, मग मांड्या, हाताची मनगटं, मान शेवटीं कबरेला पाणी लावून ओली करून घेते, मग सबंध अग ओलं करून घेते. त्या शांत निर्मळ लिंबाच्या रसासारख्या पाण्यानं अग, हात, पाय, गुडघे–पाणी लागून सगळं ओल होऊन शिरशिरतं, कोरड-कोरड असतं–त्यामुळं ओल व्हायला माया लागते.

एक दिवस पाणी आलच नाही. रेवती, अनिल, यतीन–सगळे बाहेरच्या ट्यूबवेलवर आघोळ करून आले. सबंध वाडा रण्‌रण् करायला लागला. नळाखालची जागा इतकी झगझगीत अन् कोरडी–बेलानं कधी कल्पनाच केली नव्हती. फक्त दुपारी पाणी यायच्या आधी जागा अशीच असायची.

समोरचं दार उघडून बेला ओट्यावर आली. समोरच अंगण टाकून टिचभरच्या कडेला म्हातारी पेंगत्याय्. डोळ्याला सुरकुत्या पडलेली म्हातारी!

जरा वेळान जागीं होऊन म्हातारीनं हांक मारली–'सुनबाई" ए सुनबाई– आता तुला काय तिलोत्तमा म्हणूं काय ग, तेव्हांच ओ देणारायस?"

तिच्याशीं बोलावसं वाटत नाहीं बेलाला. पण कधीं-कधीं मात्र तिच्या बोलण्यानं फार बरं वाटतं. बेला म्हण ली–"काय? बोला ना आज्जी, का हाक मारलीत तें?" बेलानं चेहऱ्यावरचा घाम पुसला अन् नीट पाहृयलं.

"पाणी आलं नाहीं. झालं काय ह्या जळ्ळ्या नळाला? इतकं पाणी तें आजच कुणीं शोषून घेतल सगळं?" म्हातारी मिटल्या–डोळ्यांनींच म्हणाली.

"नळवाल्याचं लग्न आहे आज्जी! लग्नाचा मोसम आहे ना."

मिटल्या–डोळ्यांनीं बोळक्या–तोंडान हंसत हसत म्हातारी म्हणाली–"कोण म्हणालं तुला लग्न आहे म्हणून? तुला तो सागून गेलाय् वाटतं–दुपारच्या वेळी तूं आपली गुप्‌चुप् आघोळ करतेस नळाखालीं तेव्हा?"

बेला गप्पच राह्यली. सैंपाकघरात येऊन तिन मान कळवून पाह्यलं. परत म्हातारीचं बोलणं आठवल्याबरोबर हंसू आलं. उभ राहून ती म्हणाली–"लग्न आहे आज्जी. खरंच लग्न आहे!" गल्लीच्या वळणावर कुणीतरी नवरदेव अन् नवरीमुलगी उतरले. बेला म्हणाली "नळवाल्याचं पण लग्न आहे आज!"

जरासं उशिरां आज पाणी आलं, तें खूप वेळपर्यंत राह्यलं. दुपारीं ज्यावेळीं बेला आंघोळ करायची, त्याच्या मध्यांतच पाणी निघून गेलं. रागानं फणफणत बेला निघून आली. तिनं केसातनं फणी फिरवली पावडर लावली. चोळी घातली. अन् संध्याकाळ होईपर्यंत ती पडून राह्यली गार जमिनीवर.

अंगणातल्या सगळ्यांत अंधाऱ्या जागी भिंत फोडून नळ जियं कणा ताठ करून उभा होता, तिकडं बघून भयकर राग आला होता बेलाला.

काय आश्चर्य आहे. दुसऱ्या दिवशीं पण पाणी असंच उशीरा आलं. अनिल, रेवती, यतीन–ही ऑफिसची मडळी–ती ट्यूबवेलवर आंघोळ करून आली. तोंडान बड्या-बड्या गोष्टी बोलली.–"रिपोर्ट करतो साल्याच्या नांवानं–साल्याची नोकरीच घालवतो." मग ऑफिसला गेल्यावर कांही नाही. कुणाला कशाच काय! बेलाचा राग सांचत राह्यला हळू हळू.

म्हातारी बादली हातांत घेऊन दारात बसून राहते. उन्हं अंगावर येतय्. तोंडावर पडलय्. पाण्याचा आवाज येत नाहीय्. इतक्या भाडेकरूंच्या तोंडावर हात ठेवून पाणी कांहीं आल नाहीं. आतां रडूं येतय् ती जागा पाह्यल्यावर. कोरडी जागा. दगड, विटकरं, चौथरा– सगळ रणरणतंय्.

"सूनबाई, तुझं पाणी आलं नाहीं तें"—म्हातारी म्हणाली.

"माझं पाणी! ऊं! पाणी काय फक्त माझं एकटीच आहे वाटतं, तुमचं नाही? तुम्हीदेखील पाण्याकरितां वेड्या झालेल्या असता तें"

म्हातारी डोळे मिटून बोलते. "मला पाणी नसलं तर चालत नाहीं. सगळे माझ्या नांवानं ओरडतात तें पहातेसना तूं! तरी पाणी हवंच. हातपाय वळवळतात पाणी नसलं म्हणजे. पाणी हें हवच."

कनकची आई येऊन गेली. "अजून आलं नाही पाणी! काय अक्कल आहे!"

बेला म्हणाली–"त्याचं लग्न झालंय् परवांच. काल पण उशिरांच आलं पाणी. आज गर्भादान. त्यामुळ आज पण लक्षांत नसेल नळ सोडायच. आतां नोकरी करायचं पण विसरून जायचा कदाचित्." जरासं गभीर होऊन परत म्हणाली–"जबाबदारीची काही जाणीव नाही, ही कसली माणसं! रिपोर्ट करायला पाह्यजे. उकाड्याच्या दिवसात इतक्या लोकाचे हाल होतायत! छीः!" बेलानं तोंडावरला घाम पुसला.

दुसऱ्या दिवशीं थोडसं पाणी आलं अन् लगेच बंद झालं. बेलाची पण आंघोळ झाली नाहीं. म्हातारी म्हणाली–"काय ग सूनबाई,

काही कळल का ? पाणी का सोडत नाहीं ह्या नीट ? असल्या कामांत का म्हणून ढिलेपणा ?"

बेला परत हसली. म्हणाली– "आज गर्भादान आहे ना, म्हणून. मीं म्हटलं ना लग्न झालंय् नळवाल्याचं, तेव्हा काही दिवस हें असंच चालायच."

म्हातारी गालातल्या गालात हसली.

बेलाची आघोळ झालीच नाहीं. त्या दिवशी अनिल गेला होता त्या माणसाकड. तो तिथं नव्हता म्हणे, जरा बाहेर गेला होता. जरा-वेळानं परत आला. अनिलला फार आदरानं वागवलन्.

..."ओ हो ! मशिन बघायला आलांत ? या या ! सगळं दाखवतो." असं म्हणत हंसत हंसत दार उघडलं त्यानं. जळक्या तेलाचा वास. मशिनचा जोरांत हसल्यासारखा आवाज. अनिल उभाच राह्यला. मग त्या माणसानं स्विच दाखवला. म्हणाला स्टार्टर स्विचचा फ्यूज गेला कीं, तार लावून दुरुस्त करून टाकतो. स्वतःच करतों.त्याला जास्तीत जास्त पंधरा-वीस मिनटं टाइम लागतो. स्वत.च्या हातचं काम ! किंवा मेनमधें कांही घोटाळा झाला तर, तो दुरुस्त करायला तरी असा काय वेळ लागतो–हाः हाः–पण सप्लायच जर बंद पडला तर तें माझ्या हातातलं नाही–सप्लायच बंद पडला, तर मला दोष देऊं नका, नळवाला माणूस हसत होता. मोठ्या मशिन-समोरनं पलिकडं जाऊन रेंच, स्क्रू-ड्रायव्हर, थोडीशी तांब्याची तार आणून त्यानं ह्या बाजूला ठेवली...

काहीं ऐकलं नाही बेलानं. सप्लाय् बंद पडणें म्हणजे काय ? सप्लाय फेल झालंय् म्हणून पाणी येत नाहीय्. तिनं म्हातारीला समजाऊन सांगितल–" तें काहीं नाहीं आज्जी–खरं कारण म्हणजे नवी बायको–तिनच बांधून ठेवलय् त्याला."

म्हातारी परत हसली तोंड वळवून.

अनिल, रेवती, सुशांत ऑफिसला बाहेर पडले, की दुपारच्या सुमारास पाणी यायला लागलय् आताशा. काय चावट आहे पाणी ! अन् किती चावट आहे नळवाला ! बायकांच्याबद्दल इतकं आकर्षण ! माणसं ट्यूबवेलवरनं अर्धवट आघोळ करून आलीं. अन् मग बेला जेव्हां साबणाची पेटी घेऊन, केंस पाठीवर मोकळे ठेवून हजर झाली अन् पाणी यायला सुरुवात झाली. खळखळून हंसली बेला अंगणांत उभं राहून. जरा दाबल्यावर परत हसूं थरथरून आलं. सबंध अंगांत भिनलं. अंग थरथरल. कंबर-पोट डोलायला लागलीं. मग परत ढवळून आलं. असलं हंसू अगदी सहजासहजीं रिचवतां येत नाहीं. शरीराच्या अगदीं दाट संवेदनांना हें हंसण्याचं पीस गुदगुल्या करून गेलं. त्या संवेदना इलेक्ट्रिकचा शॉक बसलेल्या तारासारख्या हलायला लागल्या. अनिलपाशीं झोपताना कधीं-कधीं हसू उफाळायच. त्याचं एक कारण होत ह्याचंहि नेमकं तसच एक कारण आहे. आज्जीला ऐकू येईल कदाचित्. छॅत् ! म्हातारी जेवणखाण उरकून लवंडल्याय् असल्या बाबतीत ती काही फारसं लक्ष देत नाहीं.

किल्बिल्-किल्बिल्, खुळ्खुळ्-खुळ्खुळ् करत झेपावत पडतंय् पाणी. पाण्याचा वेग बघून खरच चावट म्हणावंसं वाटतं त्याला. आता हा नळवाला कदाचित् बसल्या-बसल्या विचार करत असेल– नळ-बीळ बद करून सासुरवाडीला जाण्याबद्दल शनवारीं पाणी नक्कीच बंद राहील. रविवारीं सकाळी पण बंदच राहील. मग परत येईल. खूप तन्हांनीं विचार घोळवले बेलान. बेलाच सबंध अंग आज कसंसंच करत होतं. बराच वेळपर्यंत बेलान आघोळ केली नाही उन्ह दारूचं झाड लावल्यासारखं सबंध अंगणभर विखुरलय्. चिमण्यांनीं अस्बेस्टॉसच्या पत्र्यावर हैदोस चालवलाय्. पेरवापाशी दोन पाखर. एक रंगीत चोंच उंच करून बसून राह्यलय्. छपराजवळ एका लांबु-डक्या लाकडी पट्टीवर कावळा स्वस्थपण अन् ठामपण बसून राह्यलाय्. एखाद्या नागड्या देहासारखी ही दुपार, इतक बर वाटत ह्यावेळी. अंगणांत कुणाचीच चाहूल नाहीं. फक्त बेलाच तेवढी. अन् अंगणातल्या सगळ्यात अधाऱ्या जागी–जियं नळ कणा ताठ करून दगडा-विटाच्या चौथऱ्यांवर उभा आहे–तिथं सों सो आवाज काढून आपल्या येण्याची बातमी पाणी सगळ्याना देतंय. कानाशीं नळ कुजबुजतोय. वाटतय, फक्त बेलालाच तेवढ हे कळतय. डुगडुगत्या लाकडी दाराला खिट्टी बसवून बेला गप्प उभी राह्यली. जमिनीवर थुकली तिकडं पाहून अन् दुसरीकड कुठतरी मन ठेवून बेला विचार करत राह्यली. मग एकदम वाट्टेल त्या गोष्टीची आठवण झाली...तांबडा रंग...नळावर फोनो आणून वाजवतंय वाटतं कुणीतरी...पेरवाच झाड एकदम मोठ्ठ होऊन अंगणात सांवली धरतंय्...मग ह्या शेजार शेजारच्या खोल्या वांकड्या तिकड्या होऊन एकमेकात मिसळून जाऊन कबूतरांची लहान लहान खुराडी होतायत. क्षितिज गोल फिरतय, झाडं फिरतायत. घरं इमारती फिरतायत. आकाश एक शिशाचं छप्पर होऊन डोक्याजवळ हालतय. ( त्याचा रंग शिशासारखा दिसतोय. ) सबंध अंग थरथरतंय्. आः –आः करतंय्. ज्येष्ठांतलं दुपारचं उन्ह लागलेल्या कुत्र्याच्या जिभेसारखं. अंगांतलं सगळ रक्तच जणूं गोल-गोल फिरतंय. डोक्याची एखादीच बाजू एकदम भयानक थंड वाटत्याय्. म्हणजे तिथं रक्त नसेल, ! रक्त खालीं उतरतंय. शंभर चिल्ल्यापिल्यांची आई झालोंय् आपण. अन् हजार पानाच्या सैपाकघरांत बसून आहोंत. पलीकडल्या वाड्यांतली आळता भारलेली बाई आठवली एकदम. तिला फक्त एकदांच पाह्यलय्. गिलीट केलेल्या सोन्याचे दागिने घालणाऱ्या त्या लाल वाड्यांतल्या मुली आठवल्या. अंग ढवळून निघालं आठवण झाल्याबरोबर. विचार आपल्या हातानं स्वतःला ओढत नेत होते. आपल्या मनांतलं सूत जणूं बेलानं ढिलं सोडल होत. एक अडुळशाचं झाड म्हणजे बेलाला आपले आई–वडील वाटले. त्याची पातळ पानं बेलाच्या आजारी वडलांच्या म्लान हसण्यासारखीं. बाबा–बाबा म्हणून बेला ओरडलीदेखील वाटतं. गळ्यांत श्वास कोंदला. कधी केव्हां आगगाडीतन जाताना एक वाडा पाह्यला होता–वादळानं पडझड झालेला, समोरच बांधीव हौद असलेला–तो वाडा आठवला. अन् बेलाला वाटलं, तो हौद सिमेंटनं अन् डांबरानं कुणीतरी बुजवून टाकतंय्, अन् रुवूच्या घरातली ती बाई सारखी डोळ्यात सुरमा घालून मिरवत असते–ती असह्य बेलाला दिसली. तिच्या चेहऱ्याच्या मजबूत जागेंतनं मिशा बाहेर आल्या होत्या अन् आपल्या अंगातली चोळी किती मोठ्ठी होऊं शकेल, ह्या विचारानं बेलाच सबंध अंग काहीतरीच झालं. चोळी खूप मोठ्ठी झालयाय्. चोळीच्या आंत अंग शिरशिरलं. पाय, हाताची मूठ पायाच्या पोटऱ्या– सगळं ठिसूळ झाल्यासारखं वाटलं. रागानं गडबड-गुंडा होऊन गेला. एकदाच तेवढं वाटल–हें काय झालंय् आपल्याला ? मग सारख वाटत राह्यलं, पायाखालची जमीन थरथरत डोक्याच्या अगदी जवळ जवळ येत्याय्......

बऱ्याच वेळानं बेलानं डोळे उघडले, तेव्हां तिन्हीसांजा झाल्या होत्या. तिनं पाह्यलं, फक्त आजी तेवढ्या जवळ बसून पंख्यानं वारा घालत होत्या, डोक्यावर पाणी ओतणं आटपलं होतं. सबंध अंगावरले कपडे अस्ताव्यस्त झाले होते, म्हातारी जप करत होती. उशाशीं कांहींतरी पुटपुटल्यासारखं शिव शिव.

म्हातारी शिव–शिव म्हणत्याय्. नेमकं सैंपाकाच्या वेळेलाच वाऱ्यानं चिमणी विझू नये, म्हणून जशी शिव–शिव करते तसंच हेंहि.

मग अंगावरनं हात फिरविला म्हातारीनं. "सूनबाई, उठलीस का सूनबाई ? पोरटं पण येईल आत्ता. इतका उशीर कां रे लावतोस बाबा ? दुसऱ्याचा जीव घेऊन बसून राह्यलेयं मी इथं."

हात हालवून, बोलूनच ओळखलं म्हातारीनं, कीं बेला आतां जागी झाल्याय्. "उठलीस सूनबाई ? उठलीस ? काय झालं ग ? अँ ? इतकी कशाची काळजी करतेस ह्या वयांत ? तूं तर चांगली सुखांत आहेस बाई ! मग इतकी काळजी कसली करतेस ? पांच पोराबाळांचं लेंढार नाहीं. कांहीं नाहीं. एकटीच तर आहेस. तुला कसली काळजी ? अनिल कांहीं बोलत नाहीं–माया नाहीं कां अनिलची तुझ्यावर ? मला सांग ना. ?"

धडपडत बेला उठून उभी राह्यली. "कांहीं झालं नाहीं आज्जी ! काय व्हायचंय् ! आईग ! बराच वेळपर्यंत आंघोळ राह्यली होती–उकाड्यानं होतं असं. सोडा वरं, तुमचं आपलं एक भारीच !"

"म्हणूनच माझं पाणी भरून ठेवलेलं असतं सूनबाई ! चिडून जाऊं नकोस उगीचच. रात्रंदिवस कशाला पाणी भरतें मी, कशाला पाणी भरतें–तुम्हांला काय कळणारंय् ?–कां आतां ह्या वयांत धाप लागली तरी पाणी भरत असतें मी तें ? तुम्ही नुसत्या सुंदर पोरी–पण अक्कल आलेली नाहीं अजून. रात्रीं बेरात्रीं कुणाला काय होईल, कांहीं सांगतां येतं कां ? म्हणूनच पाणी भरून ठेवतें मी ? मला सारखी भीति वाटत असते."

बेलानं मुकाट्यानं सगळं ऐकून घेतलं

मग न्हाव्याची बायको आल्यावर सगळंच प्रकरण जिरून गेलं. वादळ शांत झालं. अन् शिवाय नवीनच एक चव आली. बेलाला आठवलं–आज गुरुवार. सकाळीं लक्ष्मीपूजा झाल्याय्. म्हणून दर गुरवारसारखीच आज पण आल्याय् न्हाव्याची बायको. पाय धुवून घेऊन कोंपऱ्यांत बसली. नखं काढलीं. आळत्याच्या पट्टीनं दाट आळता माखला पायांना बघतां बघतां दिवेलागणी झाली. अनिल पण आला. जरासं उशिरानंच. आंबे घेऊन घामानं थबथबत अनिल आला. कांहीं तरी गरम करून द्यावं म्हणून बेला उठली. रवा काढून तयारी करायला लागली !

बाहेर जरा वारं होतं. म्हणून उघड्या अंगानं ओट्यावर बसून अनिल म्हणाला–"नळवाल्याबद्दल तो रिपोर्ट कांहीं करणं झालं नाहीं आज !"

"कां ?" बेलानं विचारलं, "असं काय काम असतं तुम्हांला ?"

"मी गेलों होतों ग. पण रिपोर्ट करून एखाद्याची नोकरी घालण्यांत काय फायदा ? शिवाय नुस्तीच ट्रान्सफरदेखील करतील दुसरीकडं कुठंतरी. शिवाय–"

"शिवाय काय ? अन् जातांना इतकी तणतण केलीत ती ! ठीक आहे, करा कष्ट आतां !"

"त्याची कांहींसुद्धां चूक नाहीं ग. संसारी माणूस मुलीला स्थळ बघून दिलंय् चांगलंसं. मुलींचंहि लग्न करून दिलंय्. स्वतः संसारी झाल्यावर आतां आईबापांना विसरून गेल्यात् तीं. म्हणून बिचाऱ्याला ह्या उतारवयांतदेखील राबावं लागतं. नळाला पाणी येत नाहीं, अन् आलं तरी मधनंच बंद होतं, असं सांगितल्यावर म्हणाला–काय करूं बाबू ? माझी कांहीं चूक नाहीं. तिकडं करंट फेल होतो, त्याला आपण काय करणार ? मशीन सुरूं करून तो आपला गीता वाचत बसतो. पण भारी धार्मिक वृत्तीचा माणूस बरं का ! शिवाय खूप वय झालंय् आतां–चांगलंच वय झालंय् !"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अनिल ऑफिसला गेल्यावर बेला नळावर आली. शांत दुपारीं दोन-चार चिमण्यांत मिसळून गेलेली ही दुपार भारी आवडली तिला. तिनं पाठ धरली–गोरी गोरी पाठ ! पाण्याच्या जवळ. अंगाणांतल्या सगळ्यांत अंधाऱ्या जागेंत जो नळ आहे, त्याच्या खालीं आज बेलानं. सबंध अंग अंथरलं, कांहीं लाज–शरम वाटत नव्हती तिला. दगड-विटांचा चौथरा. बेलाच्या पाठीवरनं पाणी पडत होतं. दुपारचं कोंवळं पांढरं पाणी. आज मात्र बेलाला वाटलं, कीं आपल्या सैंपाकघरालगतनं जो नळ आडवा गेलाय्, पाणी देतोय् वेळीं अवेळीं, तो चांगलाच कुबड्या आहे. खूपच कुबड्या आहे. खूप जुना-पुराणा नळ. खूप वर्षं पार करून आलेला, रंग उडालेला, डांबर फासलेला नळ कुबड काढून उभा आहे. चागलंच कुबड आलंय् त्याला. अंगणांत कसलाच आवाज नव्हता. फक्त बेलाच्या गोऱ्या कमरेवरनं अन् पाठीवरनं दुपारचं कोंवळ पांढरं पाणी पडत होतं–सिलसिल्––लिक्लिक्––सिल्सिल्––!

●●●






## थांबु नको . . .

स्वार्थ दंभ दिवाभीत
भर दिवसा वावरती
द्वेष–द्वैत–द्वंद्व रोग
जन मानस पोखरती
अजुनी नच ताठ उभा
नीतीचा दंडकणा
थांबु नको नव तरुणा,

धर्म हवा सत्याचा
राज्य हवें न्यायाचें
क्षितिजाचें लक्ष्य हवें
हृदय हवें सिंधूचें
असलें सामर्थ्य हवे–
भय वाटावे मरणा
थांबु नको नव तरुणा,

ध्वज न चढे यशशिखरीं
युद्ध तोंवरी न बंद
ध्येय जोंवरी सु–दूर
वेग तोंवरी न मंद
मानवता–सैनिक तूं
गड चढणें तव बाणा
थांबु नको नव तरुणा,

सुधांशु

## पहांट

ओलसर झाली
नारींगाची वाट
थेंबता पहांट...हळुहळू
इवल्या थेंबांशी
घुटमळे वारा
शहारला पारा...पानांवरी
असाकसा आला ?
वाऱ्यासवें गंध
मनाचा मुकुंद...बावरला.

ज्ञानेश्वर शंभरकर

## ' फकिरी '

जन्मतांच रे, दिलीस हातीं
चुकून या शब्दांची झोळी
तेव्हांपासून फकीर झालों
निळचा नभाची मशीद झाली.

तेव्हांपासून नग्न मनाला
शुभ्र धुक्याची फांसुन रक्षा
तुझा हवाला देऊन फिरतों
नक्षत्रांची मागत भिक्षा

भणंग फिरतो माळावरती
घालुनिया स्वप्नाची कफनी
मातीच्या डोळघांनीं बघतों
मृगजळाचें हळवें पाणी

जन्मतांच रे, दिलीस हातीं
चुकून या शब्दांची झोळी
तेव्हांपासून फितुर झाल्या
कवितेच्या मज चार ओळी.

द. मा. खरात

## ऊन–सावलीचा खेळ

तप्त प्रखर उन्हांत–
नित्य चालला प्रवास,
दोन पाऊलें साऊली
पुन्हा उन्हाचाच त्रास ! –
वाटचालींत अखंड
ठायींठायीं तरुतळीं,
शीत शांत सावल्यांनीं
आहे विणलेली जाळी ! –
अशा शामल छायेंत
थोडा लाभावा गारवा,
शुष्क सुस्कार सोडीत
पथ पुढें आक्रमावा ! –
...कुठें–मला न माहीत–
माझें विसाव्याचें स्थळ,
मार्गी मात्र चालूं आहे
ऊन–सावलीचा खेळ ! !

विश्वनाथ जोशी

## जाग

उठा वयाघना, लावा निरांजनें
देहांतलें सोनें काळें झालें.
झोपेंतले जीव झोपेंतच मेले
आभाळचि गेलें पंखापाशीं...
इथें नागव्यानें शोधाया आचार
जैसा व्यभिचार जोगिणीचा.
उष्टावली पोर हिंडे दारोदारीं
तंसें माझ्या घरीं नारायणा
' पंढरीचें पेठें ' रात्र मोडी वाटे
दगडाला कांटे फुटलेले.
गोंजारुनी घेना माझें हें लांछन
रक्ताला दूषण देण्यासाठीं.

ग्रेस



: लेखक :
भीमराव कुलकर्णी

दुपारची वेळ होती. चपचपीत ऊन पडलें होतें आणि गांवाबाहेरच्या ओढ्यावर ती एकटीच कपडे धूत होती. गांवापासून दोन मैलांच्या अंतरावर ओढ्याला खूप खळाळ पाणी होतें. कांठावरच्या काळ्या कुळकुळीत फत्तरावर उभं राहून कपडे धुण्यांत फार बरं वाटायचं म्हणून ती एवढं अंतर तोडून मुद्दाम भर दुपारच्या वेळीं ओढ्यावर अगदीं वरपर्यंत एकटीच आली होती. डोक्याला उन्हाचे चटके बसत होते म्हणून तिनें डोक्यावर पदर घेतला होता. वाहात्या थंडगार पाण्यांत ठेवलेल्या पायाखालून हळुहळु वाळूचे कण सरकत होते आणि ती मोठ्या तन्मयतेनें खडकावर कपडे धोपाटण्यांत चुस्त होती. खडकावर कापड आपटल्याचा खूप मोठा आवाज होत होता आणि आजूबाजूच्या डोंगरावर आपटून त्याचे सारखे घनगंभीर प्रतिध्वनि उमटत होते.

हातांतल्या पातळाला समाधान होईपर्यंत आपटल्यानंतर तिने तें पलिकडे ठेवलें आणि आपटण्यासाठीं गांठोड्यांतलें धोतर उचललें. उचलतांनाच तिला तें नेहमींपेक्षां थोडें जड लागलें; आणि धोतरांतून गिळगिळीत असा कसलातरी स्पर्श जाणवला. कुतुहलानें तिनें झटकन् धोतराचे पदर निराळे केले आणि एकदम् हातांतील धोतर खडकावर टाकून ती दोन पावलें मागें सरकली आणि जोरानें कानांवर हात ठेवून किंचाळली. तिच्या किंचाळण्याच्या कर्कश प्रतिध्वनि साऱ्या आसमंतांत घुमून राहिला. तिच्या कपाळावर दरदरून घाम फुटला होता आणि कुत्र्याच्या जिभप्रमाणें काळीज थराथरत होतें. भयभीत नेत्रानें तिनें पायासमोरच्या खडकाकडे पाहिलें. पिवळा जर्द साप अंगाला वेटोळें देऊन खडकावर पडला होता आणि त्याची शेपटी नुकत्याच रस्त्याच्या कडेला बसलेल्या लहान मुलांच्या पायाखालच्या जंतासारखी वळवळत होती.

लांब राहून एक-दोन मिनिटें ती त्याच्याकडे पाहात राहिली. वळवळणारी शेपटी आणि अधूनमधून तोंडामधून येणाऱ्या चिरल्या जिभा याखेरीज कांहींच त्याची हालचाल दिसेना. तशी ती धीर करून पुढें आली व दोन-चार वेळा तिने हातवारे करून "शुक् शुक्" केलें. परंतु त्या सापावर त्याचा कांहींच परिणाम होईना. तेव्हां शेवटीं तिनें फुफाट्यांत पडलेला शिंदीचा झडपा आणला आणि लांबूनच तिनें एकदा त्या सर्पाला डिवचून पाहिलें. त्यासरशीं "फुस्स" करून त्यानें फणा उभारला व घाबरून तोल जाऊन ती मागें प्रवाहांत कोसळली. अंगावरून निथळणाऱ्या पाण्यासरशी ती सांवरून उठली आणि त्याच्या फण्यावरच्या दहाच्या आंकड्याकडे पाहात स्वतःशींच म्हणाली.

"बयाईग, नागुबा दिसतुया!"

पुन्हा तो सर्प सुस्त पडून राहिला आणि ती त्याच्याकडे डोळ्यांच्या कोपऱ्यांतून पाहात राहिली. बराच वेळ ती त्याच्याकडे त्या नजरेनें पहात राहिली आणि मध्येंच तिचें त्याच्या डोळ्यांकडे लक्ष गेलें. पिवळ्या जर्द अशा त्याच्या कांतीवर रखरखतें ऊन सोनाराच्या मुशींतल्या सळसळत्या सुवर्णरसाप्रमाणें लकाकत होतें आणि त्याचे डोळे मात्र अगदींच घाणेरडे वाटत होते. त्याच्या डोळ्यांकडे नजर जातांच ती एकदम शहारली.

त्याच्या नजरेच्या रूपानं तिच्यासमोर 'तो' दिसूं लागला. ज्याच्या केवळ आठवणीनं अंगाच्या संताप व्हावा आणि कुत्र्याच्या मोलानं थुंकावं अशी त्याची किळसवाणी मूर्ति तिच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. घराच्या उंबरठ्यावर संध्याकाळ झाली कीं दारू पिऊन तो असाच अस्ताव्यस्त पडून राही. शून्य नजरेनं पडल्या पडल्या अभिलाषेनं तो तिचं अंगप्रत्यंग न्याहाळीत राही आणि शिव्यांचा भडीमार करीत ती त्याची नजर चुकवून उंबरठ्याबाहेर पडण्याची खटपट करीत असे परंतु त्याच्या त्या थिप्पाड, किळसवाण्या देहाला ओलांडून जाण्याइतकें बळ तिच्या पायांत कांहीं केल्या येत नसे. आणि मग असह्यानें ती अस्वस्थ चुळबूळ करीत राही. कुठून झक मारली आणि ह्या राक्षसाचें भक्ष झालें असें तिला होई आणि मध्येंच केव्हांतरी खोकल्याची ढास लागून त्याच्या खंक घसा वाजायला लागला कीं कोणीतरी आपल्या गळ्याभोंवतीं करकचून फांस आवळून आजूबाजूला कर्कश

आवाजांतील भयवाद्य वाजवावयाला सुरुवात केली असल्याचा तिला भास होई.

पानविक्या आईची ती एकुलती एक मुलगी. आई गांवात जहाबाज म्हणून समजली होती आणि आईकडे येणाऱ्या पुरुषाच्या नजरेंत तिच्या दर्शनानें नुकतीच कुठे चमक उठायला सुरुवात झाली होती. इतक्यात तिची आई त्या असाध्य रोगानं आजारी पडली. तिने अगोदरच्या काही दिवसात तिच्याकडे लक्ष देण्याचें ढोंग केले आणि अचानक एके दिवशीं कोपऱ्यांत मेलेली पाल पाहून तिनं एका दिवसांत आईचा काटा काढून टाकला.

आणि मग गांवातून सगळयांच्या नजरा चाळवीत बेफामपणे ती हिंडूं लागली खरी, परंतु तिनें कोणाच पुरुषाला अगदी जवळ येऊ दिलें नाही. पुरुषाना उल्लू बनवून त्यांच्या खिशातील बुडांना कात्री लावण्याचा खेळ तिला विलक्षण आवडू लागला.

आणि अशा या सावध खेळांत अचानकपणें त्याने बेमालूम तिचे पाय ओढले. गांवाबाहेरच्या सळयावर एकटीच भर दुपारीं हुंदडत असतां अचानक पाण्यांतच त्यानें तिला पकडले आणि मग तिनें खूप चावे घेतले, धडपड केली, बोंब मारली. त्या धडपडीमुळें अगावरच्या वस्त्राच्या जसजशा चिंध्या होऊं लागल्या तसतशी तिची रग जिरवीत गेली आणि काळया वाळूवर पडलेल्या तिच्या गाजरासारख्या रसरशीत शरीराला शेवटीं एक लाथ मारून तो वाघासारखा निघून गेला.

आणि मग तिच्या घरांत तो हक्कान वावरू लागला. दाराच्या बाजूला टाकलेल्या बाजल्यावर सकाळ-सध्याकाळ लोळत रस्त्यावरची रहदारी न्याहाळूं लागला. तासनतास गोधडीत डोकं खूपसून पडून राहूं लागला.

आपलें तोंड वेटोळघात लपवून सुस्त पडलेल्या त्या सापाकडे पाहून संतापानें तिचे मस्तक भणभणू लागलें.

"मेल्या लाज नाही वाटत असं मुडद्यासारखं पडून राहाला. सकाळ–संध्याकाळ गिळायला कसं आयतं येत. तुझ्या बापानंच जणूं गठड आणून ठेवलय !"

"ए, बाच नाव घेऊं नगस. अशी कबऱ्यात लाथ घालीन कीं, पेकाट यंवयंव करायला लागंल !"

"अरं जा, लई आलाय पेकाट मोडायला? लई ऐकून घेतल्या तुज्या गमजा. आतां मुकाट्यानं चार घास गिळ आणि कुत्र्यावानी पडून रहा" आणि रागानं तिनं जवळच पडलेला धोंडा उचलला आणि सापाकडे त्वेषाने भिरकावला. शेणाच्या पाटीत पडलेल्या दगडाचा पचकन आवाज व्हावा, त्याप्रमाणें त्या वेटोळयाच्या मध्यभागी तो दगड जाऊन पडला आणि पुन्हा एकदा आपला फणा उभारून त्याने फुस्स् केलें,

–चुलीत बक्कळ जाळ करून भाकऱ्या भाजता भाजतां माखलेल्या पिठाचा हात तसाच ठेवून ती उठली. चुलींतल्या जाळाचा झगझगीत गुलाबी रंग तिच्या अगोदरच्याच तांबूस रंगावर पसरलेला होता आणि हाताच्या लोंवसडक सावल्या भिंतीवर कमीअधिक होत होत्या.

"चल माझ्या घरांतून ! बाहीर पड. लै आलाय गुरकायला चल जातूस की नाही ?"

हातातील शिंदीचा फराटा घेऊन ती त्याला डिवचून हाकलण्याचा प्रयत्न करीत होती आणि तो अंगावर येतो आहेसें पाहून ती मागें मागें सरकत होती.

"ए रंडके, गप्प बसतीयास मुकाट कां थोबाड फोडून घ्यायची हौस आलीया ?" बाजल्यावरूनच तो गुरगुरत होता आणि अतर्यामी ती घाबरली असली तरी मनीं बळ बांधून त्याला धाडधाड बोलण्यासाठी ती सिद्ध होती.

"ये बगूं कसं थोबड फोडतुयास तू ?" ती तरातरा आवेशाने केस पिंजारून त्याच्यापुढें उभी होती. आणि अगावरची गोधडी उडवून लावून त्यानें तिला उभ्याउभ्याच बुकलायला सुरुवात केली. तोंडाला फेंस येईपर्यंत ती ओरडत राहिली आणि शेवटीं असह्य यातनेमुळें सूडाच्या आसुडाचे पीळ अंतःकरणांत भरीत ती खाली कोसळली.

दमलेले बाहू बाजल्यावर टेकवून तोहि शातपणे चुलीतल्या जाळाकडे पाहात राहिला.

खडकावर मागें कोसळल्यामुळें खरचटलेल्या हातावर फुंकर घालीत ती रागाने बेभान होऊन उठली. त्यावेळी वेटोळघांत तोंड खुपसून तो स्वस्थ वेडयासारखा पडून राहिला होता.

"मुडद्या, माझ्याच घरचं खाऊन पुन्हा मलाच वर मारतोस व्हयर ?" त्याच्याकडे पाहातां पाहातां तिनें त्याला कण्हतच परतु जोरानेंच विचारलें आणि शिंदीच्या काटयाचा मोठा फराटा घेऊन त्याला टोचून टोंचून बेजार करावं या आसुरी आनदाच्या कल्पनेनं ती बेभान झाली.

जमिनीला रेटा देऊन उठतां उठता तिच्या साऱ्या अंगांतून सुया टोचल्यासारख्या वेदना होत होत्या आणि तेवढ्यांत समोरच्या भिंतीवर तिला ती पिवळीजर्द पाल दिसली.

शिंदीचा काटा अंगाला लागला की तो थोडीशी चुळबूळ करूं लागला आणि पुन्हा वेटोळयात मान खुपसून पडून राहूं लागला. फारतर वेटोळं सोडून थोडीशीं नागमोडी हालचाल करून पुनः पुनः तो वेटोळयात गुरफटूं लागला. त्यामुळें तिला चागलाच चेव आला आणि जोरजोरानं ती त्याला काटयाने ढोसकूं लागली. प्रतिकार करण्याचा तो दुबळा प्रयत्न करूं लागला परतु त्याच्या प्रतिकारात फारसा अर्थ राहिला नाही. डोळयांचो उघडझांप करून तो असह्यतेनें तिच्याकडे पाहूं लागला.

दिवसेंदिवस त्याचें शरीर खगू लागलें. आणि ज्या गळयात त्यानें मारुतीचा ताईत बाधला होता त्याच्या भोंवतालच्या शिरा आणि हाडें मरतुकडया हत्तीच्या पुढें आलेल्या दंताळयाप्रमाणें दिसू लागली होती.

"मेल्या ऽ लई फुसफुस चालविली हुती न्हवं कां ? आतां कसा मढयावानी पडून राहिलाय ! डोळं मिटलं म्हणून मी नाहीं फसायची. तुला दगडानं ठेचून ठेचून मारीन तवाच मला भाकरी ग्वाड लागल. मुरदाडा एकटी तुझ्या हातात गावले म्हणून मला म्याऽ दावीत हुतास न्हव का ?"

समोरच्या बाजल्यावर कण्हत, कुथत पडलेला 'तो' पाहून तिची अल्लड वृत्ति पुन्हा जागी होऊ लागली. रस्त्यावरच्या येण्याजाणाऱ्याकडे पाहून ती डोळे मिचकावू लागली आणि चुकून जर त्याचे तिच्याकडे लक्ष गेले तर मुद्दामच त्या गोष्टी ती मोठ्या प्रमाणात करू लागली.

वळवळ करण्याची त्याची इच्छा सपली होती आणि आत्तापर्यंतच्या हालचालीनं ता खूप दमला होता. त्याला आता एकदम चागली विश्रांति हवी होती.

दोन दोन दिवस न खाता-पिता तो आता

खाटल्यावर पडून राहू लागला. त्याच्या शरीराच्या त्या भयानक अवस्थेकडे पाहून सारा गाव अचवा करीत होता. आणि खुद्द त्याच्या डोळ्यांसमोर रात्री-बेरात्रीं गळ्याला रंगी-बेरंगी रुमाल गुडाळलेला कुणी बेधडक घरांत घुसत होता आणि रात्रभर हसण्या-खिदळण्यात आतली खोली जागी राहात होती. उठून एकेकाच्या नरडीचा घोट घ्यावा, असे त्याला वाटायचें. परंतु पांच-सहा पावलं धड टाकण्याचीहि त्याच्या पावलांत शक्ति राहिली नव्हती.

आणि एकदा त्यानें तसा प्रयत्न केला. डोक्यातल्या उवा चाळवीत एकदा त्यानें तिला चार शब्द सागण्याची कोशीस केली.

"अगं ऐक माजं. तूं जें सध्यां चालविलं आहेस तें लै वगाळ हाय. शोभत न्हाई तुला ह्यें."

शातपणानं तिनं तें ऐकून घेतलं आणि त्याच्यासमोर कमरेवर हात ठेवून तिनें त्याच्या डोळ्यांकडे नजर देऊन विचारलें,

"कां र बाबा ! मला शोभत नाहीं. पर तें का? कां मी कुणाच्या लग्नाची बायकु हाय, का तुज्याशीं पाट लावलाय, कां कुणाची भन हाय, कां कुणाची आई हाय?"

त्याला कांहीच बोलणें सुचेना. शब्द उरांतच कडमडले. आता बोलण्यात कांही अर्थ नाही हें समजत असूनहि तो लघळपणें म्हणाला,

"मी हाय की?"

"भाडया बोलायला तरी काई लाज? जल्मल्यापासनं तुज्या बान तुला कंदी चार पैसं मिळवायला शिकविलं हुत कां? स्वतःची चड्डी सावरायची ताकद हाय का? म्हनं मी हायऽ नव्ह काऽऽ" शेवटी तिनें त्याला वेडावून दाखविलें आणि अर्वाच्च शब्दात लाह्या फुटाव्या त्याप्रमाणे त्याच्यावर मनसोक्त तोडसुख घेतलें. इतकच करून ती थांबली नाहीं. अचानक ती दोन पावलं पुढें आली आणि दोन्ही हात देऊन तिनें त्याला एखाद्यान नाक दाबून घाणीचा डबा उचलावा त्याप्रमाणे उचललें आणि सरळ कडाडली,

"चल बाहीर हो. कुटल्या तरी धर्मशाळत न्हायतर देवळांत जाऊन पड. पुन्ना तोंड दाकविशील तर डोक्यात मोट्टा धोंडा घालीन बघ!"

या अचानक हल्ल्यानं तो बावरला. असाहाय्यतेचें त्यानें एकदां तिच्याकडे पाहिलें आणि पुन्हा खाटल्यावर बसण्याची खटपट केली. परतु तिने त्याला बसू दिलें नाहीं.

"आतां मुकाट ज्यातुस का..."

"तुझ्या पाया पडतु ग. मला सोडूं नगंस... त्यानें डोळ्यांतून अश्रु आणून तिची केविलवाणी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु ती बनली नाही. उलट पुन्हा तोंड उघडून बोलण्याचा प्रयत्न केल्यावर तिरस्काराने ती पुढें झाली आणि दोन्ही हात धरून तिनें त्याला दरवाज्यापर्यंत फरफटत नेले आणि जोरानें दरवाजाच्या पायरीवरून त्याला खालीं लोटून दिलें.

'धप्प' असा एकच आवाज झाला आणि तो सारं बळ एकवटून उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला. मोठ्या कष्टानं तो उठून बसला आणि जमिनीवरून हाताच्या साहाय्याने फरफटत तो पुढेपुढें सरपटू लागला.

दहा-बारा पावलं टाकल्यानंतर त्यानं एकदा मागें वळून पाहिलें.

'थूड' ती पचकन् थुकली आणि तिनें धाडकन् दरवाजा बंद करून घेतला.

"मुरदाडा. अटलास कीं नाहीं?" तिनें शिदीच्या फराटयानं जोरान डिवचून त्याला एक शिवी हाडसली

अगावर वारंवार रुतणाऱ्या शिंदीच्या काट्यानीं तो हैराण झाला होता. त्यानं आपले वेटोळें सोडविलें आणि नाईलाजास्तव तो हळूंहळू सरफटत चालूं लागला.

गारोड्याच्या पुंगीप्रमाणं त्याचें मघलें पोट रात्री मिळलेल्या वेडकामुळं फुगलें होतें. पुढें सरपटताना त्याला अतिशय कष्ट होत होते. मध्येंच वळून त्यानें एकदा मागें पाहिलें आणि पुन्हां एकदा तिचें अंगप्रत्यंग बर्फाच्या पाण्यांत कोंसळल्याप्रमाणें शहारले,

●●●




**समाज प्रबोधन संस्था**

१२४२, सदाशिव पेठ, पुणे २.


| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २.६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : ( सं. निबंध ) | २·०० |
| अंतरीक्ष प्रवास . ना. वा. कोगेकर | २·०० |

**पांढरे डाग**

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

नकली वर्यापासून सावध राहावें.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन ( माणू. )
मु. पो. मगरूळपीर. जि. अकोला ( महाराष्ट्र. )




लेखक : किशोर गोमकाळे

शेवटीं चिमी पैसा मागतेच. एरवीं तिच्या ह्या संवयीवर रागवणारा मी या वेळीं न रागवता नाइलाजानं खिसे चांचपतों. चिमी खुलते. तिची इच्छा पूर्ण केल्यावर माझ्या चपला मी शोधतो. आजोबांच्या नेहमींच पडलेल्या खाटेखालीं एक चप्पल सांपडते. ती नीट बाहेर ओढून मी दुसरी चप्पल शोधतों. तीन-चार मिनिटांच्या श्रमाचा मोबदला मिळतो. मागल्या अंगणांत कोपऱ्यांत मूग गिळून गुपचूप पडलेली खप्पड चप्पल मी घरांत आणतों. चपला पायांत सरकवीतच दोन्हीं हातांत सामान घेतों. आई दारांत उभीच असते. जातांना वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करावा हें मला माहीत असतं. कुणी आपल्याकडे विशिष्ट नजरेनं पाहात नाहीं हें लक्षांत येतांच हातचं सामान ठेवून शक्य तितक्या लवकर हा नमस्कारचा विधि मी आटोपतों. तितक्यांत आईला कसलीतरी आठवण येते. तशी मला ती थांबायला सांगून घरांत जाते. येवढयांत छोटा प्रकाश "दादा ! मोटार आली ! मोटार आली !!" असं तालबध्द सुरांत म्हणत येतो. मला घाई असते. नारायणाला मी जागा राखण्याकरितां समोर पाठवितों. आई हातांत एक गच्च भरलेली पिशवी अन् पितळेचा छोटा डबा घेऊन येते. पिशवींत काय आहे हें तिला तरी माहीत आहे कीं नाहीं अशी शंका मला येते, पण ती मी व्यक्त करीत नाहीं डबा कुठं ठेवावा याचा विचार मी करीत असतो. तशी आई म्हणते, "हें बघ रमेश. त्या डब्यांत किती परवा केलेले लाडू आहेत—रव्याचे, तो डबा मीराकडे ठेवून दे जाता जाता. रस्त्यानंच लागतं तिचं घर. अन ही पिशवी आहे नं—ह्यांत घरची पपई, आंबे वगैरे आहेत. ही पिशवी आत्याकडे ठेवून दे—जाता जाता." तेवढयांत मोटारचा पोंगा वाजतो. तीन पिशव्या अन् डबा कसं-बसा आवरत मी मोटारीजवळ जातों.

नारायण सामान कुठंतरी ठेवतो.

"या-या इकडे. बगीचा रिकामाच आहे." ...मागनं कुणीतरी सुचवितं. त्याचा अर्थ मला कळत नाहीं, पण त्या व्यक्तीच्या मागें मागें जातों. एवढयांत कंडक्टर येतो अन् त्या व्यक्तीला हळच कांहींतरी सांगतो.

"या साहेब ! फ्रंट रिकामाच आहे. मार बे—हॅंडल मार."

यांतला कोणता भाग आपल्याला उद्देशून आहे हें मी तर्कानंच जाणतों. अन् फ्रंटमध्यें जाऊन बसतों. मोकळी जागा मिळाल्यानं मी सुखावतो.

"घऽर्रर्रऽर्र" मोटारच्या इंजिनचा आवाज येतो. नारायण मला हातवारे करून कांहींतरी सांगतो. त्यांतलं मला...' ठेवलं आहे." एवढंच ऐकायला येतं. मी ओळखतों. सामान ठेवलं आहे असं त्यानं सांगितलं असतं. चिमी, प्रकाश सर्व माझ्याकडे कुतुहलानं पाहात असतात. चिमीला एक पैसा द्यावा असं मला उगाच वाटतं. प्रकाशवर होणारा अन्याय जाणवून त्याच्याहि हातावर कांहींतरी मी ठेवतों. तो उडी मारतो. "गेल्याबरोबर पत्र लिहि. कसलीच हयगय करूं नको. दगदग होऊं देऊं नको." या रुळलेल्या सूचना वडील मला वारंवार देत असतात. त्या बरेचदां ऐकल्यानं माझा जीव कासावीस होतो. आपण उगाचच गांवीं जात आहों असं वाटतं.

एवढयांत कुणीतरी पाढे म्हणत असल्याचा भास मला होतो. कंडक्टर उतारूंची संख्या मोजत असतांना मला आढळतो. सुतळीला बांधलेला विटकरीचा तुकडा लाल निळया रंगानं रंगविलेल्या वाटीवर दोनदां आपटतो. "ठक ठक" असा आवाज येतो. आप-आपल्या नातेवाईकांना पोंचविण्यासाठीं आलेल्या साऱ्यांचे हात वर जातात. "पत्र लिहि." असं वडील पुन्हा एकदा सांगत असल्याचा भास मला होतो. अन् लगेच मोठा आवाज करीत हनीफ अँड कंपनीची तुटकी मोटार सुरूं होतो. मला जरा सुटल्यासारखं वाटतं.

गचके घेत घेत आमची मोटार चालली होती. अंतरा अंतरावर तिचा कान फोडून टाकणारा आवाज बदलत होता. फर्लांग-फर्लां-गावर, चढ-उतारावर म्हातारा ड्रायव्हर दांत-ओठ खाऊन कुणालातरी शिव्या हाडसत गीअर बदलत होता. आतां सरळ रस्ता लागला. आजूबाजूचीं झाडं मघापेक्षां भराभर

मार्गें जाऊं लागली. न राहवून मी म्हाताऱ्याशी बोललोंच. मघां तो मोटारवर चिडला होता हें माझ्या लक्षांत होतंच मीं मुद्दाम तोच विषय काढला. ह्यावर त्यानं " अजी ! क्या बोल रहे हो, ऐसी गाडी तो ये इलाखेमें नही मिलेगी. क्या चलती है साली ! ! " असं म्हटलं. मी चकित झालो. माणसाचा कान फुटूहि शकतो हें माहीत नसणारा आवाज क्षणाक्षणानं वाढवीत जाणारी अन् मग " फुस्स्स् " दम सोडून पुन्हा आवाज चढविणारी मोटार गाडी, एक गव्हाचं पोतं जास्तीचं ठेवलं तर खालीं बसणाऱ्याच्या डोक्याचा समाचार घेण्यास समर्थ असलेलं छप्पर असलेली गाडी, अर्धा अधिक भाग लाजलज्जा सोडून एवढ्या मोठ्या जनसमुदाया समोरहि उघडा ठेवण्याइतकं निर्लज्ज मशिन असलेली गाडी, खिळे ठोकून ठोकून आतले बेंच लाकडाचे की खिळ्याचे असा प्रश्न प्रेक्षकांसमोर उभा करणारे बेंच असलेली गाडी येवढ्या इलाख्यात नसावी हें खरोखरच आश्चर्य होते. तरी मीं आढेवेढे न घेता मान्य केलें. कारण तो इलाखा मीं पाहिलाच नव्हता. " या इलाख्याची खूप भरमसाट प्रगति झाली आहे " असं परवां शहरांतल्या भाषणांत मिनिस्टरनं सांगितल्याचं मला आठवलं. मला नवा धडा मिळाला. मिनिस्टरहि खर (!) बोलू शकतो तर परवाच्या " जयभूमि " वर्तमान पत्रांत हा इलाखा दुष्काळी म्हणून जाहीर करा अशी लोकांची मागणी असल्याचें मीं वाचले होतें. मी मंत्री असतो तर मागणी व्हायच्या आतच येत्या पन्नास वर्षांकरितां हा इलाखा " अत्यंत दुष्काळी " म्हणून जाहीर केला असता.

लवकरच एक शहर आलं. आमची मोटार स्टॅंडवर गेली. पुढें मग मार्गे. पुन्हा पुढें. " आने दो ! आने दो ! ! काटके लो ! और काटो ! सिधी करो ! ! बस्स ! बस्स ! बस्स ! ! ! " असल्या प्रकारचे अनेक आवाज एकदम येऊ लागले. मोटार थांबली अन भराभरा रिकामी झाली. मी मार्गे वळून पाहिलं तीन-चार बाया अन् एक दोन पोरं या शिवाय मोटारीत कोणीच नव्हतं. इतक्या लवकर हे सर्व उतरतील असं वाटलं नव्हतं. पण मग मला कुणीतरी सांगितलं की, लोक पाय मोकळे करायला, चहा प्यायला उतरले आहेत मी ताडलं मोटार आतां बराच वेळ इथ थांबणार.

मीहि माझं चहापाणी आटोपलं अन् पुन्हा जागेवर येऊन बसलों. अर्धा तास झाला तरी पुढल्या प्रवासाची चिन्ह दिसत नव्हतीं. मोटारीच्या एजटनं हिशेब करणं सुरु केलं नव्हत. ड्रायव्हरन मोटारच्या इंजिनात पाणी टाकलं नव्हत कंडक्टर तिकीटें फाडायच्या घाईत नव्हता. एवढं कशाला–काही प्रवासीहि अजून आपल्या जागेवर बसायचे होते. नाहीं–म्हणायला एक म्हातारा अन् पाच-सहा सिंधी मोटारीत बसून त्यांच्या भाषेत काहींतरी बडबडत होते. असमक्याचे भाव वाढले. तमका माल लोक घेत नाहींत असल्याच त्या गप्पा असाव्यात असा विचार करून मीहि त्याच्याकडे लक्ष देणं सोडलं अन् उगाच कुठंतरी पाहू लागलो.

होता होता बराच वेळ झाला. मी कसलातरी विचार करीत होतों, तेवढ्यात एजट पोंग्याजवळ आला अन् त्यानं जोराजोरानं तो वाजवायला सुरुवात केली. त्या पोंग्याच्या आवाजान माझी तद्री खटकली. मी एकदम दचकलो. फटमध्यें होतों ना—

" गाडी मेंके बैठो हो ! " असे अनेकदा पोंग्याच्या आवाजाला साथ देत एजंट ओरडला. लगेच भराभरा लोक आले. गाडींत चढू लागले. एकच गर्दी झाली. एकमेकाना समजावणी झाली. कंडक्टरचा धाक दाखवणं झालं. मोटार लोकानी भरून गेली. अजून पाच पंचवीस लोक बसायचे होते. ' एवढे सर्व लोक बसले तर ही मोटार सुरूं होइल का ? अन् झालीच तर ती चालू शकेल का? अशी शंका मला आली. पण मीच मग माझ्या मनाला समजावूं लागलों. एवढ्यांत एक शेटजी कंडक्टर अन् एजट सोबत पान चघळत चघळत, फटकडे पाहात पाहात येतांना मला दिसले. माझ्या जागेची सुरक्षितता धोक्यांत तर नाही ना– असा संशय मला आला अन् तो खराहि ठरला. कंडक्टर व एजट दोघेहि मला फटमधून उतरण्यास सांगू लागले. तिथ शेटजी बसणार होते. शेटजीच्या गळ्यातला सोन्याचा गोफ माझ्याकडे तुच्छतेने पाहून हसत आहे असं मला वाटलं कावऱ्याबावऱ्या नजरेन मीं मोटार–भर पाहिलं. बसायला कुठंच जागा नव्हती. जागा करून देण्याच दोघानीहि मला आश्वासन दिलं. मीहि नाइलाजानं उतरलों. माझ्या जागेवर शेटजी कसेबसे अडचणींत बसल्यागत, त्रासिक चेहऱ्यान बसले. मला त्याचा हेवा वाटला.

अजून आठ-दहा माणसाना एकमेकांच्या उरावर बसविल्यानतर कंडक्टरच लक्ष माझ्याकडे गेलं. त्यान बगीचाकडे डोकावून पाहिलं. बगीचा गच्च भरलेला होता—बायानी. तिथ मी बसणं शक्यच नव्हतं. शेवटी ' जरा खसको ' असं वारवार म्हणत त्यान थोडी जागा करून दिली. तेवढ्याशा जागेकडे पाहात त्यान मला तिथ बसायला सुचविलं. अर्धा बाजूच्या माणसाच्या मांडीवर तर अर्धा बाकावर मी बसलों. बाकाचा वर आलेला खिळा मला बोचत होता. पण त्याला इलाज नव्हता. सर्व बसल्यावर मोटारची दारं फटाफट आपटून बद करण्यात आली. कबुतरांच्या खुराड्याची करतात तश्शी. आत अगदी असह्य गर्मी होऊं लागली माझा जीव कासावीस होऊं लागला कुणीतरी विनोद केला. ड्रायव्हर कंडक्टरनं त्यावर दुमजली हास्य केलं. त्याच्या या अवताराकडे पाहून पडू नये ती शिवी माझ्या तोंडातून बाहेर पडली.

एजटानं हिशेब करून कमिशन खिशात टाकलं कंडक्टरनं साऱ्या उतारूंची तिकीटं कुणाजवळ तरी दिली असल्याची बतावणी केली. तेवढ्यांत ड्रायव्हरनं ठेल्यावरचं पान आणलं. दोघानीहि पान. तबाखू खाऊन निश्चयच ठरविलं. विटकरीच्या तुकड्यानं आपलं काम बजावलं. घूऽघूऽऽ असा जोराचा आवाज करून आमची मोटार निघाली.

मोटार सुरू झाल्यावर जरा बरं वाटलं हवा खेळायला लागली. लोकाना वाचा फुटली. सर्व लोक एकाच विषयावर बोलू लागले.

" तो वो क्या कम है क्या ? कॉंग्रेस है तो क्या हुवा ऐसी गिरती है इस बखत कॉंग्रेस का तुम देखतेहो रहोगे "...मार्गे कुणीतरी आपल्या शेजाऱ्याला समजावत होत. पण शेजाऱ्याच्या डोक्यावरली पांढरी टोपी चूप राहली नाहीच.

" ऐसी कैसी गिरेगी हो ! तू काय गैन्या समजलास काय आमच्या भय्यासाहेबास. मागल्या वक्ती मायाराईन धोका देल्ता मनून नायी त काय आल्याबिगर रायत होते ? "...तो उत्तरला अन् या माणसाला पुष्कळांनी साथ दिली. गप्पा रंगल्या. मी जर का त्या इलाख्याचा असतो तर त्याच्याशीं गप्पा मारायचा मोह मला आवरता आला नसता.

पुढं गप्पांची दिशा बदलली. यंदा मृगाचा पाऊस केव्हां येणार. गेल्या वर्षी तो केव्हां आला होता. हें एकमेकांना सांगणं सुरू झालं. पुढल्या वर्षीतर पाऊसच पडणार नाहीं असं आपण वाचल्याचं कुणीतरी सांगितलं. सर्व हळहळले.

लहान-मोठीं गांवं येत होती. आमची मोटार थांबत थांबत पुढें जात होती. एक उतरे तर चार चढत. वेळ जात होता. मोटार धांवत होती. मी इकडे तिकडे पाहात होतों. मला दोन माणसांच्या फटींतून मैलाचा दगड दिसला. शहर आता पांच-सात मैलच होतं. मी सुखावलों. सहज म्हणून इकडे तिकडे पाहूं लागलों. अन्-अन् मला एकदम हादरा बसला. मी एकाएकीं चमकलों. आजूबाजूचे लोक माझ्याकडे विचित्र नजरेनं पाहूं लागले. माझ्या कपाळावर आंठ्यांचं जाळ उभं राहिलं. माझ्या हृदयाचे ठोके मला अगदीं स्पष्ट ऐकूं येऊं लागले. कोपऱ्यांतल्या माणसानं त्याच्या सामानाची पिशवी मांडी-वर ठेवलेली मला दिसली. लगेच मला माझ्या सामानाची आठवण झाली. आतांपर्यंत ती कां आली नाहीं म्हणून स्वतःला दोष देऊं लागलों. माझं सामान कुणीं चुकून (!) नेलं तर नसेल ना–अशी भीति मला वाटली. हातपाय हालवून सामानाचा वेध घेणं शक्यच नव्हतं. मी नजरेनंच तें शोधूं लागलों. माण-सांच्या पायांच्या फटींतून, पायाखालून साऱ्या कडून माझी नजर फेरफटका मारून आली. पण-पण अंधाराशिवाय तिथं मला कांहींच दिसलं नाहीं. मी शहारलों. पण लगेच मीं स्वतःला सावरलें. सर्व उतरल्यावर माझं सामान मी स्वस्थपणें मोकळ्या जागेंत स्वैर हिंडून शोधूं शकेन हें मला उमगलं.


हळूहळूं शहराबाहेरचा नाका आला. नाक्यावरला माणूस सामोरा आला. कंडक्ट-रनं खिडकी बाहेर हात काढून "कुच नयी ! कुच नयी !!" असं दोन-तीनदा सांगितलं. माणूस परतला. पुन्हा मोटार चालू झाली. मला आश्चर्यच वाटलं. खालीं उभं राहून-सुद्धां छपरावर असलेल्या कुणाच्या तरी सायकलचं बाहेर डोकावणारं हॅंडल स्पष्ट दिसत असतांना, पोती दिसत असतांना, त्या माणसानं कंडक्टरच्या "कुच नयी" वर भरंवसा कसा ठेवला. पण लगेच मीं तो विचार सोडून दिला. असल्या गोष्टींवर विचार करणारा पागल होईलच अशी एव्हांना माझी खात्री झाली होती.

हळूहळूं शहराचा स्टॅंड आला. "पटेल रिक्षा" "साहेब रिक्षा" "बाई, कोठं जायचं !" असे रिक्षावाल्याचे नाना स्वर उतारूंभोंवतीं घिरट्या घालूं लागले. "हमाल, "किसीका सामान उतारना है क्या" अशा प्रश्नार्थक आरोळ्या मारीत मोटारभोंवती प्रदक्षिणा घालूं लागला. बाजूच्या हॉटेलमधल्या रेडिओंतून कुणीतरी ॲस्प्रोच घेण्याविषयीं जोरजोरानं सुचवीत होतं. सारीकडे गर्दीच गर्दी होती. मोटारींचे पोंग एकामागें एक वाजत होते. जाणाऱ्या–येणाऱ्यांच्या साय-कली खणखण घंट्या वाजवीत होत्या. प्रत्ये-काचे दोन्ही कान नानाविध आवाजांनीं गच्च भरून गेले होते. सर्व उतारू एकदम उतर-ण्याची धडपड करीत होते. मी मात्र दोन्ही पाय सीटवर ओढून मोकळ्यांत स्वस्थ बसलों होतों.

इतक्यांत माझ्या समोरचा माणूस उठला. याचं टाळकं बसल्याबसल्याच छपराला कां लागत होतं हें मला पटकन उमगलं. माझ्या तीन पिशव्यांपैकी एकीवर तो आतांपर्यंत अगदीं स्वस्थ विसांवला होता तर...मीं पटकन पिशवीवर झेंप घेतली. आंत रुत-लेल्या खिळ्यांच्या तावडींतून तिला सोड-विली. माझ्या इस्त्रीच्या पॅंटस् चुरगळा झाल्या होत्या. पिशवी ओलीचिंब लागत होती, –बहुधा लोकांच्या घामानं–मला किळस वाटली. एव्हांना सारी मोटार रिकामी झाली होती. मीं बांकाखालीं हात फिरविला. कांहींतरी हाताला लागलं. मीं तें बाहेर काढलं. माझ्या आईनं मिराकडे द्यायला दिलेला लाडूचा डबा पार चपकून गेला होता. दुसऱ्या एका पिशवीवर मोटारच्या इंजिनाला द्यायच्या तेलाचा डबा पालथा झाला होता. पिशवींतलं सामान सर्व तेलकट झालं होतं. मला शिसारी आली. माझा जीव मोकळ्यांतहि गुदमरूं लागला. इतक्यांत माझं लक्ष दुसऱ्या कोपऱ्यांत गेलं. तिथं माझी तिसरी पिशवी हळूच कलंडून विसावीत होती. पिकल्या पपईचा चुरा-चुरा झाला होता. कैऱ्यांच्या फोडी फोडी होऊन त्या इकडे तिकडे पसरल्या होत्या. एक-दोन कैऱ्या खाण्यासहि लोकांनीं कमी केलें नाहीं हें मीं ताडलं. कारण कैऱ्यांच्या साली दातांच्या ओरखड्यासह माझ्याकडे पाहून खिदळत होत्या. मी रडकुंडीस आलों. यापुढं सामान विरहित पायीं प्रवास करायचं मीं नकळत ठरविलं. आणि तीन भिजलेल्या पिशव्या अन् एक चपकलेला डबा घेऊन स्वारी दाराकडे वळली न वळली तोंच–तोंच पंचवीस–तीस रिक्षेवाल्यांचा घोळका माझ्यावर हल्ला केल्यागत दांत विचकत माझ्याभोंवतीं जमला. जो-तो मला कुठं जायच याची चव-कशी न करतांहि आपआपल्यांत रिक्षांतून-चला असा आग्रह करूं लागला. शेवटीं झोंबा-झोंबी सुरू झाली. तीन रिक्षेवाल्यांनीं तर माझी एक एक पिशवी आपआपल्या रिक्षांत नेऊनहि ठेवली. चवथा रिक्षेवाला डब्याला हात लावीत असतांनाच माझा पारा पूर्ण चढला. मी गरम झालों. अन् शक्य तितक्या जोरांत मला रिक्षांतून जायचं नसल्याचं स्पष्टीकरण केलं. एव्हांना पिशव्या नेलेल्या रिक्षेवाल्यांनीं तीन रिक्षे माझ्यासमोर उभे केलेच होते. त्या तिन्हींतून पिशव्या काढून घेत त्यांच्यावर ओरडलों, चिडलों, जळ-फळलो. आणि सर्व सामान कसंबसं आवरत पुन्हा एकदां त्या सर्वांना शिव्या देत चालूं लागलो. सर्वचे सर्व रिक्षेवाले माझ्या आवा-जाची नक्कल करून मला हिणवूं लागले. अन् नक्कल केल्यावर सर्व एकसाथ दांत विचकत, जोरानं हंसले. मी जरी चाललों होतों तरी माझ्या हेरण्यांतून हें सुटलं नव्हतं, तसा मी आणखी चिडलों. रिक्षा न करतांच पायीं जायचं मीं ठरविलं. माझ्या वारंवार खालीं घसरणाऱ्या पॅंटला आवरणंहि माझ्या जिवावर येऊं लागलं होतं. मी घामानं डबडबून गेलों होतों. तरी पण जणू कांहीं घडलंच नाहीं असा अविर्भाव करून मी रस्त्यावर दुतर्फी उभ्या असलेल्या उंच बिल्डिंगकडे पाहात जात होतों. हळूच मीं पिशवीकडे पाहिलं. पपईची एक मोठी फोडहि पिशवीबाहेर डोकावून रिक्षेवाल्यांसारखी मला हिणवून हंसत असतांना दिसली.

• • •





## स्पंद : दुसरा

कुंडली मांडून माझी
काळ काढी ठोकताळा—
" सोसतांनाहि कसा हा
भासतो नामानिराळा ! " १

संपलों आहे तरीही
संपणें माझें सरेना !
मी मुका झालों तरीही
सूर दुःखाचा विरेना ! २

आर्द्र माझ्या मृत्तिकेनें
कोणता आकार घ्यावा ?
...हिंडणारा भास माझा
कोणत्या दारांत न्यावा ? ३

हीं अशीं बंदिस्त स्वप्नें !
या अशा लाचार आशा !
ही अशी गर्दी बघ्यांची...
हा असा माझा तमाशा ! ४

आत माझ्या आसवांची
आंच कोणाला न लागे !
( –हात देणाराच जेथें
दान घेणारास मागें ! ) ५

दुःख माझें पारखाया
आंधळ्यांची माळ येते...
भंगलेल्या दर्पणांची
मानभावी ' साक्ष ' घेते ! ६

मांडण्या लिलांव माझा
लोटला ' बाजार ' सारा !
इष्ट मित्रांनींच केला
हाय, बोलीचा पुकारा ! ७

कां कुणी येऊन माझें
एकदा अश्रू पुसावे
का कुणी अश्रूंत माझ्या
माझियासंगें भिजावें ? ८

कां गडे, हें विश्व माझ्या
वेदनेमाजीं बुडावें ?
...एकट्याचें दुःख माझें
दुःख सार्‍यांचें बनावें ९

कां तुझा हें ऐकतांना
चेहरा आरक्त झाला ?
...कां तुलाही आज माझ्या
वेदनेचा रंग आला ? १०

# आ का श गं गा

: सुरेश भट :

कालच्या कांहीं क्षणांनीं
कूसहि कां पालटावी ?
भूतकालांतून माझ्या
कां 'उद्यां'ची हांक यावी ? ११

बोललों होतों कधीं मी
ऐक ही माझी कहाणी ?
कां तुझ्या डोळ्यांत आलें
कारणावांचून पाणी ? १२

कां महाद्वारीं मनाच्या
तिष्ठते आहेस तूं ही ?
मी पुढें येतोंच आहे...
मी पुढें आलोंच नाहीं ! १३

आण तूं माझ्या गळ्याची
वाहशी आतां कशाला ?
लाभला आहे 'दिलासा'
आंसवाचा आंसवाला ! १४

तोतया श्वासांवरी या
मी कसें आयुष्य तोलूं ?
शब्दही माझे न माझे
मी तुझ्याशी काय बोलूं ? १५

( हेलकावे आशयांनीं
मौन–सिंधूचा किनारा
आणि वाळूच्या घरांचा
हा तुझामाझा पसारा ! ) १६

बंद डोळ्यांआड माझ्या
सुप्त झाल्या चांदराती !
अन् तरी डोळे तुझे कां
पूर्णिमेचें गीत गाती ? १७

आज कां डोकावशी या
वंचनांच्या अंधःकारीं ?
भेट भूपाळी परी तूं
वेदनेच्या रामप्रहरीं ! १८

सारखा निःशब्द माझा
आंधळा आक्रोश चाले !
—गोठलेला जन्म माझा
जागच्या जागीं न हाले ! १९

कोरडे घेऊन डोळे
सांत्वना सारेच आले...
'लक्तरें' मोजून माझीं
आपुल्या गांवीं निघाले ! २०

जीवनाची प्रेतयात्रा
थांबली माझ्या स्मशानीं !
( घेतला काढून खांदा
ओळखीच्या माणसांनीं ! ) २१

पेटल्या माझ्या चितेचा
धूर अज्ञातांत जाई...
प्राक्तनाच्या लेखणीची
संपली केव्हांच शाई ! २२

दूर नक्षत्रांत माझ्या
चंदनाचा गंध गेला...
पूस एकांतांत सारीं
कारणें चंद्रप्रभेला ! २३

माझियामागें गडे, तूं
चौकशी माझी करावी !
...अन् तुझ्या हातांत माझी
राख थोडीशी उरावी ! २४

* *

मी न ही सोडीन माझ्या
वेदनेची मद्यशाला !
मी न हा टाकीन खालीं
जीवनाचा रिक्त प्याला ! २५

ग्रंथसमीक्षण

# ‘ रथचक्र ’ च्या निमित्तानें

अशोक पुरुषोत्तम शहाणे

‘ रथचक्र ’ ही अलिकडे खूप गाजावाजा झालेली अशी कादबरी. कादबरी प्रकाशित झाली आणि रस्त्यात भेटणारा जो-तो विचारू लागला की, ‘ कां हो, ‘ रथचक्र ’ वाचलीत का ? ’ अशी गोष्ट मराठी पुस्तकाच्या बाबतीत-आणि एकदर पुस्तकाच्या बाबतीतच—फार विरळा घडून येते. ‘ रथचक्र ’ च्या बाबतीत मात्र असें घडलें. कादंबरी बाहेर पडण्यापूर्वीपासूनच एक कुतूहल, त्याचबरोबर एक-प्रकारचा दरारा वगैरे गोष्टी या पुस्तकाभोवती जमा झाल्या होत्या. कादबरी बाहेर पडल्यावर त्यातले कुतूहल गेलें, पण दरारा दुणावला याचीं कारणे काय असतील ? ताबडतोब सुचविणारी काही संभाव्य कारणें अशीं– ( १ ) या लेखकाने पूर्वीच काही उल्लेखनीय लिखाण केलें आहे, व त्यामुळें या लेखकाच्या नव्या कादबरीबद्दल वाचकांत उत्सुकता दिसून आली. या लेखकाचे आधीचें लिखाण साहित्यदृष्ट्या चागले असल्यानें वाचकात लेखकाबद्दल आदरबुद्धि आधीपासूनच होती. ( २ ) मराठीतील साहित्यक्षेत्र ( लेखक-प्रकाशक-वाचक ) अतिशय मर्यादित असल्याने आपले लिखाण कोण मातब्बर वाचणार हें लेखकाला ठाऊक असतें. व असा मातब्बर वाचकवर्ग त्याच्या बाजूचा असेल. तर त्याची आपोआप ( कळत-नकळत जाणूनबुजून-अजाणतेपणानें ) जाहिरात होते. तसें याबाबतीत झाले. ( ३ ) ठिक-ठिकाणच्या नियतकालिकांतून अभिप्राय चागलें वा कुतूहलोद्दीपक असे आले. ( ४ ) मराठींतील कादंबऱ्याची रोडकी निपज पाहता ही कादबरी म्हणजे साहित्यांत काहीतरी मोलाची भर घालणारी आहे. ( ५ ) कादबरी खरोखरच चागली आहे. आता प्रत्यक्ष कादबरीची छाननी करून वरील कारणापैकी कोणते कारण शिल्लक राहतें, तें पाहू.

### कथानक

ही कादंबरी म्हणजे एका बाईची कहाणी आहे. कहाणी सागितली आहे लेखकानेंच, पण या बाईच्या नजरेतून. बाई आहे कोंकणांतील घरदाज घराण्यातील सून. घराणें आहे मध्यमवर्गीतील, प्रतिष्ठित, अर्थिक बाजूनें पडझडीला आरभ झालेलें; घरातील दोन्ही कर्ती माणसें केव्हाच गेली आहेत. थोरला मुलगाहि गेला आहे. त्याची बायको मजुतदारपणे सबध घरावर शक्य ती हुकमत चालवते, धाकटीं दोन मुले आहेत. त्याची लग्नें झालेली आहेत, आणखी एक मुलगा आहे, त्याच्या अंगांत येतें, त्याला ससाराचा छद नाही, तो देवाच्या नादी लागला आहे. या त्याच्या आगळेपणाचे घरात कौतुक होत आले आहे, कौतुक होत असले तरी काही गोष्टी ठाकठीक व्हाव्याच लागतात म्हणून हातपाय बाधून त्याचें लग्न लावून देण्यात आले आहे, ही नवी सून म्हणजे कादबरीची नायिका, सर्वच बाजूनी चारचौघीसारखी आहे, पण नवरा मुलखावेगळा मिळालेला. बायकाकडे अगदीच लक्ष न पुरविणारा, बायकोशी सबंध ठेवणे ही या बाईच्या दृष्टीने पुरुषार्था-पैकीच बाब आहे, म्हणून ही बाई असतुष्ट असण्यापेक्षां तिला नवऱ्याचा तिरस्कारच अधिक आहे, अशांतच त्या घरच्या लोकानी बेत योजून एक दिवस नवऱ्याला व तिला एकत्र आणले आहे, काहीतरी पापकर्म उरकावें तसे नवऱ्याने आपलें नवरेपणाचें कृत्य पार पाडलें आहे, नतर चटक लागल्याप्रमाणे पण आठवड्यातून नेमानें फक्त एकच दिवस हा माणूस बायकोजवळ येत गेला आहे, त्यामुळें राहिलेल्या गर्भाविषयी व गर्भातून निपजलेल्या पोरांविषयी आईला किळस आहे पण मादीप्रमाणे निव्वळ रक्ताचे प्रेमहि आहे, व त्यातून या पोरानी जगात काही करून दाखवावें अशी जिद्द आहे. त्याकरिता वाटेल– त्या हालअपेष्टा सोसण्याची तिची तयारी आहे, तेवढ्यातच एक दिवस नवरा पळून गेला आहे, बाई अगदी एकटी पडली आहे, कुकवाचा आधार असलेला, नवराहि गेलेला. थोरल्या मुलाला शिकवून शहाणें करायचा प्रयत्न ती करते, तो असफळ झाल्यावर मग तिनें आपल्या साऱ्या शक्ती दुसऱ्या मुलावर एकवटल्या आहेत. घरच्यांच्या विरोधाला व कुचेष्टेला व मुलाच्या नाखुषीलाहि न जुमानतां ती हें करीत आहे. एवढ्यातच तिच्या नवऱ्याचा पत्ता लागतो, त्याला परत आणण्याचे मनसुबे रचले जाऊ लागतात. लखनौला राहणारा एक दीर कोंकणांत गावीं आलेला आहे, हा या सर्वात शहाणा म्हणून ओळखला जातो, तो कशातच पडण्याचे नाकारतो, तेव्हा मग भावाला परत आणण्याचा खर्च भागविण्याकरितां त्याच्या बायकोचे दागिने मोडावेत अशी शक्कल निघते, शेवटीं लखनौचा भाऊ पैसे काढून तोंडावर फेकतो व तणतणत व शिवाय डोळे पुसत परत लखनौला रवाना होतो, बाईचा मुलगा व्ह. फा. च्या परिक्षेंत पहिला येतो, त्याच्या पुढील शिक्षणाकरितां बाई तालुक्याच्या गावी जाण्याचा निर्धार करते व घरच्या माणसांच्या विरोधाला न जुमानता आपला निर्धार तडीला नेते. शेजारचे एक काका तिला तालुक्याच्या गांवापर्यंत पोंचवून येतात; आणि मग ह्या नव्या गावीं नाना हालअपेष्टांना तोंड देत कष्ट उपसीत ही बाई मुलाचे शिक्षण करीत असते, एवढ्यांत मध्यतरी एक भानगड होते व हा मुलगाच घरातून पळून जातो. दरम्यान थोरल्या मुलालाहि आपल्या पायावर उभा करण्याचा प्रयत्न ती करते, पण तें जमत नाही, एवढें होईपर्यंत तिचा नवरा परत येतो. लोक त्याच्या पायावर डोकें ठेवतात, बाई हार खाऊन गावीं परत येते, घरची मंडळी ती बाहेर राहिली या विषयी निषेध व्यक्त करीत असतात, तोंच विधवा असलेली थोरली जाऊ मरते, हिच्या थोरल्या मुलाचे लग्न होतें, आधींपासूनच हिला फिट्स येत असतात, त्यातच एक दिवस विहिरीच्या काठावर ती बसलेली असताना तिला फिट येते, आकाशाचा घूमट वगैरे तिला दिसतो—व कादबरी सपते !

हें कादंबरीचें सर्वसामान्य कथानक. यांत लेखकानें या घरांतील कोणाचेंच नांव दिलेलें नाहीं, विशेषणेंच नांवासारखीं वापरून काम उरकलें आहे, नायिकेला फक्त ' ती ' म्हटलें आहे, बाकी माणसें मग तिच्याशीं लागणाऱ्या नात्यांप्रमाणें उभीं केलीं आहेत. शिवाय, बाई घर सोडून तालुक्याच्या गांवीं जाईपर्यंतचें कथानक आडनिडचा रीतीनें सांगितलें आहे. म्हणजे असें–आतां घडणारी घटना ही एक तीवरून नायिकेला आठवणारी गतकाळाची घटना ही एक–अशा घटना एकाआड एक मांडून लेखक घर सोडण्याच्या घटनेपर्यंत पोहोंचला आहे. मग मात्र कथानक रूळावरून जाणाऱ्या आगगाडीप्रमाणें नीट जातें. आधींचा भाग ' टेक्निक 'चा आहे असा कांहींचा अभिप्राय आहे तो योग्यच आहे. आधींचा भाग ' टेक्निक 'चाच आहे, वाचणारा त्यांत जितका गुंतून पडेल, तितकी कादंबरी महान वगैरे होते. 'टेक्निक'मुळें न चकणारा वाचक दुर्दैवी ! तो कादंबरीची थोरवी कळण्यापासून आपोआपच वंचित होतो. परंतु याहि वाचकांजवळ एक मुद्दा आहे. तो असा, कीं, कादंबरींतील हा सर्व आठवणीवजा भाग उपोद्घात म्हणून सलग प्रथमच दिला असता, तर काय मोठेंसें बिघडलें असतें ? परंतु म्हणजे यांतून 'टेक्निक'चा मुद्दा वगळला गेला. 'टेक्निक' गेल्यावर कादंबरींत आजचें म्हणून काय राहिलें ? मग ही कादंबरी हरि नारायण आपटयांच्या एखाद्या कादंबरीसारखीच झाली–म्हणजे 'सरळ' झाली. ती आज कां लिहिली जावी, याला सबळ कारण राहिलें नाहीं. हें कथानक सरळपणें जुन्या चाकोरींतून जाऊं शकलें असतें. बरें, टेक्निकचा मुद्दा सोडला तरी बाकीचें कथानक कादंबरी म्हणून कसें काय उतरतें ? याकरितां कादंबरी कशी काय असावी, याचें थोडक्यांत विवेचन केलें पाहिजे.

## कादंबरीचा मानदंड

अलीकडे महाकाव्यें लिहिलीं जात नाहींत. कां ? अलीकडे कादंबऱ्या लिहिल्या जातात म्हणून. हा युक्तिवाद मान्य केला, तर कादंबरीच्या स्वरूपाची कांहींशी कल्पना येईल. शिवाय सुदैवानें आपल्याकडे (म्हणजे संस्कृतांत) अस्सल महाकाव्यें आहेत, त्यामुळें कादंबरीच्या स्वरूपाची कल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. रामायण, महाभारत हीं महाकाव्यें कशीं आहेत ? रामायण म्हणजे राम नांवाच्या एका माणसाची–कथा. व महाभारत म्हणजे पांच पांडवांची व शंभर कौरवांची कथा– असें म्हणता येईल काय ? किंवा एवढें म्हटलें कीं हात झटकता येतील काय ? तर तसें करतां येत नाहीं. रामायण महाभारतांत त्या–त्या पात्रांच्या करवीं विश्वांतील अफाट व अगणित शक्ती कार्य करून जातात. मग पात्रें निव्वळ पात्रें न उरतां तीं भलतीच मोठीं होतात, सबंध विश्व व्यापून टाकतात. वाचणाऱ्यांच्या नजरेच्या आवाक्यांत व बुद्धीच्या आवाक्यांत तीं मावत नाहींत, व सगळ्या पात्रांच्या वेगवेगळ्या कार्यकारी हालचालींतून सर्व मिळून अशी कांहीं विचित्र आकृति तयार होते, जी सबंध पाहण्याकरितां तेवढीच मोठी नजर हवी. म्हणजे किती मोठी ? मूळ महाकाव्य रचणाऱ्या महाकवीएवढी. म्हणजे बाकी सर्व सोडून दिलें तरी ह्या अफाटपणांत महाकाव्याचा महाकाव्यगुण सामावला आहे. असें म्हणतां येईल. आणि हा गुण कादंबरींत असला, कीं ती खरीखुरी कादंबरी झाली. एरवी नाहीं. आतां हा गुण असणाऱ्या कादंबऱ्या बोटांवर मोजण्याइतक्याच असतील, मराठींत कदाचित एकहि नसेल–पण त्याला इलाज नाहीं. तेवढ्याकरितां म्हणून कादंबरीचा मूळ मानदंड खालीं आणणें कसें शक्य आहे ? त्यापेक्षां आपली मनमोकळी कबूली देऊन मोकळें व्हावें, कीं मराठींत अशी कादंबरी नाहीं,

## ढळढळीत अपयश !

आतां ही भूमिका लक्षांत घेऊन ' रथचक्र 'चा विचार केला, तर काय आढळतें ? विचार करण्याची जरूर नाहीं असें आढळतें. ' रथचक्र ' ही कादंबरी वाचून अक्षरशः हातावेगळी करावी व तोंड उघडूं नये, अशी परिस्थिति आहे. कादंबरींत कांहीं दोष आहेत काय, याची चिकित्सा ज्यानें–त्यानें स्वतःशींच करावी व तेवढ्याकरितां म्हणून कादंबरी वाचावी––कारण अशा कां होईना कादंबऱ्या वाचत राहिल्यानें पुढें कधीं काळीं मराठींत निर्माण होणाऱ्या अस्सल कादंबरीला वाचक मिळतील, कादंबऱ्या वाचण्याचा प्रघात चालूं राहील. एवढेंच या कादंबरीचें कार्य. हें कार्य दुसऱ्या कोणीं न सांगतांहि तिच्याकडून पार पाडलें जाईलच. येथें फक्त एका ढळढळीत अपयशाचा उल्लेख करूं म्हणजे झालें. ( एवढ्याकरितां म्हणून हा लेख वाचणाऱ्यांनीं कादंबरी वाचली आहे असें गृहीत धरलें आहे. ) अंगांत येणाऱ्या, देवाच्या नादीं लागलेल्या, लग्न झाल्यावर कांहीं दिवसपर्यंत आठवड्यांतून नेमानें एक दिवस चटक लागल्याप्रमाणें बायकोशेजारीं येऊन मुसंडी मारून काम उरकून परत फिरणारा परंतु नंतर ही चटक वगैरे सर्व बाजूला ठेवून घरांतून निघून जाणारा व लोकांनीं परत आणण्याचा प्रयत्न केला तरी न येणारा, नंतर कित्येक वर्षांनीं परत आल्यावर पूर्वीच्या चटकदारपणा न करणारा––असा जो या बाईचा नवरा, त्याची आकृति स्पष्ट रेखाटणें लेखकाला कितीसें जमलें आहे ? त्याच्या मनांतील उभे–आडवे धागे नीट विणणें लेखकाला कितीसें शक्य झालें आहे ?––या प्रश्नाचें उत्तर तडक ' नाहीं ' असेंच द्यावें लागतें. बस् ! आणि तरी ' रथचक्र 'ला चांगली म्हणायचें असेल, तर मग श्रीपाद काळ्यांच्या ' पिसाटवाऱ्या 'नें काय घोडें मारलें आहे ?

आतां इतके सगळें झाल्यावर कादंबरीच्या गाजावाजाचीं आरंभीं उल्लेखिलेलीं कारणें कोणतीं गळतात व कोणतें एकच-एक कारण उरतें हा हिशेब ज्यानें-त्यानें आपापला करावा. लेखकानें पूर्वीं लिहिलेल्या कादंबऱ्या वाचकांसमोर उघड आहेतच.

आमचें फक्त एकच मत आहे–कादंबरींत मुद्रण दोष फार आहेत. आमच्या लक्षांत त्यांतील एक ठळकपणें राहिला आहे. तो असा, कीं पुस्तकावर लेखक म्हणून ' श्री. ना. पेंडसे ' असें नांव टाकलें आहे, तें ' गो. नी. दांडेकर ' असें हवें. ही दुरुस्ती पुढील आवृत्तींत होईल अशी आशा आहे.



# विविध विषय

## आफ्रिकेच्या जंगलांतील एक महान् भटक्या

आफ्रिकेच्या घनदाट जंगलांत हजारों श्वापदें व सिंहांचे फोटो ज्यानें घेतले व ज्यानें तिथें जवळ जवळ दोन वर्षे घालवलीं त्या एका महान भटक्याची ही कथा आहे. त्याचें नांव मार्टिन-मार्टिन जॉनसन.

एरवीं आफ्रिकेच्या जंगलांत शिकारीस व संशोधनास गेलेले धाडसी लोक परत येतात व चित्तथरारक अनुभव सांगतात. ऐकणाऱ्यांचीं मनें आश्चर्यानें दिङ्मूढ होतात. पण मार्टिनला अनुभव विचारा. तो असें कांहीं सांगणार नाहीं. कैरो ते केप हातांत बांबूची कांठी घेऊन त्यानें प्रवास केला. शेवटच्या प्रवासांत करमणूक असावी म्हणून त्यानें रेडिओ बॅटरी सेट घेतला. जंगलांत दुसरी काय करमणूक? पहिले दोन-तीन महिने सतत कार्यक्रम ऐके. पण पुढें त्याचाहि कंटाळा आला.

तेंच तें रटाळ संगीत! यापेक्षां जंगलांतील पशुपक्ष्यांचीं मधुर गीतें व हालचाली पाहणें जास्त चांगलें. त्यानें रेडिओ बंद करून ठेवला व पुढें कित्येक महिने त्याच्याकडे पाहिलेंहि नाहीं.

मार्टिन १४ वर्षांचा असल्यापासून त्याला ही भटकण्याची, दूर-दूरचे प्रदेश पाहण्याची संवय. त्याचा बाप जवाहिऱ्या होता. सर्व जगांतील दूरदूरच्या प्रदेशांतून तो माल मागवी. तीं पार्सलें उघडून माल तपासून घेण्याचें तो काम करी. पार्सलावरील निरनिराळ्या देशांचीं नांवें-पॅरिस, जिनेव्हा, बार्सिलोना, इंडिया, बुडापेस्ट, जपान, किती आकर्षक प्रदेश! आपण जायचे हे देश पाहायला. आणि ठरवलें त्यानें मनानें. एके दिवशीं तो घरांतून पळून गेला. युनायटेड स्टेट्सच्या निरनिराळ्या भागांत भटकला व युरोपकडे निघणाऱ्या जनावरें घेऊन जाणाऱ्या एका बोटीवर त्यानें चोरून प्रवेश मिळविला. मिळेल तें काम करायचें त्यानें ठरवलें; पण उतरल्यावर त्याला कोठें काम मिळेना. भटकत भटकत ही स्वारी आली ब्रुसेल्सला. उपाशीं पोटांत अन्नाचा कण नाहीं. अटलांटिक महासागराकडे पाहात तो म्हणाला. "काय ही माझी दशा!" आईवडिलांची आठवण येऊं लागली. केव्हां घरीं जाईन असें त्यास झालें. लंडनमध्यें मोठमोठ्या धक्क्यावर बंदरांत पडलेल्या मालाच्या आडोशानें तो रात्र रात्र काढी. शेवटीं न्यूयॉर्कला जाणाऱ्या एका लाइफ बोटीच्या इंजिनाचे बाजूस लपून छपून त्यानें जागा मिळवली.

मग त्याच्या सर्व जीवनाला कलाटणी मिळून धाडशी जीवनाला प्रोत्साहन मिळणारी एक घटना घडून आली. बोटीवरच्या इंजिनीअरनें त्याला एक मासिक दाखवलें; त्यांत 'जॅक लंडन' या लेखकानें एक लेख लिहून आपण स्नार्क नांवाच्या लहान बोटींतून जगप्रवासाला निघणार असल्याची माहिती दिली होती. हें वाचल्याबरोबर मार्टिनची वृत्ति उल्हासित झाली. तो बंदरांत उतरल्याबरोबर त्यानें एक सविस्तर पत्र 'जॅक लंडन' ला पाठवलें; त्यांत तळमळीनें त्यानें लिहिलें होतें. 'कृपा करा, काय वाटेल तें करून मला तुमच्याबरोबर या प्रवासास न्या. मी एका पायावर म्हणाल तेव्हां यायला तयार आहे. लहान म्हणून माझी उपेक्षा करूं नका, वाटेल तीं संकटें, हाल अपेष्टा, उपास-तापास काढीन, तुम्हांला मदत करीन. पण नाहीं म्हणूं नका. मला जलपर्यटणाचा सराव आहे.

दोन आठवडे लोटले. एवढ्या काळांत मार्टिनची मनःस्थिति अत्यंत अधिर झाली होती. काय उत्तर येते कोण जाणें? नकार आला कीं संपलेंच सारें; पण होकार आला तर! आणि शेवटीं जॅक लंडनकडून त्याला एक तार आली. त्यांत फक्त तीन शब्द होते. "तुला स्वयंपाक करतां येतो कां?" (Can you cook?)

आतां आली का पंचाइत? त्याला साधें भाताचें भांडें उतरता येत नसे; पण त्यानें त्याचें तीन शब्दांत उत्तर दिलें. "पाहा तर खरं" (have a test) तारेचें उत्तर पाठवल्याबरोबर तो एका रेस्टॉरंट-मध्यें गेला व म्हणाला, 'मला स्वयंपाकघरांत काम द्या. मला सर्व शिकवा. मला कांहीं पगार नको. मी पडेल तें काम काम करीन.' त्यानें ८-१५ दिवसांत सतत काम करून सर्व शिकून घेतलें.

आणि एके दिवशीं सॅन फ्रान्सिस्को उपसागरांतून 'स्नार्क' ही छोटी बोट पर्यटणास निघाली; पॅसिफिक महासागराकडे तोंड करून सागरी लहरींवरून नाचत जाणाऱ्या या छोट्या बोटीवर मार्टिन जॉनसन ह्याची 'प्रमुख स्वयंपाकी' म्हणून नेमणूक झाली. ब्रेड, सूप, पुडिंग, ऑम्लेट. ग्रेव्ही, सर्व तो तयार करी, बाटल्या धुण्याचें काम करी; सर्व साधनसामग्री आणण्याचें काम त्याच्याकडे आलें. त्यांतल्या त्यांत बचत करून ह्यानें मिठ, मसाले, तिखट, दालचीनि, लवंगा वगैरे पदार्थांचा इतका सांठा केला कीं, एरवी सहज तो १००-२०० वर्षे पुरावा. एवढा सांठा त्यानें मुद्दाम करून ठेवला, न जाणो फार दिवस भटकावें लागले तर हे पदार्थ उपयोगीं पडावेत.

ह्या प्रवासांत जलपर्यटणाचें सर्व कौशल्य त्यानें शिकून घेतलें. तो उत्तम तऱ्हेनें गलबत चालवूं लागला. एके दिवशीं आपली हुषारी दाखविण्यासाठीं त्यानें नकाशा उघडून त्यांत आपली बोट आतां कोठें आहे तें दाखवण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं हवेनें व वादळानें बोट होनोलुलुकडे चालली होती. पॅसिफिक महासागरांत चाललेली ही बोट पण त्यानें निर्देश केला तें ठिकाण होतें अटलांटिक महासागराचे मध्यावर.

पण त्यानें निरीक्षणानें अभ्यास वाढवला. प्रत्येक तरुण मनाला पडत असलेल्या रंगीत स्वप्नाळू जीवनस्वप्नांचें तो प्रत्यक्ष रूप



# मार्टिन जॉनसन

अनुभवत होता. त्याचा उत्साह अमाप होता. एकदा लाटा उसळून त्यांची बोट किनाऱ्यावरील वाळूंत रूतून बसली, दोन आठवडे त्या तशा स्थितींत काढावे लागले. उन्हाचा तडाखा तीव्र होता. पण तो डगमगला नाहीं.

त्याच्या जीवनाचीं तीस वर्षे हां हां म्हणतां लोटलीं. साता समुद्राचें पर्यटण, जगांतील सर्व प्रदेशांतलें भ्रमण पुरें झालें. कोरल बेटापासून साऊथ सी पर्यंत! आफ्रिकेच्या जंगलांतून, अमेरिकेच्या नरमांसभक्षक, रेडइंडियनांच्या प्रदेशांतून, कोठें कोठें म्हणून सांगावें? त्यानें ह्या सर्वांचे फोटो घेतले. खुजे, राक्षसासारखे उंच धिप्पाड, प्राणी, हत्ती, जिराफ, सिंह, वाघ, हिप्पापोटेमस, अस्वलें, चित्ते, इतर हिंस्र श्वापदें सर्वांच्या फोटोंचा त्यानें आल्बम करून ठेवला. विस्मयकारक, अद्भुत, चित्रविचित्र रंगाच्या आकाराच्या सर्व वस्तूंचा मिळतील तेथून संग्रह केला. त्यांची बोट म्हणजे अजबखाना झाला. पुढें कित्येक वर्षें त्याच्या ह्या संग्रहाचा चित्रपट निर्मात्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला. आफ्रिकेच्या जंगलांतून अत्यंत हिंस्र व अकाळविकाळ श्वापदांचीं छायाचित्रें ह्याच्या संग्रहीं अमाप झालीं. भावी पिढीनें कितीतरी वर्षें पाहून घ्यावीं. जिऑग्राफिक सोसायटीनें हे सर्व फोटो आपल्या संग्रहीं अत्यंत बहुमोल ठेवा म्हणून जतन करून ठेवले. हीं श्वापदं आतां ऱ्हास पावत आहे. दिसेनाशीं होत आहेत. त्यांचें फोटो मात्र चिरकाल, त्यांचें यथातथ्य दर्शन घडणारे ठरले. ही केवळ मार्टिनची कृपा; त्याचें धाडस, समयसूचकता, दूरदर्शीपणा हा असा जगाच्या उपयोगीं पडला.

मार्टिननें आपले अनुभव टिपून ठेवले आहेत. धष्टपुष्ट सिंह एकटा जात असला व माणसाकडून दुखावला, डिवचला न गेला तर तो कोणाच्या वाटेस सहसा जाणार नाहीं. पंधरा सिंह असलेल्या कळपाच्या जवळून त्याची मोटार गेली. सारे सिंह एखाद्या मांजराच्या कळपाप्रमाणें त्याच्या मोटारीभोंवती गोळा झाले. एक सिंह अगदीं जवळ येऊन टायर कुरतडूं लागला. दुसऱ्या एका वेळेस त्याच्या मोटारीच्या अगदीं नजिक एक सिंहीण आली; इतकी जवळ आली कीं तिचा पंजा सहज तोंडाला लागला असता; पण तिनें कांहीं केलें नाहीं मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, सिंह एक विश्वासू व चांगलें जनावर आहे. छे! छे! प्राण धोक्यांत घालावयाचे असतील तर सिंहावर विश्वास ठेवून वागा. त्याच्या मनांत संशय केव्हां उत्पन्न होईल आणि तो तुटून पडेल काहीं सांगता येत नाहीं. एकदा का तुटून पडला कीं एखादा बॉंबगोळा पडावा तशी ती झेंप असते. एका दमांत सिंह ४० फूट लांब उडी मारूं शकतो व धांवूं लागला कीं रेसच्या घोड्यापेक्षांहि जलद धांवत जातो.

"तुझा जीव अगदीं धोक्यांत आला असे प्रसंग किती घडले?" असें मार्टिनला विचारलें तेव्हां तो म्हणतो "असे प्रसंग अनेक. क्षणोंक्षणीं असे जिवावरचे प्रसंग बेतत. पण अगदीं शहारे येणारी एक हकीगत सांगतों.

"साऊथ सी बेटांत मीं उत्सुकतेनें नरमांसभक्षक टोळीचे फोटो काढण्यासाठीं गेलों. व अचानक पकडला गेलों. एक धगधगीत कढई होती. त्यांत मांसाचे तुकडे शिजत होते; खदखदत होते. मला पकडल्याबरोबर त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. मला पकडून तुकडे करून केव्हां शिजत टाकतो असें त्यांना झाले.

युरोपियन व अमेरिकन व्यापारी लोक नेहमीं या बेटावर शिकारीला येत. ते आले म्हणजे या लोकांना धरून पकडावें व त्यांना गुलाम म्हणून राबवावें व विकावें, त्यामुळें या टोळीला हे सर्व लोक शत्रु वाटत. हे नरमांसभक्षक लोक नेहमींच संशयी, अगोदरच क्रूर व संतापी असत. त्यांच्या हातांत सांपडल्यावर ते सोडतात काय? त्यांच्या मुख्याजवळ खुणेखुणेनें बोलवायचा मी प्रयत्न करत होतों, एका हातानें आणलेल्या सर्व चीज वस्तू त्यांचेसमोर ओतत होतों. तोंच भोंवतालीं पसरलेले शेकडों नरमांभक्षक लोक माझेभोंवतीं गोळा झाले. मदत मिळण्याची शक्यता नव्हती; माझे इतर लोक कितीतरी दूर होते. जवळ रिव्हॉल्व्हर होतें; पण एकटा किती लोकांना मी पुरेसा पडणार आणि प्रतिकार तरी करणार कसा! मी घाबरून गेलों. वरून शांतपणा दाखवायचा. सतत बोलत, समजावत राहायचें एवढेंच माझें हातीं होतें. वडिलांनीं सांगितलेलें ऐकलें असतें, त्यांच्या जवाहिराच्या दुकानांत बसून व्यापार केला असता तर...असे अनेक विचार प्रथमच आले. माझें म्हणणें काय असणार हें त्यांनीं खुणांनी ओळखलें असेल. पण असे ते मला सोडणार थोडेच! मला धरून, मारून माझा खिमा करण्याचा त्यांचा विचार. इतक्यांत त्या उपसागरांत एका ब्रिटिश बोटीचा कर्कश भोंगा ऐकु आला. याचा अर्थ काय तें त्या टोळीनें ओळखलें.

चलाखी करून मीं त्या टोळीच्या मुख्याला लवून नमस्कार केला. मी म्हणालों, "पाहिलंत माझं जहाज. सैनिक आले मला शोधत! बरं झालं तुमची गांठ पडली. येतो आतां, नमस्ते!"


तो काय म्हणतो, कोठें जातो हें कळावयाच्या आंत मीं किनाऱ्याकडे धूम ठोकली."

●●●

**—ना. स. करंदीकर**

गणपत जाधव या एका सामान्य पट्टेवाल्याची व सोळा लोकांच्या एकत्र कोंकणी कुटुंबाची मुलाखत यापूर्वी तुम्हीं वाचलीत. ही एका कर्त्या भोई माणसाची मुलाखत. सामाजिक जबाबदारीची जाणीव या मागास म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजांत किती उत्कटपणें आजहि जागत आहे हें पुढारलेल्या समाजानेंहि विचारांत घेण्यासारखें आहे.

# चंदूलाल किसन परदेशी



बोलतां बोलतां सहज विषय निघाला म्हणून मीं मुद्दाम विचारलें, "समजा, तुमच्या समाजांतली एखादी बाई विधवा झाली. तिला लहान मुलं असलीं. कर्ता माणूस नसला, तर तुमचा समाज त्या कुटुंबाकरितां काय करतो ?–" माझ्या या प्रश्नाचं उत्तर "आम्ही काय करणार ?" असं मीं अपेक्षित धरलं होतं.पण चंदूलालनें मला जें उत्तर दिलं त्यामुळें माझा फार मोठा अपेक्षाभंग झाला. कोणत्याहि तऱ्हेचा अभिमान, फुशारकी चेहऱ्यावर दिसूं न देतां चंदूलाल शांतपणें म्हणाले. "आम्ही सगळेजण मिळून (३० ते ४०) नदीवर मासे धरायला जातों. दिवसभर किंवा रात्रभर मासे धरल्यानंतर जितके लोक असतील तितके वाटे करतों. त्याच्यांतला, तेवढाच एक वाटा त्या बाईला देतो. तिच्या घरांतलं कुणी कामाला आलं नाहीं तरी. मग ती बाई मासे विकते आणि आपलं घर चालवतं."

चंदूलालच्या बोलण्यावर माझा विश्वास बसला नाहीं. खात्री करून घेण्यासाठीं मीं परत विचारलें, "हें असं जुन्या जमान्यांतले लोक करीत होते वाटते–" यावर मानेला हिसडा देऊन चंदूलाल म्हणाले. "नाहीं हो–आतां सध्यां अशा प्रकारचे तीन वाटे काढून तीन कुटुंबाना आम्ही मोठे करीत आहोंत–"

आपल्या समाजांतल्या अनाथ कुटुंबाचें पालन करण्याची जबाबदारी समाज अशा रीतीनें उचलतो, हें सांगतांना त्यांना अभिमान वाटला नाहीं, याचें कारण समाजाचें तें कर्तव्यच आहे, असं चंदूलालचं ठाम मत आहे. ही प्रथा अजूनहि ज्या समाजांत चालू आहे, त्या समाजाचं नांव परदेशी भोई समाज. नदींतले मासे मारून आपलें जीवन चालवणें हा त्याचा मुख्य धंदा. पुण्यांतल्या गंज पेठेंत त्यांची बहुतेक सारी वस्ती आहे. खडकीला दोन घरें आहेत, असं त्यांच्या बोलण्यावरून समजलं.

समाजांतल्या कोणत्याहि प्रसिद्ध व्यक्तीचं नांव आपल्या वाचनात, ऐकण्यांत नाहीं. बहुतेक करून सर्व लोक निरक्षर आहेत. मराठी दुसरी, तिसरी इतकें शिक्षण झालेले अगदीं थोडे "शिक्षित" लोक असावेत. अलिकडच्या पोरांना थोडसं शिकावसं वाटतं. बापांनाहि वाटूं लागलं आहे–– आपल्या मुलांनीं शिकावं म्हणून. पण ही जाणीव पोट तिडिकीची नाहीं. आपलं वाटतं एवढंच खरं.

चंदूलाल किसन परदेशी हे भोई समाजाचे एक पंच आहेत. समाजाचे, समाजांत वागतांना कांहीं दंडक ठरलेले आहेत. आपसांतलों भांडणं कोर्ट दरबारीं, पोलीस खात्यांत न्यायचीं नाहींत. पंच देतील तो निर्णय मान्य करावयाचा. अपवादादाखल एखादा रगेल मनुष्य दंड भरून सारखाच प्रमाद करूं लागला तर त्याला कोर्टांत न्यावयाचा. एरव्ही कांहीं केलें तरी चालेल. पण लग्न समारंभांत दारु प्यावयाची नाहीं. एकादशीच्या दिवशीं मासे धरावयाचे नाहींत, यांसारखेच समाजांतील स्थैर्य टिकवणारे बरेच नियम त्यांनीं मला सांगितले. आणि नुसते सांगितले, असें नाहीं तर ते पाळले जातात म्हणून ग्वाही पण दिली.

चंदूलालना त्यांचं वय सांगतां आलं नाहीं, पण तें चाळीस–पंचेचाळीसच्या दरम्यान असावं. त्यांची प्रकृति अगदीं उत्तम आहे. त्यांना चार मुली आणि एक मुलगा आहे.

सावत्र आई आहे, सख्खे नि सावत्रभाऊ, त्याची मुल असा त्याचा परिवार आहे. "एकत्र कुटुंबात भाडण होतात का ?–तुम्हाला कधी त्रास होतो का ? " असं विचारल्यावर ते म्हणाले, "आमच्या भावाभावात होत नाहीत. एखादेवेळी बायका बायकात होतात."

" मग त्यावेळीं तुम्ही काय करतां ?–"

त्यावर तुच्छतेच्या स्वरात ते म्हणाले. " त्याच्याकडं लक्ष कशाला द्यायच ?–त्याची भांडणं चालयचीच. पुरुषानी त्यात लक्ष घालायचं नाहीं. "

" जास्त भाडणं झाली तर ?–"

" तर घरात हजर असेल तो माणूस मिटवतो. कुणी कुणाच्या बायकोला बोलला तर त्याचा आम्ही राग मानत नाही. "

चंदूलाल हे थोरले भाऊ असून त्याचे गजपेठेंत तीन मजली घर आहे. हें घर त्यांच्या

**आमचे प्रतिनिधिकडून**

वडिलांनीं बांधलें आहे. वडिल वारलेत. त्याची आठवण सांगताना आदरपूर्वक ते म्हणाले. " आम्ही लहान असताना आमची आई वारली. दुसरं लग्न केल तर आपल्या मुलांना फार त्रास होईल या समजुतीनें त्यांनी बरीच वर्षें लग्न केलं नाही. सकाळी आमच्याकरतां स्वयंपाक हातानीं करून ते नदीवर जात. आम्ही कुठं तरी बसत असूं. संध्याकाळीं मासे धरून ते घरी येतं. मासे विकले जाईपर्यंत आम्ही पेंगत त्याच्या शेजारीं बसत असूं. मग ते आम्हां भावाना खांद्यावर टाकून ताडीच्या गुत्यात नेत. तिथें ते ताडी पीत. एखादें वेळी आम्हांला पाजीत. त्यावेळी दारूबंदी नव्हती. मग घरी स्वयपाक झाल्यानतर आम्हाला झोपेंतून उठवीत. मग झोपेंतच जेवण आणि परत झोंप–"

" मग त्यानी दुसऱ्या लग्नचा निर्णय कधी घेतला ?"

" आमचे सारखेच हाल होऊं लागले. आजारपणात वडिलाना धंदा करतां येईनासा झाला. आम्ही कदाचित् मवाली होऊ अशी त्यांना भीति वाटली असावी. म्हणून त्यानी दुसर लग्न केलं. "

मग चंदूलाल थांबले. सावत्र आईने किती छळ केला असावा, याचा मी मनाशी अंदाज बाधीत होतो चदूलालने तोंड उघडलें आणि ते ऐकून मला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला. सावत्र आईनें केलेल्या उपकाराची अशता तरी फेड व्हावी म्हणून त्यानीं आपल्या रांगड्या भाषेत सांगितल, त्याचा आशय असा. " तुम्ही माझ्याबद्दल नाही लिहिलं तरी चालेल. पण माझ्या सावत्र आईबद्दल कांही चागल लिहा. आम्हांला सावत्र आई फार चागली मिळाली.सख्या आईपेक्षा तिने आमची फार काळजी घेतली. पोटच्या पोरासारखं तिन आम्हाला वाढवल. एकवेळ पोटच्या पोराकड तिने दुर्लक्ष केल, पण आम्हांला जवळ केलं. आईच्या चागल्या वागणुकीमुळ वडिलाना संसाराची उभारी आली. निव्वळ त्यामुळें त्यांनीं संसार नेकीने केला. पैसा पैसा जमवला आणि हें घर बाधलं. घरातली लक्ष्मी चांगली असेल तर नराचा नारायण व्हायला वेळ लागत नाही. हें आमची आई म्हणजे मूर्तिमंत उदाहरण होय."

अज्ञान माऊली, अशिक्षित सावत्र मुलाने तुला धन्यवाद दिले. थोर मन त्याचं. आणि हा लेखक तुला लाख प्रणाम करीत आहेत. समाजातलीं असलीं मायाळू माणस अलिकड नाहींशी होत चालली आहेत. स्वत.च्या मुलांची काळजी घेताना आर्य स्त्री दुबळी ठरूं पाहात आहे.

चंदूलालच्या एकदर बोलण्यावरून दिसल मासे धरणे, रिकाम्या वेळात जाळी विणणे आणि कुठं तरी जमलं तर गप्पा मारणं यातच त्याचा दिवस निघून जातो. जिवाच्या करमणुकीसाठी ते फारसे कुठं जात नाहीत. कित्येक वर्षांनी त्यानीं 'सांगत्ये ऐका' तेवढा पाहिला होता. समाजांतली थोडी कामं, लग्न आणि दुर्गादेवीचा उत्सव हा त्याचा मोठा समारंभ. राजकारणातल्या पक्षाची त्यांना माहिती नाही. ती असावीच असं त्याना वाटत नाही. त्याशिवाय त्याच दैनदिन जीवन अडतं अशांतला भाग नाही. धद्याच्या उर्जितावस्थेबद्दल त्याच्या डोक्यात फारसे विचार नाहीत. सरकार मदत करत हें त्याना माहीत नाही. फक्त कष्ट करून मुलीच्या लग्नासाठी पैसा जमवावा आणि आपल घर चागल चालवावं हेंच आपल्या जीवनाचं सार्थक आहे असं त्याच प्रामाणिक मत आहे. ●●●


# काळोखांतील काजवे

श्री. रामचंद्र हिंगणे यांच्या मातब्बर लेखणींतून उतरलेला लघुत्तम कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला. मराठींतील या उपेक्षित साहित्य प्रकाराचा संग्रह प्रत्येकांच्या संग्रहीं असणें जरूर आहे.

लिहा :– नलिनी साहित्य प्रकाशन

३१ गुरुवार, पुणें २.

# दीर्घायुष्य व कायाकल्प

*

ऑगष्ट व सप्टेंबर १९६२ या अंकांत श्री. पु. ना. ओक यांनीं दीर्घायुष्यासंबंधीं लिहिलेले दोन लेख प्रकाशित झाले. या विषयाची सविस्तर मांडणी व्हावी अशी अनेकांनीं सूचना केल्यामुळें 'दीर्घायुष्य व कायाकल्प' ही लेखमाला या अंकापासून सुरूं होत आहे.

सुदृढ शरीराचें महत्त्व नेहमींच आहे. परतु चीनच्या आक्रमणानंतर आम्हीं आमच्या शरीरसंपदेची कशी अबाळ चालविली आहे याची विदारक जाणीव सर्वांनाच होऊं लागलेली आहे. सैनिक शिक्षण शाळा-कॉलेजांतून सुरूं करावयाचें म्हटलें तर चार तास बंदुक खांद्यावर टाकून संचलन करण्याचा काटकपणा आमच्या युवकांत नाहीं. अशा परिस्थितींत आरोग्याची व शरीरसामर्थ्याची उपासना करण्यास प्रत्येक नागरिकास प्रवृत्त करणारी ही लेखमाला वाचकांना उपयुक्त वाटावी अशी अपेक्षा आहे.

*

## आपल्या शरीराची वृद्धि आणि क्षय

**पु. ना. ओक**

आपलें आयुष्य वाढावें, आपण सशक्त, तजेलदार व सुदर दिसलो पाहिजे, निदान शारीरिक पीडा तरी आपणास सहन कराव्या लागू नयेत असे ज्याना ज्याना वाटतें, त्यांनी त्यांनीं प्रथम शरीराची जोपासना कशी होते. व ऱ्हास का होतो, शारीरयंत्र कसे चालतें--त्याच्या मूलभूत नियमाची तर्कशुद्ध माहिती करून घेतली पाहिजे. अशी अचूक माहिती नसेल तर आयुर्वर्धनाचे व आरोग्य टिकवण्याचे उपाय चुकतील.

मानवी शरीर हें दिव्याच्या ज्योतीसारखें आहे. दिव्याची ज्योत ही सतत एकच एक तेवत असलेली आपणास दिसतें. परतु लाकडाच्या ठोकळ्याप्रमाणें किंवा दगडाप्रमाणें ती एकच एक नसते तेलाचा एक सूक्ष्म बिंदू, वातीचा एक कण व एक बारकीशी ठिणगी याचा दर निमिषात सयोग होऊन ते हवेत विरून जातात. नतर दुसरा बिंदू, दुसरा कण व अन्य ठिणगी हीं पेटून लुप्त होतात. आपल्याला वरपागी एकच एक ज्योत सतत दिसते. वास्तविक दर वेळेस नवीन घटक येऊन नवीन ज्योत जळत असते. म्हणूनच तर वात व तेल संपताच किंवा वाऱ्यानें ठिणगी विझताच ज्योत सपुष्टांत येते. परंतु आपण अशी कल्पना करू कीं, मारुतीच्या शेपटासारखी वात अखड लांबीची पुरवली, तेल लागेल तसे सारखें ओतीत राहिलो व पाऊस वाऱ्यापासून ज्योतीतील अग्नीचें संरक्षण केले तर ती ज्योत अखड तेवत राहील यात शकाच नाहीं.

आपल्या शरीराचेंहि हुबेहूब ज्योतीप्रमाणेंच आहे. लहानपणी मातेच्या उदरातून बाहेर पडणारें मूल व सत्तर-ऐंशी वर्षांच्या आयुष्यानतर स्मशानात जळणारें शरीर हीं त्यातील घटक परिमाणूचा विचार करतां भिन्न असतात. ज्योतीप्रमाणें त्या शरीराच्या जीवनक्रमांत एक पारपरिक अखंडत्व दिसून येतें एवढेंच. वस्तुतः शरीराच्या आतील व बाहेरील कण चालणे, बोलणें, उठणें, बसणें, घासणें इत्यादि क्रियानीं व ऊन्ह, वारा, पाऊस आदि पचमहाभूताच्या प्रतिक्रियांनीं दरक्षणीं वातावरणात विरून किंवा घाम-मल-मूत्र-अश्रू-लाळ-रक्त यांच्या रूपाने पडून त्याच्या जागी अन्य कण स्थानापन्न होत असतात. सूक्ष्म शास्त्रांत शिरणारे तर लाकडाचे ठोकळे व दगडासारख्या अचेतन वस्तूतहि असे फरक दरक्षणी घडून येत असल्याचा निर्वाळा देतील. परंतु तेवढ्या खोलात न शिरताहि मानवी शरीरात होणारा दरक्षणीचा बदल प्रत्येकास मान्य करावाच लागेल. कारण तें मान्य केल्याशिवाय आजचें दीड वितीचें रडकें असहाय्य पोर उद्याचा साडेतीन हाताचा बहाद्दर कसा बनेल.

शरीराचा प्रत्येक कण बदलून त्याजागी अन्न, पाणी, हवा, उजेड याच्या सहाय्याने दुसरा कसा येत असतो हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल. नव्याने स्थानापन्न होणारे कण जर अधिक मोठे, मजबूत व तजेलदार येत राहिले तर माणूस सशक्त, सुंदर व तरुण दिसत राहील. या उलट नष्ट होणाऱ्या कणाची जागा जर जीर्ण व दुर्बल कण घेत गेले तर शरीराचा ऱ्हास होत असलेला दिसेल. हे ऱ्हास होणारें शरीर मरेल. परंतु माणसाच्या बुद्धीनें व प्रयत्नानें नष्ट होणाऱ्या कणांची जागा दमदार कणांनीं भरून निघत राहील. तर एकाद्या ज्योतीप्रमाणें व्यक्तीचे आयुष्य सतत वाढतच राहील, दीर्घायु माणसांच्या आयुष्यांत किंवा जें चाळीस पन्नाशीच्या वयालाहि तरुण दिसतात. त्यांच्या जीवनाचे हेंच रहस्य आहे.

## मृत्यूचें खरें स्वरूप

वर जीवनाचें व शरीरवाढीचें स्वरूप पाहिल्यावर आतां आपण मृत्यूचें खरें स्वरूप काय व तो कसा ओढवतो याचा विचार करूं. मृत्यू निमिषमात्रात येऊन प्राण घेऊन जातो असें आपण समजतो. भयकर अपघात होऊन देहाच्या चिंधड्या उडाल्या. किंवा बुडून माणूस मेला तरच मृत्यू एकाएकीं आला असे म्हणता येईल. एरवी ज्याला आपण नैसर्गिक-मरण म्हणतो, म्हणजे शरीर जर्जर किंवा दुर्बल होऊन जो मृत्यू येतो, निमिषार्धांत आला असें म्हणणें साफ चुकीचें आहे. मृत्यू अनेक वर्षे चाल करून येत असतो. रात्रीची झोंप न येणें, अन्नाला चव न लागणे, दृष्टि अधु होणें, केस पाढरे होणे इत्यादि मार्गांनीं मृत्यूचे आक्रमण वर्षांनुवर्षे सतत चाललेलें असतें. कित्येक तर मृत्यू येणारच येणार असें समजून त्याच्या आक्रमणास मूक प्रोत्साहनच देतात. काहींजण मृत्यूच्या आक्रमणापुढें आपलें काही चालणे शक्यच नाही अशा हतबल वृत्तीने प्रतिकार करण्याचें मनांतहि आणीत नाहीत. अन्य काहीजण जीर्ण व जर्जर होऊन मृत्यू येत आहे हें स्पष्ट दिसत असतानासुद्धां चहा पिणे, विड्या पिणें, तपकीर ओढणें यांत अत्यानद व जीवन सार्थक मानून उद्दाम व बेफिकीरपणें मृत्यू ओढवून घेतात. उलट मृत्यू टाळणें किंवा दुरावणें योग्य वर्तनाने शक्य आहे हें समजून योग्य रीतीने वागणारें किंवा ज्याना शारीरयंत्राच्या कर्तृत्वाची स्पष्ट कल्पना नसूनहि ज्याना चागल्या सवयी जडल्यानें जें योग्य आयुष्यक्रम ठेवतात त्याचें आयुष्य वाढतें, त्यांना आरोग्य लाभतें व त्याचें शरीर आणि चेहरा चिरकाल तुकतुकीत आणि निखळ दिसतात.

मृत्यूबद्दलची सामान्य कल्पना अशी आहे की, ज्या क्षणी हृदयाचें ठोके पडणे बद होईल त्याक्षणी देहाचा मृत्यू होतो. ही मृत्यूची व्याख्या तर्कशुद्ध नाही. मृत्यूच्या दीर्घ मार्गांत प्रत्यक्ष हृदयाचे ठोके बंद पडणें ही शेवटली परंतु अगदीं क्षुल्लक बाब आहे. कारखान्याचें उदाहरण घेऊन पहा. कारखान्याच्या यंत्रास चालना देणारा विद्युत्प्रवाह आपण बंद करतो त्याक्षणीं कारखाना बद झाला असें आपण समजतो. वास्तविक पहातां विजेचा पुरवठा बंद केल्यावरसुद्धां कारखान्याची यत्रें फिरतच रहातात. परतु ती नवशक्तीच्या अथवा नवचैतन्याच्या जोरावर नसून पूर्वी मिळालेल्या गतीमुळें थोडावेळ फिरत राहतात. सायंकाळी सहा वाजतां विजेचा पुरवठा बद करून दारें लावणे सुरू झालें की कारखाना बद झाला असे आपण समजतो. दिवसभर मिळालेल्या गतीने कारखान्यातील चक्रें जरी सहा वाजून १२ मिनिटेंपर्यंत फिरत राहिली तरी कारखाना रोज सहा वाजून १२ मिनिटानी बद होतो. अशी कोणाचीच कल्पना होत नाही. तोच नियम माणसाच्या शरीरासहि लागू केला पाहिजे.

अनवाणी चालणे, बोटानें दांत घासणे वगैरे मानवी क्रियांनी व ऊन्ह, पाऊस आदि नैसर्गिक कारणानी माणसाच्या शरीराची सतत झीज होत असते. विश्रांति, अन्नपचन, शुद्ध हवा इत्यादींनीं झीजेची भरपाई पण होत असतें. व्यक्तीच्या आयुष्यांत ज्या क्षणीं झीज जास्त व भरपाई कमी असें व्यस्त प्रमाण सुरू होतें—ज्या निमिषापासून माणसाच्या शरीराच्या जीर्ण कणांची जागा नव्या जोमदार कणांनीं भरून निघणें बद होतें—ज्या क्षणापासून माणूस क्षीण क्षीणच होत जातो—ज्या क्षणापासून शरीर नवीन परमाणूंच्या—शक्तीच्या अथवा चैतन्याच्या जोरावर जिवंत न रहातां पूर्वी कमावलेल्या शक्तीच्या जोरावर—म्हणजे पूर्वीच्या गतीच्या आधारावर शरीर टिकाव धरून असतें त्याक्षणीं मृत्यू सुरू होतो याची स्पष्ट कल्पना प्रत्येकास असणें जरूर आहे. तेव्हापासून त्याच्या मरणास जी सुरुवात होते ती क्रमाक्रमानें हृदयाचे ठोके बद पडण्यापर्यंत सुरू होतें. प्रत्यक्ष हृदयाचे ठोके बंद पडणे ही या दीर्घ मार्गांतील शेवटली परंतु लहान व क्षुद्र पायरी होय. म्हणून मृत्यूहि ( अपघात वगळल्यास ) क्षणार्धांत येणारी बाब नसून अनेक वर्षे होत असणारा शरीराचा ऱ्हास असतो. मृत्यू दीर्घकाल सतत आपणास हळूहळू ओढून नेत असतो. पायाच्या तळव्याचा नैसर्गिक गुळगुळीतपणा नष्ट होऊन तें खरबरीत होतात व त्यास तडा पडूं लागतात. त्यावेळी तळव्याची चामडी मेली हें लक्षांत घेतलें पाहिजे. पण आपण तें ध्यानीमनीहि घेत नाही. शरीरावरील केस काळे होण्याची क्रिया थांबते ( म्हणजे मरतें ) तरी आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. झोंप येईनाशी होते तरी आपण जागे होत नाही. दात हालून पडूं लागतात तरी विशेष कांही बिघडले असल्याचें आपण मानीत नाही. पोटदुखी, कबरदुखी, डोकेदुखी, इत्यादि शारीरिक व्यथा सुरू झाल्या तरी त्या व्हायच्याच अशी भ्रामक समजूत आपण करून घेतों. शरीराचें मासल भाग लोंबूं लागतात. तरी त्यात विशेष काहीं नाहीं अशी आपली वृत्ति असते. अशा तऱ्हेनें हळूहळू सतत तीस चाळीस वर्षे शरीराचा फन्ना पाडीत असलेल्या मृत्यूस आपण उघड्या डोळ्यांनीं बघत असतो. तरी तो आपणास दिसत नाहीं व हृदयाचे ठोके बंद झाले म्हणजे क्षणार्धांत मृत्यू माणसास ओढून नेतो अशी चुकीची समजूत आपण करून घेतो.

## शरीर हें सजीव यंत्र

जीवन-मरणाचें स्वरूप वर स्पष्ट केलें आहे. पांच वर्षाच्या मुलाचें शरीर दिवसेंदिवस सशक्तच झालें पाहिजे व ४० वर्षाच्या माणसाचें शरीर दिवसेंदिवस अशक्तच होत राहिलें पाहिजे ही आपली कल्पना चुकीची आहे. बरोबर ४० वर्षे ज्या क्षणाला पूर्ण होतात त्याच्या पुढल्या क्षणापासून शरीराचा ऱ्हास प्रत्येक व्यक्तीचें बाबतीत सुरू झालाच पाहिजे असें आपण म्हणू शकूं का ? वर ४० हें वय केवळ उदाहरणादाखल घेतलें आहे. अमुक इतकी वर्षे पूर्ण झाल्यावर शारीरिक ऱ्हास सुरू झालाच पाहिजे असें आपण हमखास म्हणू शकणार नाहीं तसे असतें तर अमक्या एका क्षणापर्यंत वाढ होत राहिली तशी पुढें का होऊं नये किंवा पुढें ऱ्हास सुरू झाला तो अगोदरच का सुरू होऊं नये याला आपणास तर्कशुद्ध उत्तर देता आले नसते. शिवाय तसें असतें तर एका दिवशी एका क्षणी जन्मलेल्या सर्व माणसाचें मरणसुद्धां एकाच दिवशी व एकाच वेळी झाले असते. प्रत्यक्षात तसे होत नाहीं. जे संयमी असतात, ज्याना व्यसनें नसतात, जे लवकर झोंपतात, ज्याना फळ दूध-दही-लोणी भरपूर खायला मिळालेले असतें व जे नियमित व्यायाम घेतात ते इतरापेक्षा दीर्घायु होतात. यावरून हे सिद्ध होते की, अनुकूल परिस्थितींत आयुर्वर्धन होत राहील तर प्रतिकूल परिस्थितीत जीवनमान कमी होत राहील. म्हणूनच मानवी आयुष्य, वयोमानाची चिंता न करतां योग्य परिस्थितीत वाढवू तितकें वाढू शकते. शरीर यंत्राच्या क्रियाचें योग्य ज्ञान व त्यास पोषक अशी वागणूक व ऐपत ही मात्र हवीत.

मानवी शरीर हें यंत्र आहे इतकेंच नव्हें तर ते सजीव यंत्र आहे

लोखंडी यंत्रपुद्धा रोज घासून, पुसून तेल देऊन, रंग लावून वापरलें तर निष्काळजीपणाने वापर केल्यापेक्षां कितीतरी अधिक काळ टिकतें. परंतु झीज भरून काढण्याची किमया त्यात नसतें. कितीहि सभाळून वापरले तरी ते शेवटी हजारो वर्षांनी का होईना झिजून संपेल. मानवी शरीरयंत्रांत स्वतःची झीज भरून काढण्याची खुबी आहे. आपण अनवाणी पायी दिवसभर घरात व बाहेर फिरतो तेव्हा आपल्या पायाचे तळवे किती झिजत असतील हें दरवर्षी बदलाव्या लागणाऱ्या पादत्राणावरून कोणासही सहज समजेल. परंतु पायाचे तळवे आपणास कधीच झिजलेले दिसत नाहीत. त्यांना ठिगळें लावण्यास कोणाकडे जावे लागत नाहीं. कारण झिजणाऱ्या प्रत्येक कणाच्या जागीं दुसरा कण पटकन् स्थानापन्न होत असतो. एक वर्षी तळवे झिजले, दुसरे वर्षी घोटे झिजलें, तिसरें वर्षी माणूस गुडघ्यानी चालूं लागला असे कधींहि होत नाहीं.

झाडें ही सजीव यांत्रिक सृष्टी आहे. कित्येक झाडें हजारो वर्षें जगतात. त्याच्या यंत्राहून मानवी शरीर श्रेष्ठ आहे. कारण आपल्याला हालचाल करतां येतें. मानवेल त्या हवेत जाता येते, दुःख बोलून दाखवतां येते, उपाय शोधता येतो इ. झाडें जमिनीत रुजलेली असल्याने भोवतालची माती दूषित झाली तर त्याचा तरणोपाय नसतो. माणसाला तशी भीति नसते.

पशुपक्षी सजीव व हालचाल करणाऱ्या यांत्रिक सृष्टींत मोडतात परंतु त्यास मानवी विचार शक्ति व बुद्धि नसते. मानवासारखी वाचा नसते. म्हणून त्याच्याहून माणूस स्वत:च्या शरीराची जोपासना समजून उमजून उत्तम प्रकारे करूं शकतो. तसेच या बुद्धीमुळेंच माणूस शरीराचा ऱ्हासहि तडक घडवून आणू शकतो. कारण पशूंना व्यसनाधीन होता येत नाही. तर उलट सामान्य माणसे व्यसनाच्या सहज आहारीं जातात.

आदर्श सवयी व वागणूक असणारा माणूस आपलें आयुष्य अमर्याद वाढवू शकतो हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. अर्थात थोडी आर्थिक ऐपत इत्यादींचीहि जरूर आहेच. कारण आदर्श वागणुकीत योग्य आहार व पुरेशी विश्रांति याचा अंतर्भाव होतोच. मग असा प्रश्न उद्भवतो कीं चांगल्या सवयी असणारा माणूसमुद्धा शेवटीं वृद्ध होऊन मरतो ते कां ? त्याची अनेक कारणे असू शकतील. उदाहरणार्थ सामाजिक बंधने व आजकालच्या जीवनमानास अनुसरून जागरण करूं नये हा आरोग्याचा नियम बाजूस सारूनहि लग्नामुंजीत आगगाडी गांठण्यास किंवा सिनेमा-नाटकास माणूस निदान आप्तेष्टाच्या आग्रहाने जातोच. शिवाय माणसाचें वय वाढत जातें तसतसा तो बऱ्याच आरोग्याच्या नियमांची हेळसांड करू लागतो. व्यायामाचेंच उदाहरण घ्या. तीस-पस्तीस वर्षें वयाच्या वरील मनुष्य व्यायाम करण्याचें सोडून देऊ लागतो पण आहार मात्र कमी करीत नाहीं. उलट दिवसभर तोंडांत काही काही खाद्यपेय पडतच असतें. लहानपणीं रांगणे, हुंदडणें, खेळणे वगैरे सुरू होतें. शाळेंत जाऊ लागल्यावर धावणें, पोहणें, घोड्यावर बसणे, तालमीतला व्यायाम इ होते. परंतु तोच मनुष्य लग्न करून जसजसा स्वतंत्र संसार करू लागतो तसतसा पिंगपाँग, बॅडमिंटन्, टेनिस, बिलियर्ड, गोल्फ, पत्ते इत्यादि नाजुक खेळ खेळू लागतो. मग हेहि सोडून देऊन थोडेसे फिरण्याचाच क्रम ठेवतो. त्यानंतर फक्त घरातल्या घरात हिंडतो-फिरतो. शेवटलें कांहीं दिवस खोलीबाहेरहि निघत नाहीं. अशा तऱ्हेनें त्याचा अंत होतो. आपला व्यायाम आपण कमी कमी करतो तसा आहारहि कमी करावयास हवा ही गोष्ट त्याच्या लक्षांतहि येत नाहीं. मग न पचलेलें अन्न शरीरात रूजून शरीर जास्तच जीर्ण होतें यात नवल नाहीं. जन्मल्यानंतर बरीच वर्षें आपण सशक्त होत जातो व आपले शरीर वाढत रहातें याचें कारण म्हणजे जन्मल्याबरोबर आपले शरीर एकाद्या नव्या करकरीत, कोऱ्या व ताज्यातवान्या यंत्राप्रमाणे असतें. त्यांत कसल्याहि प्रकारची घाण साचलेली नसते. जन्मल्यानंतर जोंवर दूध हाच आहार असतो तोंवर शरीरात मलाच्या रूपानें जास्त घाण सांठत नाही. मूल जसजसें मोठें होत जातें तसतसें तें भात, पोळी सारखें चटकन् न पचणारे अन्न खाऊं लागतें. त्यानंतर योग्य व्यायाम अथवा झोप वगैरे सारख्या आवश्यक गोष्टींची हेळसांड झाली, चहा कॉफी, तबाखूसारख्या शरीराचा ऱ्हास करणाऱ्या पदार्थांची सवय जडली तर शरीरात जास्त मल सांठत रहातो. तें विष शरीरांत भिनतें व शरीराच्या एकेक नैसर्गिक क्रियेवर हल्ला करून ती बंद पडतें.

• • •




महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति
मंडळ पुरस्कृत ग्रंथ क्र. १

गुजराथेंतील मराठी राजवट

वि. गो. खोबरेकर

मूल्य सात रुपये

राजहंस प्रकाशन
४१९ नारायणपेठ, पुणें २.

★

# ---' रुपेरी कडा ' नसलेली !


☆

## " सूनबाई "

☆

### प्रास्ताविक

मागच्या पिढींतील नाणावलेले कादंबरीकार श्री. दत्त रघुनाथ कवठेकर यांच्या " रुपेरी कडा " या कादंबरीच्या आधारें " सूनबाई " हा चित्रपट तयार केला गेला आहे. या चित्रपटाचें परीक्षण करणें म्हणजे सोनूबाईच्या हातांतील कथलाचे वाळे मोजण्याचाच प्रकार होणार आहे. पटकथा, पात्रांची निवड, संगीत दिग्दर्शन, छाया–चित्रण हें सर्व चांगल्या चित्रपट निर्मितीला लागणारें घटक इथें कमकुवत आहेत. कादंबरी आणि पटकथा हे दोन निरनिराळे प्रकार आहेत. कादंबरी आपण वाचतो. ती वाचत असतांना आपल्या मनांतील विचारहि आपली साथ करीत असतात. पण पटकथा घाईघाईनें आपण पडद्यावर पाहातो. मूळ कादंबरीचं सौन्दर्य, रसहानी न होतां, कादंबरींतील उत्कट व्यक्तिरेखा न बिघडवितां जसंच्या तसं पटकथेंत उतरविणं हें पटकथाकाराचं खरं कौशल्य आहे. कादंबरीची शोभा वाढविणारे संवाद पटकथेंतसुद्धां शोभून दिसतीलच असें नाहीं. मूळ कथेशीं इमान राखून संवाद पटकथेच्या सांच्यांत प्रभावीपणें बसवलें गेलें पाहिजेत. पण श्री. ग. रा. कामत यांनीं मूळ कलाकृतीचं सौंदर्य जाणून न घेतां कादंबरींतील संवाद कापून चिकटवल्यासारखे वाटतात. यालाच मूळ कादंबरीशीं ईमान राखलें आहे असें म्हणावयाचें असल्यास तसें तें त्यांनीं निश्चित राखलें आहे.


उषाकिरण, शाहू मोडक

### कथानक

एकत्र कुटुंब पद्धतीनं रहाणाऱ्या जमिनदार घराण्यांतील मानानं वडील पण वयानं लहान अशा सुधाकर इनामदार ( शाहू मोडक ) याचा क्षमेशीं ( उषाकिरण ) जुन्या पद्धतीप्रमाणें विवाह होतो. क्षमेला एकत्र कुटुंबपद्धति पसंत नसते. क्षमेचे वडील तिला तिनं विभक्त संसार थाटावा अशी चिथावणी देतात. आपल्या द्रव्यलोभी व मूर्ख पित्याच्या नादीं लागू सुधाकराचें मन वळवून क्षमा वेगळं होण्याचा हट्ट धरते. एकत्र कुटुंब पद्धतीवर सुधाकराची श्रद्धा व प्रेम असते. तो क्षमेची समजूत करण्याचा प्रयत्न करतो. परंतु आपला हट्ट खरा मानून क्षमा आपल्या लहान मुलाला व पतीला सोडून माहेरीं येऊन एका खोलींत वेगळी राहाते व हॉस्पिटलमध्यें नर्सची नोकरी धरते. तिला चार वर्षांच्या या नोकरीच्या काळांत अतिशय कटु अनभव येतात. स्त्री विवाहित असो वा अविवाहित असो, पुरुषाच्या आधाराशिवाय ती सुखानें आणि उजळ माथ्यानें जगूं शकत नाहीं अशी क्षमेची खात्री होते. पश्चाताप पावून ती सासरीं परत जाते. ती परत आली तरी कुणालाच आनंद होत नाहीं. तिला पतीचें किंवा घरांतील माणसांचें प्रेम मिळूं शकत नाहीं, फक्त आधार मिळतो. हें सारें क्षमेला असह्य होऊन ती परत घर सोडून जायला निघते तेव्हां तिला खरोखरच पश्चाताप झाला आहे अशी सुधाकराची खात्री होते व तो तिचा प्रेमानं स्वीकार करतो. चित्रपटाचं कथानक थोडक्यांत हें असं आहे.

### सदोष निर्मिती

कथानकांतील एकहि प्रसंग प्रेक्षकांच्या मनाची पकड घेत नाहीं. क्षमेचा बाप (वसंत शिंदे) हा एक द्रव्यलोभी, हुंड्याचे पैसे ठरवूनहि न देणारा, मुलीला विभक्त होण्यासाठीं फूस लावणारा असा एक



नायिकेची
भूमिका
यांनाच
दिली असती तर !

जीवनकला

मूर्ख माणूस म्हणून चित्रपटांत रंगविला आहे. तो मध्येंच एकदम जो लुप्त होतो तो पुन्हा पडद्यावर कधींच उगवत नाहीं. देशमुखांच्या घरांतील दहा–पंधरा पुरुष मंडळींपैकीं लग्नानंतर पुन्हा कधींच कोणी कॅमेऱ्यापुढं येत नाहीं. त्यांच्या बायका मात्र वावरतांना दिसतात. सुधाकर आणि त्याचा काका (शंकर कुलकर्णी) हीं दोन पुरुष माणसं सोडलीं तर घरांत सगळ्या बायकाच. क्षमा पश्चाताप होऊन परत सासरीं आल्यानंतर ती पुन्हा शेवटच्या प्रसंगांत घर सोडून जायला निघते तेथपर्यंत. म्हणजे चित्रपट संपेपर्यंत सुधाकरचे काकासुद्धां अदृश्यच असतात. सुधाकर–क्षमेची पहिली भेट देशमुखांच्या शेतांत दाखवली आहे ती कृत्रिम वाटते. त्यावेळीं शेतांत काम करणारा, धोतर, अंगरखा व डोक्याला फेटा बांधणारा सुधाकर नंतर संपूर्ण चित्रपटांत सूट घालून वावरतांना पाहिल्यावर तो अमेरिकन शेतकरी आहे कीं काय अशी शंका येते.

### पात्रांची निवड आणि संगीत योजना

चित्रपटांतील पात्रांची निवड अत्यंत चुकीची झाल्यामुळें रसहानी होते असें म्हणण्यापेक्षां रस उत्पन्नच होत नाहीं असें म्हणावें लागतें. परिणामीं हास्यरस मात्र निर्माण होतो. उतारवयाला लागलेले, शरीरानें बेडौल असे नट शाहू मोडक यांना नायकाची भूमिका दिली आहे. त्याचप्रमाणें प्रौढ अशा उपाकिरण यांना नायकेची भूमिका दिली आहे, हें प्रौढ जोडपें आणि त्यांचे प्रणयप्रसंग पाहतांना प्रेक्षकांच्या मनावर फारच ताण पडतो. हें नवविवाहित जोडपें असेल अशी शंकासुद्धां कोणाच्या मनांत डोकावत नाहीं. या जोडप्याच्या साथीला बेसूर आणि अप्रासंगिक संगीताची जोड मिळाली आहे. गीतें श्री. वि. स. खांडेकर व शांता शेळके यांचीं आहेत. संगीत दिग्दर्शन सलिल चौधरी यांचें आहे. मराठी गीतांना हिंदी साज दिल्यामुळें मूळ कविताच ऐकूं येत नाहीं. तेव्हा काव्याबद्दल कांहीं लिहावें तर तेंहि अशक्य.

### दिग्दर्शन

चित्रपटांचे दिग्दर्शन माधव शिंदे यांचें असून त्यांत उल्लेखनीय असें कांहींच नाहीं. चित्रपटाच्या मध्यंतरापर्यंतचे सारे प्रसंग कंटाळवाणें आहे. प्रभावी कथानक असूनसुद्धां त्याचा उपयोग दिग्दर्शकाला नीटसा करून घेतां आला नाहीं. क्षमेला पश्चात्ताप झाल्यानंतर ती सासरीं परत येते. त्यानंतर कथानक रंगतें असें वाटतें न वाटतें तोंच चित्रपटच संपतो. नव्या चेहऱ्यांच्या अडचणीमुळें उपाकिरण यांना भूमिका दिली आणि उपाबाईकरतां शाहू मोडकांना आणलें हें समजूं शकतें. परंतु उभ्या महाराष्ट्रांत सात–आठ वर्षांच्या मुलाच्या भूमिकेला हिंदी बालनट का आणला हें समजत नाहीं. एका नव्या बालनटाला पडद्यावर आणण्याचें श्रेय तरी दिग्दर्शन करणाऱ्या तीन माधवांनीं ( माधव शिंदे, माधव भोईटे, माधव कुलकर्णी ) घ्यायचें होतें.

### अभिनव

प्रभात फिल्म कंपनीच्या परंपरेंतील एक जुने नट शंकर कुलकर्णी यांनीं सुधाकरच्या काकांची भूमिका चोखपणें बजावली आहे. त्यांचें काम थोडें असूनसुद्धां प्रत्येक हालचाल नेटकी आहे. उपाकिरण यांचा अभिनय चांगला आहे. शाहू मोडक यांचें अभिनयाशीं वावडे असावेंसें दिसतें. त्यांच्या चेहऱ्यावर अभिनय उमटायला बराच वेळ लागतो आणि चुकून तो उमटलाच तर चेहरा वेडावांकडा दिसून मानेवरच्या शिरा फुगलेल्या दिसतात. नायकाच्या काकीची भूमिका माई भिडे यांनीं चांगली केली आहे. वसंत शिंदे यांनीं क्षमेच्या बापाची, आपली भूमिका सांगितल्याबरहुकूम केली आहे. नायक नायिकेमध्यें संशय निर्माण करण्याची मायाची भूमिका ( जीवनकला ) चांगली झाली आहे. मात्र हें प्रसंग मुद्दाम संशय उत्पन्न करण्यासाठीच घुसडले आहेत. इतकें कृत्रिम वाटतात. पुष्कळशा या मायेलाच नायिकेची भूमिका दिली असती तर बरें झालें असतें अशी प्रेक्षकांना हळहळ वाटतें.


इतिअलम्.

शेवटीं काय सांगायचें ?

पटकथा, पात्रांची निवड, संगीत, दिग्दर्शन, छाया-चित्रण यांनीं चित्रपटाची वाट लावली आहे. या ढगाला " रुपेरी कडा " आहे. ती फक्त कवठेकरांच्या मूळ कथेची.

● ● ●






# शिवचरित्र प्रसार योजना

आजच्या आणिबाणीच्या प्रसंगीं

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणें प्रत्येक मराठी माणसाचें कर्तव्य आहे.

'राजहंस प्रकाशन संस्थे' नें श्री. ब. मो. पुरंदरेकृत **'राजा शिवछत्रपति'** या दशखंडात्मक शिवचरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

**आमच्या असंख्य हितचिंतकांना**
**या योजनेंत**
**सहभागी होता येण्यासारखें आहे.**

कृपया पत्रानें वा समक्ष चौकशी करावी

## राजहंस प्रकाशन संस्था

४१९ नारायण पेठ, पुणें २.


संपादक-मुद्रक-प्रकाशक : **श्री ग. माजगांवकर** * प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणें २.

मुद्रणस्थळ : प्रशांत प्रिंटिंग प्रेस, ४६१ सदाशिव पेठ, पुणें २. * कव्हर छपाई : उदय मुद्रणालय, पुणें २.